## ३ कास रोगांतील स्थानांत होणारी विकृती

गळा व फुफ्फुस यांचे विकृतिचे स्वरूप खालीलप्रमाणें:—

गळा (१) शूकपूर्ण गलास्यता (२) कंठेकडुश्चजायते, कंठे सक्तः (३) गल-तालुलेपः (४) शब्द वैषम्यं ( गळयांत कुसे आटल्यासारखी वाटणें, गळयांत खाज उत्पन्न होणें, घसा मिळून आल्यासारखा वाटणें, घशांत आतून चिकटल्यासारखे वाटणें, नेहमीचे आवाजात बदल होणें) . फुफ्फुस विकृतिमुळें म्हणजे फुफ्फुसांत कार्य करित असलेल्या प्राणवायुचे विकृतिमुळे (भोज्यानां अवरोध : (२) उदानभावमापन्नः (३) कंठेसक्तः तथा उरसि, (अन्नगिळतांना त्रास होणें, प्राणवायुचे कार्य हवा आत घेण्याचे आहे परंतु कास रोगांत प्राणवायुला उर्ध्वगति उत्पन्न होते, प्राणोहि उदानानुगतः प्रदुष्टः. तसेच छाति (कफामुळें) भरल्यासारखी वाटते.) ही लक्षणें होतात.

## ४ कास रोगांत उर्ध्वगति कशी उत्पन्न होते

**१ वातः केवलः दोषांतरावृतमार्गः कासस्य कारणं नतु अनावृतमार्गः (कफादि)**

**२ प्रतिघातविशेषेण तस्य वायोः सरंहसः। वेदनाशब्दवैशम्यं कासानां उपजायते ॥**



१ फुफ्फुसांतील वातवाहिन्याला त्याच्या गतीत कफादिकांचे आवरण किंवा अडथळा उत्पन्न झाला म्हणजे खोकला उत्पन्न होतो. तसा अडथळा उत्पन्न झाला नाहीं तर खोकला बहुतेक उत्पन्न होणार नाही (नतु अनावृतमार्गः (कफादि).

२ फुफ्फुसातील वातवाहिन्याच्या निरंतर चालू असलेल्या गतीला कफाचे आवरण म्हणजे अडथळा उत्पन्न झाल्यामुळे तेथील स्नायु व धमन्या या सर्वांना जोराची उर्ध्वगति उत्पन्न झाल्यामुळे अडथळा उत्पन्न करणारा तो कफ बाहेर काढण्याकरितां फुफ्फुस, गळा या स्थानांतील सर्व स्नायू व नसा मदत करतात त्यामुळें त्या ठिकाणीं एवढी गति उत्पन्न होते कीं 'सघोष तादृग्विध प्राणनिर्मनोत्थ स्वरयुक्तः स प्राणवायुः कास इति उदाहृतः' हा प्राणवायु जोरानें आवाजयुक्त शरीरांतील प्राणच बाहेर काढतो की काय अशा स्वरात घशातून बाहेर निघतो त्याला कांस असें म्हणतात.

## ५ कासाची व्याख्या

**१ शिरकंठात् ऊर्ध्वं गच्छति वायुः इति कासः**

**२ कसनात् (घर्षणात्) कासः**

**३ वेदनाशब्द वैषम्यं कासानां उपजायते**

६ खोकला कसा उत्पन्न होतो

उरामध्यें जी प्राणवायु वाहणारी स्त्रोतसे आहेत त्यांत कफ जास्त प्रमाणांत साठल्यामुळें प्राणवायुला आंत जाण्यास व उदान वायूला बाहेर येण्यास अडथळा उत्पन्न होतो. त्यामुळें तेथील स्नायू उत्तेजित होऊन प्राण व उदान अशा दोन्ही वायुकडून तो मार्गातील कफ बाहेर काढून टाकण्याकरितां जोरानें जो हिसका बसतो त्यामुळें काश्याचे फुटके भांडे वाजल्याप्रमाणें जो आवाज निघतो त्यास खोकला असे म्हणतात. असा हा खोकला राहून राहून किंवा सतत दोन तीन मिनिटेंहि राहतो.

बहुतेक बिमारात खोकला होण्याचे अगोदर जोराचा पडसा येतो. नाकातून पाणी गळू लागतें. नंतर खोकला येण्याला सुरुवात होते. यात घसा दुखतो, घश्यांतील गाठी वाढतात, पडजीभ वाढते.

खोकला हा स्वतंत्रहि राहूं शकतो व ज्वर, क्षय, घशांतील गाठी व सूज, पडजीभ, या कारणानेंहि येऊ शकतो.

कास रोगाची संप्राप्ति

**अधःप्रतिहतो वायुरूर्ध्वस्रोतः समाश्रितः ।**
**उदानभावमापन्नः कण्ठे सक्तस्तथोरसि ॥५॥**
**आविश्य शिरसः खानिसर्वाणि प्रतिपूरयन् ।**
**आभंजन्नाक्षिपन् देहं हनुमन्ये तथाऽक्षिणी ॥६॥**
**नेत्रे पृष्ठमुरः पार्श्वे निर्भुंज्य स्तम्भयंस्ततः ।**
**शुष्को वा सकफो वाऽपि कसनात्कास उच्यते ॥७॥** च चि. अं. ४७७.

खालून अवरुद्ध झालेला वायु उलटून उर्ध्वस्रोतसांचा आश्रय करून उदान वायुचे स्वरूप ग्रहण करून घशांत व छातीत येऊन अडकतो आणि मस्तकांतील सर्व स्रोतसांत शिरून ती भरून टाकतो. त्यामुळें शरीर मोडल्यासारखें व वर फेकल्यासारखे वाटते, हनवटी, मान व डोळें फेकल्यासारखें वाटतात. डोळे, पाठ, छाती व बरगड्या वाकतात व ताठतात. आणि कोरडा व ओला (कफाचा) खोकला उत्पन्न होतो. त्यांत सर्व शरिर हादरल्यासारखे होते, म्हणून त्यास कास असें म्हणतात.

संप्राप्ति

**प्राणो ह्यु दानानुगतः प्रदुष्टःस भिन्नकांस्यस्वनतुल्य घोषः ।**
**निरेति वक्त्रात्सहसा सदोषो मनीषिभिः कास इति प्रदिष्टः ॥**

च. चि. अं ४७७.

प्राणवायु उदान वायुशी मिश्रीत होऊन (उर्ध्वगतिहोऊन फुटक्या काश्याच्या भांड्याच्या नादाप्रमाणें शब्द करीत करीत तो रोग्याच्या तोंडातून कफपित्तयुक्त असा बाहेर पडतो त्या प्रकारच्या होणाऱ्या रोगांस कास असें म्हणतात.

प्रतिघातविशेषेण तस्य वायोः सरंहसः ।
वेदना शब्दवैशिष्टयं कासानामुपजायते ॥८॥ च. चि. अं ४७७.

खालून मज्जाव झालेला वायु जोरानें वर येऊन निरनिराळ्या वेदना व शब्द उत्पन्न होतात.

८ वातकास चिकित्सा

रूक्षस्यानिलजं कासमादौ स्नेहैरुपाचरेत् ।
सर्पिर्भिर्बस्तिभिः पेयाक्षीरयूषरसादिभिः ॥१॥ यो. र. ६४७.

ज्याचा कोठा रूक्ष आहे, अशा वातजन्य खोकल्याला प्रथम तूप, बस्ती, पेज, दुध, व यूष यांचे बरोबर स्नेहन औषधे द्यावी.

९ कफकास चिकित्सा

कफजे वमनं कार्यं कासे लंघनमेव च ।
शस्ता यवाप्रस्तत्कृतियूषाश्च कटुतिक्तकाः ॥ यो. र.

कफकासावर वमन व लंघन करवावे, कफकासावर सातू, सातूचे पदार्थ, सातूचेच यूष आणि तिखट व कडू पदार्थ हे प्रशस्त आहेत.



कफजकास चिकित्सा

बलिनं वमनेनादौ शोधितं कफकासिनम् ।
यवान्नैः कटुरूक्षोष्णैः कासघ्नैश्चाप्युपाचरेत् ॥१२॥ भै. र. ३१६

कफ कासानें पिडीत मनुष्य जर बलवान असेल तर प्रथम वमन देवून तिखट, रूक्ष आणि उष्ण कफनाशक द्रव्यांनी चिकित्सा करावी. तसेंच जवादी धान्याचा भोजनासाठीं उपयोग करावा.

१० कफकासावर यूष

मुद्गामलाभ्यां यवदाडिमाभ्यां कर्कन्धुना शुष्कमूलकेन ।
शुण्ठीकणाभ्यां सकुलत्थकेन यूषो नवांगः कफकासहन्ता ॥२॥
यो. र. ६५१.

मूग आवळकाठी सातु, डाळिंब, बोरें, वाळलेले मुळे, सुंठ पिंपळी व हुलगे यांच्या युषाला (कढण्याला) नवांगयूष म्हणतात. हा कफ कासाचा नाशक आहे.

११ पैत्तिककास चिकित्सा

पित्तकासे तनुकफे त्रिवृत्तां मधुरैर्युताम् ।
दद्याद्घनकफे तिक्तैर्विरेकार्थं युतां भिषक् ॥७॥ भै. र. ३१५

पातळ कफाने युक्त किंवा अल्पकफज पित्तज कासांत विरेचन देण्यासाठीं मधुर औषधांचे चूर्ण किंवा रसाबरोबर निशोत्तराचे मूळाचे चूर्ण द्यावे. तसेंच घट्ट कफ पडणाऱ्या पित्तज कासांत कडू द्रव्यांचे चूर्ण अथवा स्वरसाबरोबर विरेचनासाठीं निशोत्तराचे मूळाचे चूर्ण द्यावे.

१२ क्षतकासचिकित्सा

कासे तु क्षतजे बल्ये पाचनैर्बृंहणैरपि ।
शमनैः पित्तकासघ्नैरन्यैश्च मधुरौषधैः ॥१॥
यवागूं वा पिबेत्सिद्धां क्षतोरस्कः
सुशीतलाम् । यो. र. ६५२.

बलवान् अशा उरःक्षतजन्य कासावर पाचन बृहणं संशमन पित्तकासनाशक व मधुर अशा औषधांनी तयार केलेली पेज थंड करून प्यावी.

१३ क्षय कासचिकित्सा

पिप्पलीगुडसंसिद्धं छागीक्षीरयुतं घृतम् ।
एतदग्निविवृद्धयर्थं सर्पिश्च क्षयकासिनाम् ॥१॥ यो. र. ६५३

पिंपळी व गूळ यांचा कल्क व शेळीचें दूध यांत तूप सिद्ध करुन ते क्षयसंबंधी खोकला असलेल्या रोग्याने अग्नि वाढण्याकरितां द्यावे.

१४ समशर्कर चूर्ण

शुण्ठीकणामरिचनागदलत्वगेलं ।
चूर्णीकृतं क्रमबिवर्धित मूर्ध्वमन्यात् ।
खादेदिदं समसितं गुदजाग्निमांद्य ।
गुल्मारुचिश्वसनकण्ठहृदामयेषु ॥१॥ यो. र. ६५८

सुंठ, मिरी पिंपळी, नागकेशर, दालचिनी, वेलदोडे, ही औषधे शेवटाकडून क्रमानें वाढत्याप्रमाणांत घेऊन चूर्ण करून त्यांत समभाग साखर मिसळून खावे. याला समशर्कर चूर्ण म्हणतात. हे मूळव्याध, अग्निमांद्य, गुल्म, अरूचि, श्वास, कंठरोग व हृदरोग यांवर द्यावे.

१५ कर्पूरादि चूर्ण

कर्पूरवालकंकोलजातीफलदलं समम् ।
लवंगनागमरिचकृष्णाशुंड्यो विवर्धिताः ॥१॥
चूर्ण सितासमं ग्राह्यं रोचनं क्षयकासजित् ।
वैस्वर्यकासश्वासहनं छर्दि चैव क्षयं जयेत् ।

प्रयुक्तं चान्नपानेषु भैषज्यं द्विगुणं हितम् ॥२॥ यो. र. ६५८

कापूर, वाळा, कंकोळ, जायफळ व जायपत्री ही औषधें एक एक भाग लवंग, नागकेशर, मिरी, पिंपळी, सुंठ ही औषधें क्रमाने वाढती घ्यावी. यांचे चूर्ण करून त्याच्या समान साखर घालावी. हें रूचिकारक, क्षयनाशक, स्वरभेद, कासयुक्त खोकला, ओकारी, क्षय नाशक आहे. हें अन्न पानांतून दुप्पट द्यावे म्हणजे हितकारक होते.

## १६ श्रृंगवेरस्वरस

स्वरसं श्रृंगवेरस्थ माणिकेन समन्वितम् ।
पाययेत्तश्वासकासघ्नं प्रतिश्यायकफापहम् ॥१६॥ भै. र. ३१६

आल्याचा ½ ते १ तोळा स्वरस काढून मधामध्यें मिळवून दररोज सेवन केल्यानें श्वास, कास, प्रतिश्याय व कफरोग नाहींसे होतात.

## १७ कासान्तक चूर्ण

त्रिफलाव्योष चूर्णं च समभागं प्रकल्पयेत् ।
मधुना सह पानात्तु दुष्टकासं नियच्छति ॥४३॥ भै. र. ३१८

आवळा, हिरडा, बेहेडा, सुंठ, मिरी, पिंपळी या सर्वांचे समभाग चूर्ण घेऊन मधाबरोबर सेवन केल्यानें उग्र कास देखील नाहीसा होतो.

## १८ भारंगमुळादि चूर्ण

भार्गीशुण्ठीकणाचूर्णं गुडेन श्वासकासनुत् ।
पथ्याशुण्ठीगुडयुतां गुटिकां धारयेन्मुखे ॥२॥
सर्वेषु श्वासकासेषु केवलं वा बिभीतकम् ।
नागरेणाभया तद्वत्कासमाशु व्यपोहति ॥३॥ यो. र. ६५६

भारंगमूळ, सुंठ, पिंपळी यांचे चूर्ण गुळाशी खावे, ते दमा व खोकला यांचा नाश करतें. हिरडे दळ व सुंठ ह्यांच्या चूर्णाची गुळाशी गोळी करून ती सर्व प्रकारच्या श्वास व खोकल्यावर तोंडांत धरावी किंवा केवळ बेहेडा तोंडात धरावा. त्याचप्रमाणें सुंठीशी हिरडा तोंडांत धरावा म्हणजे खोकल्याचा त्वरीत नाश होतो.

## १९ सर्वकासावर गुटिका

पिप्पली पुष्करमूलपथ्याशुण्ठीशटीमूलकसूक्ष्मचूर्णम् ।
गुडेन युक्ता गुटिका प्रयाज्या कासेषु नासास्त्रववैस्तरेच ॥४॥ यो र ६५६

पिंपळी, पोखरमूळ, हिरडेदळ, सुंठ, कचोरा, मुळा यांचे वस्त्रगाळ चूर्ण करून

गूळ मिसळून गोळ्या कराव्यांत. त्या सर्वप्रकारचे खोकल्यावर, पडशावर व स्वर-बदलण्यावर योजाव्यात.

२० खदिरादि गुटिका

खादिरं पौष्करं श्रृंगी कट्फलं जद्वियष्टिका ।
हरीतकी लवंगंच व्योष चातिविषं तथा ॥१॥
कारवी यासममृता बृहतीद्वयमक्षकम् ।
पृथक्कर्षद्वयं ग्राह्यं सूक्ष्मचूर्णं तु कारयेत् ॥२॥
सर्वैः समं खादिरं च मेलयित्वा विभावयेत् ।
दाडिमत्वक्तथा क्षुद्राखदिराम्भोभिरार्द्रकैः ॥३॥
बब्बूलत्वग्दलक्वाथैराटरुषजलैस्तथा ।
सप्तधा भावयेद्दध्वदा गुटिका खादिरी मता ।
कासश्वासौ निहन्त्याशु दुस्तरौ चिरजावपि ॥४॥ यो. र. ६६१

खैराचा कात, पोखरमूळ, काकडशिंगी, कायफळ, भारंगमूळ, हिरडेदळ, लवंग, सुंठ, मिरे, पिंपळी, अतिवीष, बडीशेप, धमासा, गुळवेल, रिंगणीमूळ, डोरलीमूळ, बेहेडेदळ, ही सर्व औषधें दोन दोन तोळें घेऊन चूर्ण करावें. त्या सर्व चूर्णाबरोबर त्यांत काताचे चूण घालून डाळींबाची साल, रिंगणी-खैराची साल, यांचा काढा व आल्याचा रस, बाभळीच्या सालीचा काढा व अडुळशाचा रस यांच्या सातसात भावना द्याव्या व गोळ्या कराव्यांत. त्या फार दिवसांच्या दुस्तर कासश्वासाचा नाश करितात.

२१ मरिचादि गुटिका

मरीचं कर्षमात्रं च पिप्पली कर्षसंमिता ।
अर्धकर्षो यवक्षारः कर्षयुग्मं च दाडिमात् ॥१॥
एतच्चूर्णीकृतं युंजादष्टकर्षं गुडेन हि ।
शातप्रमाणां गुटिकां कृत्वा वक्त्रे च धारयेत् ।
अस्याः प्रभावात्सर्वेऽपि कासा यान्त्येव संक्षयम् ॥ यो. र. ६६०

मिरी, पिंपळी एक एक तोळा, जवखार अर्धा तोळा, डाळिंबाची साल दोन तोळें ह्या सर्वांचे वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांत आठ तोळे गूळ मिसळून तीन माशाच्या गोळ्या करून एकएक गोळी तोंडांत धरावयास द्यावी. या गोळ्यांच्या प्रभावानें सर्व खोकल्यांचा खात्रीनें नाश होतो.

२२ लवंगादि वटी

तुल्या लवंगमरिचाक्षफलत्वचः स्युः ।
सर्वैः समो निगदितः खदिरस्य सारः ।

बब्बूलवल्कलकषाययुजां चतुर्णां ।
कासान्निहन्ति वटिका घटिकाष्टकान्ते ॥ यो. र. ६६०

लवंग, मिरी, बेहेडेदळ, ही समभाग सर्वांचे बरोबरीनें खैराचा कात यांचें चूर्ण करून बाभळीच्या सालीच्या काढ्यांत चार दिवस खल करावा. गोळ्या करून एक एक गोळी तोंडात धरावयास द्यावी. ती आठ घटकेंत खोकला दूर करते.

## २३ मनःशिलादिधूम

मनः शिलालमधुकमांसी मुस्तेंगुदै पिबेत् ।
धूमं तस्यानु च क्षीरं सुखोष्णं सगुडं पिबेत् ॥
एष कासान् पृथग्दोषसन्निपात समुद्भवान् ।
धूमो हन्यादसंसिद्धानन्यैर्योगशतैरपि ॥ च. चि. अं. ४८२

मनशिळ, हरताळ, ज्येष्ठमध, जटमांसी, नागरमोथा, हिंगणबेटाची साल यांचा धूर ओढावा, आणि वरती कोमट दुध गूळ घालून प्यावे, हा धूर निरनिराळ्या दोषांनी उत्पन्न होणारे (वात, पित्त कफ) तसेच सन्नीपाताने उत्पन्न होणारे व दुसऱ्या शेकडो औषधांनीं बरे न होणारे कास नाहीसे होतात.



## २४ एरंडादि क्षारधूम

एरण्डपत्रक्षारं वा व्योषतैलगुडान्वितम् ।
लिह्यादेतेन विधिना सुरसैरण्डपत्रजम् ॥ च. चि. अं. ४९०

एरंड पानांचा क्षार, अथवा तुळस व एरंडाचे पानांचा क्षार हे त्रिकटू, तेल, गूळ या पदार्थांत मिसळून चाटावे.

## २५ मनःशिलाबदरीपत्रधूम

मनःशिलालिप्तदलं बदर्या उपशोषितम् ।
सक्षीरं धूमपानंच महाकास निबर्हणम् ॥ भै. र. ३१८

मनशिळाचा पाण्याबरोबर कल्क करून त्याचा बोरीच्या पानाला लेप करून ती पानें सुकवावी नंतर ही पानें एका परळामध्यें ठेवून ते परळ निर्धूम अशा निखाऱ्यावर ठेवून त्याच्यावर दुसरें परळ झाकावे. त्यास मध्यभागी एक छिद्र ठेवून त्यास रबराची नळी जोडावी व त्यानें धूम्रपान करावे. धूम्रपान झाल्यानंतर दुध प्यावे. हा धूर महाकास नाहींसा करतो.

## २६ मरिचादि धूम

मरिचशिलार्कक्षीरै रर्कीं त्वचमाशुभावितां शुष्काम् ।
कृत्वा विधिना धूमं पिबतः कासाः शमं यान्ति ॥ भै. र. ३१९

काळ्या मिरीचे चूर्ण, मनशिळ, व रूईच्या मूळाच्या सालीचे चूर्ण हे समभाग घेवून ते रूईच्या चिकाबरोबर घोटावे व सुकवावे. हा मरिच्यादि धूम्रपान यथाविधी केल्यानें सर्व प्रकारचे कास नाहीसें होतात.

## २७ पद्मकाष्ठादि चाटण

द्राक्षापद्मकवार्ताकिपिप्पली क्षौद्रसर्पिषा ।
लिह्यात् त्र्यूषणचूर्णं वा पुराणगुडसर्पिषा च. चि. अं. ४९०

द्राक्षे, पद्मकाष्ठ, डोरली, पिंपळी यांचे चूर्ण मध-तुपातून चाटावे किंवा सुंठ, मिरी, पिंपळी यांचे चूर्ण जुना गूळ व तूप यांचे बरोबर चाटावे.

## २८ मरिच्यादि चाटण

लिह्यान्मरिचचूर्णं वा सघृतक्षौद्रशर्करम् ।
सर्वकासहरं श्रेष्ठं लेह्यं कासार्दितो नरः ॥
बदरीपत्रकल्कं वा घृतभृष्टं ससैंधवम् ।
स्वरभेदे च कासे च लेहमेतं प्रयोजयेत् च. चि. अं. ४९१.

मिऱ्याची पूड, तूप, मध व साखर यांत मिळवून कास पिडीत रोग्याने चाटावी. हे चाटण सर्व प्रकारचे खोकले नाहींसे करण्याविषयी श्रेष्ठ आहे. बोरीच्या पानांचा कल्क तुपांत परतून सैंधव घालून त्याचे स्वरभेद व खोकला यावर चाटण द्यावे.

## २९ कंटकार्यवलेह

कण्टकारीतुलां नीरद्रोणे पक्त्वा कषायकम् ।
पादशेषं गृहीत्वा च तस्मिंश्चूर्णानि दापयेत् ॥
पृथक्पलांशान्येतानि गुडूचीचव्यचित्रकम् ।
मुस्ताकर्कट शृंगी च त्र्यूषणं धन्वयासकम् ॥
भार्गी रास्ना शठी चैव शर्करा पलविंशतिः ।
प्रत्येकं च पलान्यष्टौ प्रदद्याद् घृततैलयोः ॥
पक्त्वा लेहत्वमायाते शीते मधुपलाष्टकम् ।
चतुष्पलं तुगाक्षीर्याः पिप्पलीनां चतुष्पलम् ॥
क्षिप्त्वा निदध्यात्सुदृढे मृण्मये भाजने शुभे ।
लेहोऽयं हन्ति कासार्तिहिक्काश्वासान् मृण्मये शेषतः ।

चारशे तोळें रिंगणी वीसशे अठ्ठेचाळीस तोळें पाण्यांत शिजवून चतुर्थांश काढा करावा. नंतर त्यांत गुळवेल, चवक, चित्रक, नागरमोथें, काकडशिंगी, सुंठ, मिरे, पिंपळी धमासा भारंगमूळ, रास्ना, व कचोरा, या औषधांचे चूर्ण चार चार तोळे, साखर ऐंशी तोळे तूप व तेल बत्तीस बत्तीस तोळें घालून लेह तयार करावा, तो थंड झाल्या-

वर त्यांत मध बत्तीस तोळे घालून वंशलोचन व पिंपळी सोळा सोळा तोळे घालावी आणि ढवळून उत्तम मातीच्या भांड्यांत भरून ठेवावा. हा लेह खोकला, श्वास व उचकी यांचा नाश करतो.

वासावलेह

वासकस्वरसप्रस्थे माणिका सितशर्करा ।
पिप्पली द्विपलं दत्वा सर्पिषश्च पचेच्छनैः ॥
लेहीभूते ततः पश्चाच्छीते क्षौद्रपलाष्टकम् ।
दत्वाऽवतारयेद्वैद्यो मात्रया लेहमुत्तमम् ॥
निहन्ति राजयक्ष्माणं कासं श्वासं सुदारुणम् ।
पार्श्वशूलंच हृच्छूलं रक्तपित्तं ज्वरं तथा ॥ भै. र. ३२७

अडूळशाचे पानाचा स्वरस १ प्रस्थ ( ६४ तोळे ) घेऊन तो कल्हई असलेल्या कढईंत ठेवावा. त्यांत खडीसाखरेचें चूर्ण बत्तीस तोळे आणि गाईचें तूप २ पळ (८तो.) घालून त्याचा पाक करावा. थोडा घट्ट झाल्यावर त्यांत पिंपळीचूर्ण २ पळ मिळवून पळाचे दांडीनें घोटावें व खाली उतरून थंड झाल्यावर त्यांत मध ८ पळ (३२ तोळे) मिळवावा व तें कांचेच्या भांड्यांत ठेवावें. मात्रा ४ ते ८ मासे. हा वासावलेह राजयक्ष्मा, कास, श्वास, पार्श्वशूळ, हृद्शूळ, रक्तपित्त आणि ज्वर यांचा नाश करितो.

३१ दाडिमादिलेह

दाडिमादिफलप्रस्थं चतुष्प्रस्थ जले पचेत् ।
चतुर्भागकषायेऽस्मिशर्कराप्रस्थमेव च ॥
नागरं पिप्पलीमुलं कणाधान्यकदीप्यकम् ।
जातीफलं जातिपत्रं मरिचं जीरकं तुगा ॥
विजया निम्बपत्रं च समंगा कूटशाल्मली ।
अरल्वति विषा पाठा लवंगं च पृतक्पलम् ॥
घृतस्य मधुनः प्रस्थं सर्वलेहं विपाचयेत् ।
दाडिम्ब लेहकं नाम ज्वरातीसारनाशनम् ॥
आमरक्तं चाऽऽमशूलं मान्द्यशोफक्षयापहम् :
धातुलीनं धातुगतमश्विभ्यां निर्मितं पुरा ॥

बाळिंबे चौसष्ट तोळे घेऊन तीं दोनशे छपन्न तोळे पाण्यांत शिजवावींत. चवथाई काढा उरला म्हणजे त्या काढ्यांत साखर चौसष्ट तोळे घालून पाक करावा. आणि त्यांत सूंठ, पिंपळमूळ, पिंपळी, धनें, ओवा, जायफळ, जायपत्री, मिरे, जिरे, वंशलोचन, भांग, बाळंतलिंबाचीं पानें, लाजाळू, काळ्या शेवरीची साल, टेटूमूळ,

अतिवीष, पहाडमूळ, लवंग हे जिन्नस चार चार तोळे घेऊन चूर्ण करावें व त्या पाकांत घालावें. आणि तूप व मध ६४ तोळे घालून पुन्हा शिजवावे. लेहाप्रमाण झाल्यावर लेह भांडयांत भरून ठेवावा. याला दाडिमालेह असे म्हणतात. हा ज्वरातीसार, आव, रक्त, आमशूल, अग्निमांद्य, सूज, क्षय, धातुगत धातुविकार यांचा नाश करतो. हा अश्विनीकुमारांनी सांगितला आहे.

## ३२ कासकुठार रस

हिंगुलं मरिचं गन्धं सव्योषं टंकणं तथा ।
द्विगुंजमार्द्रक द्रावैः सन्निपातं सुदारुणम् ।।
कासं नानाविधं हन्ति शिरोरागं सुदुःसहम् ।।

शुद्ध हिंगुळ, काळीमिरी, शुद्ध गंधक, सूंठ, मिरी, लहान पिंपळी व शुद्ध टाकणखार यांचें चूर्ण १–१ तोळा घेऊन प्रथम हिंगूळ व गंधक यांची कज्जली तयार करावी. नंतर राहिलेली सर्व द्रव्यें त्यांत मिळवावीत. खलांत घोटून चूर्ण करावे. याला कासकुठार असें म्हणतास. त्याचें दोन गूंजा चूर्ण आल्याच्या रस व मध यांचेंबरोबर सेवन केल्यानें दारुण सन्निपात, नानाप्रकारचे कास व शिरोरोग यांचा नाश होतो.



## ३३ पंचामृत रस

शुद्धसूतस्य भागैकं भागौ द्वौ गन्धकस्य च ।
भागद्वयं मृतं ताम्रं मरिचं दशभागिकम् ।
मृताभ्रस्य चतुर्भागं भागमेकं विषं क्षिपेत् ।
अम्लेन मर्दयेत्सर्वं माषैकं वातकासनुत् ।।
अनुपान लिहेत्क्षौद्रैबिभीतकफलत्वचम् भै. र. ३१९

शुद्ध पारा १ तोळा, शुद्ध गंधक २ तोळे, ताम्रभस्म २ तोळे, काळी मिरी चूर्ण १० तोळे, अभ्रकभस्म ४ तोळे, शुद्ध बचनागवीष १ तोळा घेऊन प्रथम पारा व गंधकाची कज्जली तयार करावी. नंतर त्यांत लिहिलेलीं द्रव्यें मिळवावीत व कांजी किंवा अम्लवर्ग यापैकी कोणत्याहि एकाचे स्वरसांत किंवा काढयांत १ प्रहरपर्यंत घोटावें. व दोन माशाच्या गोळ्या कराव्यात. हा पंचामृतरस दररोज सेवन केल्यानें वातिक कासाचा नाश होतो. अनुपान म्हणून बेहेडयाचे फळाच्या सालीचें चूर्ण १ मासा घेऊन मधाबरोबर सेवन करावें.

## ३४ कफकुठार रस

पारदं गन्धकं व्योषं मृतं ताम्रं मृतायसम् ।
कंटकारिफलद्रावैर्भाव्यं तद्यामयुग्मकम् ।।

रोहिण्यास्तु रसेनैव धत्तूरस्वरसेन च ।
गुंजाद्वयं पर्णखण्डैर्दैयं श्लेष्मज्वरापहम् ।। र. चं. १४६

पारा, गंधक, सूंठ, मिरे, पिंपळी, ताम्रभस्म व लोहभस्म यांचा एकत्र खल करून त्यास रिंगणीच्या फळाच्या रसाची भावना द्यावी. त्याचप्रमाणे कुटकी व काळा धोतरा यांच्या रसाची एक एक भावना देऊन मग १—१ गुंजेच्या गोळ्या कराव्यात. याला कफकुटार रस असे म्हणतात. याची एकेक गोळी विड्याच्या पानाशी द्यावी, म्हणजे कफज्वराचा नाश होतो.

३५ कासश्वासविधूनत रस

रसभागो भवेदेको गंधकाद्वौ तथैव च ।
यवक्षारस्त्रिभागः स्याद्रुचकं च चतुर्गुणम् ।।
मरिचं पंचभागं स्यात्सुरसारसमर्दितः ।
कासं पंचविधं हन्याच्छ्वासं पंचविधं हरेत् ।। यो. र. ६६८

पारा एक भाग, गंधक दोन भाग, जवखार तीन भाग, पादे लोण चार भाग, मिरी पांच भाग यांचा तुळशीच्या पाल्याच्या रसांत खल करावा. याला कासविधूनन रस म्हणतात. हा पांच प्रकारचे खोकले व पांच प्रकारचे श्वास यांचा नाश करतो.



३६ हेमगर्भ

शुद्धसूतं चतुर्भागं द्विभागं गंधकस्य च ।
भागमेकं सुवर्णं च त्रिभागं शुल्बभस्म च ।।
कुमारीरससंयुक्तं सप्ताहं मर्दयेद् दृढम् ।
गुटिकां कारयेत्तां तु बध्नीयात्खर कर्पटे ।।
वस्त्रे किंचिद्बलिंस्थाप्य तत्र गोलं निधाय च ।
बध्नीयात्पोटलीं गाढां पश्चाद्वस्त्रेण वेष्टयेत् ।।
सर्वभागसमं गंधं दत्वा मृण्मय भाजने ।
तन्मध्ये पोटलीं न्यस्य मुखे मुद्रां च कारयेत् ।।
विधाय छिद्रं मुद्रास्थं द्रावं दृष्ट्वा शलाकया ।
पाचयेत्सिकतायंत्रे रसोऽयं मृदुवन्हिना ।।
यामार्धेन सुसंजातं स्वांगशीतं समुद्धरेत् ।
कासे, श्वासे, क्षये वाते, कफे ग्रहणिकागदे ।
सर्वरोगेषु दातव्या हेमगर्भाख्य पोटली ।। यो. र. ६७१

शुद्ध पारा ४ भाग, गंधक २ भाग, सोने १ भाग, ताम्रभस्म ३ भाग यांचा कोरफडीच्या रसांत सात दिवस खल करावा. नंतर त्याच्या गोळ्या करून एका जाड

कापडांत बांधाव्या, बांधताना कापडांत थोडा गंधक घालून त्याजवर गोळी ठेवून बळकट पोटली बांधून पुन्हा ती पोटली वस्त्राने गुंडाळावी. नंतर सर्वांच्या वजनाइतका शुद्ध गंधक मातीच्या पात्रांतघालून त्यांत ती पुरचुंडी घालून पात्राला मुखमुद्रा करून मुद्रेला एक छिद्र ठेवावें आणि मंदाग्नीवर वालुकायंत्रांत ठेवून गंधक पातळ झाल्यावर सळईनें ढवळावें. ह्या प्रमाणेंअर्धा प्रहर करून स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावे, हा हेमगर्भ पोटलीरस कास,श्वास, क्षय, वात, कफ, संग्रहणी व सर्व रोग याजवर द्यावा.

३७ उन्मत्त भैरवरस

पारदं दरदं शुद्धं गंधकं कज्जलाकृति ।
गजकणा वत्सनागं शुष्ठी चोन्मत्तबीजकम् ॥
जातीफलं जातिपत्रं लवंगं मरिचं तथा ।
अकल्करं समानं स्यान्मर्दयेच्च दिनत्रयम् ॥
आर्द्रकस्य रसेनैव गूटिकां वल्लसन्निभाम् ।
चपला मधुना चैव क्षयश्वासनिबर्हणम् ॥
कफरोगविनाशाय रस उन्मत्तभैरवः ।
अनुपानविशेषेण धातुपुष्टिकरः स्मृताः ॥ यो. र. ६७५

पारा, गंधक, हिंगुळ शुद्ध करून घेऊन कज्जली करावी. नंतर गजपिंपळी, बचनाग, सुंठ, धोतऱ्याचें बी, जायफळ, जायपत्री, लवंग, मिरी, अक्कलखारा हीं सर्व औषधें समभाग घालून आल्याच्या रसांत तीन दिवस खल करून वाल प्रमाणानें गोळचा कराव्यात. हा उन्मत्त भैरव रस मध व पिंपळी याशी द्यावा. म्हणजे क्षयसंबंधीं खोकल्याचें निवारण करतो. हा कफरोगांच्या नाशार्थ सांगितला आहे. हा विशेषप्रकारचें अनुपान योजून दिला असतां धातुपुष्टी करतो.

३८ नागवल्लभ रस

कर्षमाना मृगमदचोचटंकणका अथ ।
काश्मीरजन्मदरद पिप्पल्यः स्युद्रिकर्षिकाः ॥
आकारकरभो जातीपत्री जातीफलं विषम् ।
प्रत्येकं पलमानानि चत्वार्यथ सुखल्वके ॥
अहिवल्लीदल रसैर्मर्दयेच्च दिनत्रयम् ।
मुग्दप्रमाण वटका लीढा मध्वार्द्रक द्रवैः ।
ताम्बूलचर्विता मेहकासक्षयमरुद्धराः ।
नागवल्लभनामाऽयं रसो विश्वोपकारकः यो. र ६७०

कस्तुरी, दालचिनी, टांकणखाराची लाही हीं औषधें एक एक तोळा केशर, शुद्ध हिंगुळ, पिंपळी दोन दोन तोळें, अक्कलकाला, जायपत्री, जायफळ व शुद्ध बचनाग चार चार तोळे, या सर्वांचा नागवेलीच्या पानांच्या रसांत तीन दिवस खल करावा आणि मुगाएवढी गोळी करून ती आल्याचा रस व मध यांतून भक्षण करावी आणि वर विडा खावा. सर्व जगावर उपकार करणारा असा हा नागवल्लभ रस प्रमेह, खोकला, क्षय, वातविकार यांचा नाशक आहे.

## ३९ आनंदभैरव

हिंगुलं च विषं व्योषं टंकणं गंधकं समम् ।
जंबीररससंयुक्तं मर्दयेद् यामकद्वयम् ॥
कासश्वासातिसारेषु ग्रहण्यां सन्निपातिके ।
अपस्मारेऽनिले मेहेप्यजीर्णे वन्हिमांद्यके ॥
गुंजामात्रः प्रदातव्यो रस आनंदभैरवः ॥ र. चं. १९१

हिंगुळ, बचनाग, सुंठ, मिरे, पिंपळी, टांकणखार, गंधक हीं समभाग घेऊन यांचा सर्वांचा लिंबाच्या रसांत चांगला दोन प्रहरपर्यंत खल करावा, कांस, श्वास, अतिसार, संग्रहणी, सन्नीपात, अपस्मार, वातविकार, प्रमेह, अजीर्ण व अग्निमांद्य या विकारावर अनुपान योजून १-१ गुंज प्रमाणाने द्यावा. याला आनंदभैरवरस असें म्हणतात.

## ४० नागरस

लवंग जातीफल जातिपत्रिकास्तथैच नागोषणग्रन्थिकानि ।
कर्ष प्रमाणानि तथैकशाणं कस्तुरिका कुंकुमयोः प्रयुंज्यात् ॥
आर्द्राम्बुनाऽथ विहिता वटिका त्रिगुंजा ।
चार्द्राऽऽम्मसाऽपि विनिहन्ति कफक्षयादीन् ।
किं स्वासकासं जठरस्थ शूलं नानानुपानैः सकलामयघ्नः ॥ र. चं.

लवंग, जायफळ, जायपत्री, शिश्याचें भस्म, मिरे व पिंपळामूळ ही औषधे एक एक तोळा, कस्तुरी पाव तोळा व केशर पाव तोळा, सर्वांचा आल्याच्या रसांत खल करून तीन तीन गंजेच्या गोळया कराव्या. यातील एक एक गोळी कफक्षयादिकावर दिली असतां ती त्या रोगाचा नाश करिते, मनश्वास, खोकला व शूळ यांचा नाश करील. हा नागरस निरनिराळें अनुपान योजून दिला असतां सर्व रोगांचा नाश करितो.

## ४१ सितोपलादी चूर्ण

सितोपला षोडश स्यादष्टौ स्याद्वंशरोचना ।
पिप्पली स्याच्चतुष्कर्णा एलास्याच्च द्विकर्षिका ॥
एककर्षस्त्वचः कार्यश्चूर्णयेत्सर्वमेकतः ।
सितोपलादिकं चूर्णं मधुसर्पियुतं लिहेत् ॥
कासश्वासक्षयहरं हस्तपादांगदाहजित् ।
मंदाग्नि सुप्तजिव्हत्वं पार्श्वशूलमरोचकम् ॥
ज्वरमूर्ध्वगतं रक्तपित्तमाशु व्यपोहति । यो. र. ५९६

खडीसाखर सोळा तोळे. वंशलोचन आठ तोळे, पिंपळी चार तोळे, वेलदोडयाचें दाणे दोन तोळें व दालचिनी एक तोळा यांचें एकत्र चूर्ण करावें, हे सितोपलादि चूर्ण तूप व मध याशी घ्यावें. हें खोकला, श्वास, क्षय, हात, पाय, अंग यांचा दाह, अग्निमांद्य जिव्हेचे जडत्व, बरगडयांतील शूल, अरूचि, ज्वर व उर्ध्वगामी रक्तपित्त यांचा वरीत नाश करितें.

## ४२ पथ्यापथ्य

शालिषष्टिक गोधूममाषमुग्दकुलत्थकाः ।
छाग्याः पयो घृतं बिम्बी वार्ताकं बालमूलकम् ॥
कासमर्दक जीवन्ती वास्तुकं बीजपूरकम् ।
गोस्तनी लशुनं लाजा व्योषमुष्णोदकं मधु ॥
पथ्यमेतद्यथादोषमुक्तं कासगदातुरे । यो. र. ६७५

साठचासाळीं, गहू, उडीद. मूग, हुलगे, शेळीचे दूध, तूप, तोंडली, वांगी, कोवळे मुळे कासविंदा, हरण दोडी, चंदन बटवा, महाळुंग, गोस्तनी, मनुका, लसूण, लाह्या. सुंठ, मिरी, पिंपळी, ऊन पाणी व मध हे पथ्य खोकलेकऱ्याला दोषानुरूप सांगितले आहे.

मैथुनं स्निग्धमधुरं दिवास्वापं पयो दधि ।
पिष्टान्नं पायसादीनि कासी धूमं च वर्जयेत् ॥ यो. र. ६७६

मैथून, स्निग्ध व मधुर पदार्थ, दिवसा निजणें, दूध, दहि, पिष्टमय अन्न, खीर वगैरे पक्वान्नें व धूर घेणें हें खोकलेकऱ्यानें वर्ज करावेत.

## ४३ डांग्याखोकल्यावर उत्तम योग

१ नौसागर, जवखार, काळे मीठ, खुरासनी ओवा, रिंगणी, सुहागा, किरमाणी ओवा, हें सर्व समभाग प्रमाणांत परळांत घालून बंद करून राख करावी, ती ४ ते ८ गुंजा दुधाचे सायीतून ३ वेळ द्यावी.

२ सितोपलादि चूर्ण २ मासे, मृगशृंगभस्म ४ गुं. अभ्रकभस्म २ गुं. समीरगजकेसरी १ गुं. व गेरू २ गुं. या सर्वांच्या ६ पुडचा करून, दुधाच्या सायीमधून चाटवावे. हें प्रमाण १ ते ३ वर्ष मुलांना उपयोगी आहे. जरूरीप्रमाणे प्रमाण कमी जास्त करावे.

| ३ अस्मानतारा, | कापूर, | नवसागर, | साखर, | जेष्टमधचूर्ण, | बेहाडाटरफल. |
|---|---|---|---|---|---|
| १ भाग, | १ भाग | ४ भा. | ५ भा. | ३० भा. | २० भा. |

जेष्ठमधशिरा १० भाग यांचा सर्वांचा अडुळशाचे रसांत तीन दिवस खल करावा व गोळचा कराव्यात. तोंडांत धरावी व बरीबर खडीसाखरेचे गडे धरावेत.

४ डांग्या खोकल्यांत (उलटीवर) समीरपन्नग, वांतीहृद्रस, कफकुठार सितोपलादी द्यावे.

५ तुरटीची लाही २ ते ४ गुंजा खडीसाखरेंतून द्यावी.

## ४४ डांग्या खोकल्यावर उपयुक्त सूचना

वातामुळे होणारा खोकला त्याचे दोन प्रकार आहेत.

लहान मुलास होणारा डांग्या खोकला हा वातविकृतिमुळेंच होतो. या खोकल्यांत वातानें श्वास वाहिनीचें आकुंचन होते. यांत खालील प्रमाणें उपचार करावें.

लोणी थोडे थोडे खाण्यास द्यावे. त्याने उबळीचा त्रास थोडा कमी होतो.

२ सोनचाफा अगर बकुळीचे फूल १ तोळा घेऊन १/२ शेर पाण्यांत उकळून १/८ काढा करून तो ५ तोळे शिल्लक राहिल्यावर त्यांत थोडी खडी साखर घालून ते पाणी थोडे थोडे एक चमचा पाजावें.

३ कंटकार्यावलेह दिवसांतून ३–४ वेळां चाटावा.

४ शौच साफ होत नसल्यास एरंडतेल २॥ तोळे द्यावें. त्यामुळे ३ जुलाब होतील.

५ थंड हवा व थंड पदार्थ खाणें पिणें वर्ज्य करावे.

६ पिण्याकरितां पाणी तापवून थंड केलेलें असावें.

७ गाईचे ताजें तूप सैंधव घालून चाटावे किंवा गरम दुधांत किंवा पेजेंत घालून प्यावें.

## ४५ प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा

खोकला नवीनच असल्यास त्यावर खालील उपचार करावे.

| | |
|---|---|
| १) श्वासकुठार ६ गुं.<br>सितोपलादि चूर्ण ४ मासे | ४ पुडचा करून दिवसांतून ४ वेळ–सकाळी, दुपारी, सायंकाळी व रात्री १० ला मधांतून वासावलेह किंवा दाडिमासवातुन द्यावा. ४–५ दिवसांत खोकला जाईल. |

कफ जास्त पडत असल्यास—

गेळफळ ३ मासे सैंधव २ मासे व मध १ मासा सर्व गरम पाण्यांत मिसळून द्यावे नंतर पुढील औषध सुरु करावे.

| | |
|---|---|
| श्वासकुठार ६ गुंज<br>आनंदभैरव ६ गुंज<br>सितोपलादि चूर्ण ४ मासे | ४ पुड्या करून वरील वेळाप्रमाणें आल्याचा रस व मध यातून किंवा वासावलेहांतून द्याव्या. |

४-५ दिवस वरील औषध दिल्यानें कफ पडणें कमी न झाल्यास श्वासकुठार व आनंदभैरव यांचें प्रमाण ८-८ गुंजा करावे. कित्येक वेळा कफ पडणें फारसे कमी न झाल्यास वरील दोन्ही औषधोचें प्रमाण १०-१० गुंजा वाढवावें लागेल पण इतकें जास्त प्रमाण क्वचित वेळाच करावें. व सितोपलादि चूर्णाचें प्रमाण ४ मासेवरून ६ मासेपर्यंत वाढवावें लागेल म्हणजे प्रत्येक पुडींत त्या चुर्णाचें प्रमाण १॥ मासा येईल. याप्रमाणें वरील योगांतील तीनहि औषधीचे प्रमाण वाढवावे लागेल.

विशेष सूचना-रबर बॅगमध्यें गरम पाणी भरून त्यानें अगर गरम पाणी भरलेल्या बाटलीनें शेकावें. किंवा शेगडीवर कपडा गरम करून कफ पडत आहे. तोपर्यंत शेकत जावे. व लवंगादि वटी कर्पूरादिवटी खदिरादिवटीच्या २-२ गोळ्या तोंडांत ठेवाव्या. जास्त खोकल्यामुळे रात्री झोप येत नसेल तर वरील औषध चालूच ठेवून रात्री निजते वेळेस समीरगज केसरी १ गुंज पाण्याबरोबर द्यावी म्हणजे रात्री झोप लागेल. त्रास फारच कमी होईल पाहटेस ३ वाजतापासून खोकला चालू होत असेल तर समीरगज केसरी रात्री न घेतां पाहटे ३ वाजतांच पाण्याबरोबर द्यावी.

खोकल्याबरोबर दमाहि सुरू होत असेल व रोगी फार अशक्त नसेल तर खालील योजना सुरू करावी.

| | |
|---|---|
| श्वासकुठार ६ गुं.<br>आनंदभैरव ६ गुं.<br>समीरपन्नग ४ गुं.<br>मल्लसिंदूर ४ गुं. | या सर्वांच्या ४ पुड्या करून दिवसांतून ३ किंवा ४ वेळ मधातून किंवा कंटकारी अवलेहातून द्याव्या किंवा मध व आल्याच्या रसातून द्याव्या. फारच अशक्त प्रकृती असेल तर वरील औषधीचें प्रमाण थोडें थोडें कमी करावें. तीन |

चार दिवसांनी थोडे प्रमाण वाढवावे.

विशेष-खोकला व दमा ज्यास्त प्रमाणांत जेव्हा सुरू होत असेल त्यावेंळेस समीर गजकेसरी १ गुंज पाण्याबरोबर घ्यावी. त्यामूळे रोग्याला अर्ध्या तासाने खात्रीने आराम वाटेल.

(२) छाती शेकत जावी.

(३) छातीला नारायणतेल सेंधव व कापूर घालून चोळीत जावें व वरून शेकत जावे.

(४) कर्पूरादिवटी, लवंगादिवटी, खदिरादिवटी यांच्या दोन दोन गोळ्या खडीसाखरेबरोबर तोंडांत ठेवीत जाव्या.

(५) पित्तयुक्त खोकला असेल व कफ फारसा नसून बहुतेक कोरडाच असेल तर–

श्वासकुठार ८ गुंजा
सितोपलादि ४ मासे
दाडिमाष्टकचूर्ण ४ मासे
मृगशृंगचूर्ण ४ गुं.

४ पुड्या दुधांत खडीसाखर घालून किंवा दाडिमावलेहांत द्याव्या. व तोंडांत लवंगादिवटी व खडीसाखर धरीत जावी. व थोडी खडीसाखर अधून मधून देत जावी. जास्त उबळ येऊन झोपमोड होत असल्यास त्यावेळेस समीरगज केसरी १ गुंज पाण्याबरोबर द्यावी.

फारच अशक्तपणा आला असेल तर वरील औषधाबरोबर सकाळीं किंवा रात्रीं फक्त १ वेळ शक्तिकरितां लक्ष्मीविलास १ गुंज मधांतून देत जावा व रात्रीं १ वेळ हेमगर्भ ½ गुंज मधांतून चाटवावा.

## ४६ कासरोगावर उपयुक्त सुचना

खोकला-४ । ५ दिवस औषध देऊन तो कमी होत नसेल तर गेळफळ ३ ते ६ मासे सैंधव २ ते ३ मासे, मध १ मासा हे सर्व पदार्थ दीड पाव कोमट पाण्यांत एक तोळा तूप मिसळून पाजावे. त्याने २-३ वांत्या होतील किंवा पाव दीड पाव अशा कोमट पाण्यांत मूठभर मीठ घालून तें पाणी पाजावें. त्यामुळेहि वांत्या होतील. वरील दोन योगांपैकी कोणताहि एक योग करावा. वांति न झाल्यास दुसरें दिवशीं पुन्हां तेंच द्यावे. दुसरें दिवशीं इच्छाभेदी किंवा नाराचाच रस १ ते २ गुंज द्यावा. त्यामुळे २-३ जुलाब होतील. त्यामुळे कोठा साफ होऊन उरस्थानांतील बराचसा कफ बाहेर निघून जाईल. किंवा रोगी अशक्त असेल तर एरंडेल २॥ तोळे चहांत किंवा गरम दुधांत घालून किंवा नुसते तेंच पाजून द्यावे. किंवा हिरडे व निशोत्तर याचें चूर्ण किंवा काढा करून द्यावा. याने कोठा साफ होतो.

जोराचा खोकला असल्यास छाती शेकावी. त्याचप्रमाणे गळाहि शेकावा. पण शेकण्याचें अगोदर नारायणतेल चोळून नंतर शेकावें. पडजीभ व गळ्यांतील गाठी वाढल्या असल्यास टाकणखाराची लाई-चूर्ण करून मधांतून कापसाच्या कंचोळीने वाढलेल्या पडजीभेला व गाठींना व घशाला लावावें. त्यामुळे निघणारी चिकट लाळ निघूं द्यावी व नंतर मीठ घातलेल्या गरम पाण्याने गुळण्या कराव्या.

उबळ वारंवार येत असेल तर खदिरादि गुटिका, लवंगादि गुटिका यापैकी कोणत्याहि १-२ गोळ्या खडीसाखरेबरोबर तोंडांत धरल्यास तितका त्रास होणार नाही. व खोकलाहि वरचेवर येणार नाही. दररोज ह्या उबळी फारच त्रास देत असतील तर उबळ येण्याचे वेळेस एक गुंज समीरगज केसरी पाण्याबरोबर द्यावी.

हेमगर्भ १ गुंज, आल्याच्या रसांतून थोडा, मध घालून देत जावा.

खोकल्याचा विकार कोणत्याहि दोषामुळे झाला असला तरी तो उरांत म्हणजे कफस्थानांत होतो. म्हणून त्यावर कफनाशक असाच इलाज केला पाहिजे. कफ वाढणार नाही असेच खाणेंपिणें औषध याकडे लक्ष देत गेलें पाहिजे अंगांत गरम कपडे असावे. गळ्याला गरम रूमाल असावा खोकला झाला असता थंड पाणी पिऊं नये. तसेच दही, ताक आंबट, स्निग्ध व थंड पदार्थ हे वर्ज्य करावे. भात हा पदार्थ फारच कमी खावा.

रात्री खोकला जास्त येत असेल तर पाणी गरम करून थोडे सैंधव घालून पाजावे व पाहाटे खोकला जास्त आल्यासहि वरील प्रमाणें सैंधव घातलेलें गरम पाणी प्यावें म्हणजे खोकल्याचा फार त्रास होणार नाहीं. रात्री निजतांना किंवा पाहटे ३-४ वाजतां खोकल्याची उबळ येत असल्यास मोठ्या मनुष्याने समीरगज केसरी १ गुंज पाण्याबरोबर घ्यावी म्हणजे २० मिनिटांत खोकला थांबून झोप येईल. रात्री जास्त खोकला येणारांनीं रात्री न जेवता हलके पेय घ्यावें.

# श्वासचिकित्साप्रकरण

## अध्याय १०

### १ श्वासरोगाचे संक्षिप्त वर्णन व उपचार

श्वासोच्छ्वासाची जी नेहमीची गति, ती वाढली म्हणजे श्वास झाला असे म्हणतात. ती गति बिघडण्याचें कारण असें की वायु व कफ हे दोन्ही दोष प्राणवायु वाहणारे स्रोतसात बिघडवितात. कफाने स्रोतसाची पोकळी कमी होते. व वायूने स्रोतसांचा लवचीकपणा कमी होतो. त्यामुळे उरांतील प्राणावह स्रोतसे श्वासोच्छ्वास करतांना वायूने पूर्णपणें भरत नाहीत. म्हणून श्वासोच्छ्वास जलद करावें लागतात. स्रोतसे कफाने भरलीं असल्यामुळे श्वासोच्छ्वासाचे वेळीं आवाज होतो. व वायू बाहेर येण्यास त्रास होतो. यासच त्रास म्हणतात. श्वास रोग जुना झाला म्हणजे प्राणावह स्रोतसे गांठाळलेलीं व वेडीवाकडी होतात. आणि त्यांचा लवचीकपणा फारच कमी होतो. प्राणवायू विकृत होऊन, कफाशीं मिसळून ऊर्ध्वगामी होतो व श्वास उत्पन्न करितो.



श्वास रोगाची ओळख—सकाळीं उठल्याबरोबर श्वास भरून येणें, उठतांना दम लागणें, सायंकाळींहि श्वास भरून येणें, भरलेली बादली उचलून थोडी दूर नेली असतांहि दम भरून येणें, तसेंच जिना उतरत असतांनाहि दम लागणें किंवा किंचित् श्रम केले तरीहि श्वास लागणें ही श्वास रोगाची ओळख आहे.

### २ श्वासावर उपचार

रोगांत प्राणवह स्रोतसांत कफाधिक्य झाल्यामुळे प्राणवायूच्या श्वासोच्छ्वासांत कार्यात अडथळा उत्पन्न होतो. त्यामुळे श्वासरोग उत्पन्न होतो. कफाधिक्य असलेल्या श्वासरोगांत ओकारीचें औषध देऊन वांतिवाटें कफ बाहेर काढून टाकावा. नंतर एरंडेल २॥ तोळे द्यावे. त्यामुळे दोन, तीन जुलाब होऊन त्यांत आमाशयांतील बराचसा कफ निघून जाईल. त्याशिवाय कफ पातळ होण्याकरितां व वायूचें अनुलोमन होण्याकरितां नारायणतेल त्यांत कापूर व सैंधव घालून गरम करून छातीला चोळावे. व वरून बरेच शेकावें. त्याचबरोबर पोट व पाठहि शेकावी. गरम पाण्याच्या बॅगने किंवा बाटलीने शेकावें किंवा जवसाचें त्यांत हळद व तूप घालून, शिजवून तयार होऊन केलेलें पोटीस छातीवर गरम असतांनाच बांधावें. त्यामुळे छातीतील स्रोतसांत चिकटून बसलेला कफ पातळ निघून जातो. त्यामुळे श्वास रोग्यास बराच आराम

वाटतो. पहिल्या जुलाबानंतर ५-६ दिवसांनी पुन्हा एक जुलाब द्यावा. त्याने शेकल्यामुळे पातळ झालेला कफ पुष्कळसा बाहेर निघून जाईल. श्वासावर रेचक औषध फारच गुणकारी आहे. श्वास रोगांत श्वासकुठार, कफकुठार, श्वासकासविधूनन समीरपन्नग, मल्लसिंदूर, हेमगर्भ, समीरगजकेसरी, कुचलाचूर्ण या औषधींपैकी कोण तीहि दोन किंवा तीन औषधें योग्य प्रमाणांत एकत्र मिसळून दाडिमावलेह, द्राक्षासव, किंवा आल्याचा रस मध घालून दिवसांतून तीन किंवा चार वेळ घ्यावे. व दररोज शेकणें सुरूं ठेवावे. दम्याच्या तीव्र वेगांत समीरगजकेसरी एकगुंज पाण्याबरोबर द्यावी यानें दम्याचा पुष्कळसा वेग कमी होऊन आजाऱ्याला आराम वाटेल. याविषयी औषधाचे योग पुढे दिलें आहेत. शिवाय पुढे सांगितलेल्या धूम्रयोगापैकीं एकादा योग दररोज करीत जावा.

३ पुढील रोगांत श्वास उत्पन्न होतो

कास, वमन, पांडुरोग, ज्वर, मर्मस्थानीं पिडा, आमाशय विकृति, विष, प्रतिश्याय क्षय, रक्तपित्त, उदावर्त, विषूचिका, अलसक, अतिधूम्रपान, अतिस्त्रीसंग.

४ श्वासाची संप्राप्ती

प्रकोप रुद्ध गमनः पवनो विश्वगास्थितः ।
लीनं सूक्ष्मस्त्रोतः श्लिष्टं मलं कफाख्यं स्वेधुग्रथितः कफाः ।।

मलरूप प्राप्त झालेला कफ बारीक बारीक कणरूपाने सूक्ष्मस्त्रोतसांत चिटकून राहतो. स्त्रोतसे कफाने अवरुद्ध झाल्यामुळे वायुच्या संचाराला अडथळा उत्पन्न होतो. त्यामुळे तेथील वायु सबंध उरांत पसरतो.

५ श्वासाची संप्राप्ती

मारुतः प्राणवाहीनि स्त्रोतांस्याविश्य दुष्यति ।
उरःस्थः कफमुद्धूय हिक्काश्वासान् करोति सः ।
घोरान् प्राणोपरोधाय प्राणिनां पञ्च पञ्च च । च. चि. अंक ४६३

वायु हा प्राणवह स्त्रोतसामध्यें प्रवेश करून तेथें कुपोत होतो. छातीमध्यें असलेल्या कफाला वरच्या दिशेने फेकून प्राणवायूचा अवरोध करून पांच पांच प्रकारचें घोर, हिक्का व श्वास उत्पन्न करतो.

६ श्वासवाताचे अनुलोमन

उदीर्यते भृशतरं मार्गरोधाद् बहज्जलम् ।
यथा तथाऽनिलस्तस्य मार्ग नित्यं विशोधयेत् ।। च. चि. अं. ४७

वहात असलेल्या पाण्यास बांध घातला तर तें जसें वाढत जाते तसेंच वाताचें आहे. त्यासाठीं वाताचा मार्ग नेहमी शुद्ध करावयास पाहिजे.

७ श्वासांला हितकारक अन्नपेय

यत्किंचित् कफवातघ्नमुष्णं वातानुलोमनम् ।
भेषजं पानमन्नं वातद्धितं श्वासहिक्किने ॥ च. चि. क्रं. ४७५

कफवातनाशक, उष्णवातानुलोमन असें औषध अन्न अथवा पेय हें श्वास किंवा हिक्का यावर हितकारक आहे.

८ श्वासांत पंचकर्म चिकित्सा

स्नेहबस्तिमृते केचिद्रूर्ध्वं चाधश्च शोधनम् ।
मृदु प्रणयतां श्रेष्ठं श्वासिनामा दिशन्ति हि ।
सर्वेषु श्वासरोगेषु वातश्लेष्मनिबर्हणम् ।
विदधीत विधिं विद्वानादौ स्वेदं मृदूं तथा ॥ यो. र. ६८९

ज्यांचा श्वास अल्प प्रमाणांत आहे, अशा श्वासाचे रोग्याला स्नेहबस्ति खेरीज करून इतर बस्ती व मृदु असें वमन विरेचन देऊन शोधन करणें उत्तम, असें कित्येक म्हणतात. सर्व श्वासविकारामध्ये वात कफ नाशक क्रिया करावी. त्याचप्रमाणें मृदु स्नेहनहि करावे.

८ (अ) श्वासचिकित्साकर्म

हिक्काश्वासार्दितं स्निग्धैरादौ स्वेदैरुपाचरेत् ।
आक्तं लवणतैलेन नाडीप्रस्तर संकरः ॥
तैरस्य ग्रथितः श्लेष्मा स्रोतः स्वभिविलीयते ।
खानिमार्दवमायान्ति ततो वातानुलोमता ॥ चरक चि. अंक ४६८

हिक्का–श्वास असलेल्या रोग्याला प्रारंभी स्नेहन, स्वेदनद्वारा उपचार करावे. प्रारंभी सैंधव घातलेलें तेल लावून नाडी, प्रस्तर किंवा संकर या प्रकारचें स्निग्ध स्वेदन करावें. त्याचें योगानें स्रोतसांत गाठाळून चिकटून बसलेला कफ पातळ होतो. स्रोतसे मृदु होतात व त्या योगें वाताचें अनुलोमन होतें.

८ (ब) श्वासावर चिकित्साकर्म

ततः श्लेष्माणि संवृद्धे वमनं पाययेत्तु तम् ।
पिप्पली सैंधवक्षौद्रयुक्तं वाताविरोधि यत् ॥
निर्हृते सुखमाप्नोति सकफे दुष्टविग्रहे ।

स्रोतः सु च विशुद्धेषु चरत्यविहतोऽनिलः ।।
लीनश्चेद्दोषशेषः स्याद्धूमैस्तं निर्हरेद् बुधः । च. चि. अंक ४६८

कफ वाढल्यानंतर वायूला अडथळा करणार नाही अशी सैंधव पिंपळीं, मध यांनी युक्त असें वमन ( वमनकारक काढा ) द्यावे.

कुपीत झालेला कफ निघून गेल्यावर रोग्यास सुख वाटतें व स्रोतसे शुद्ध झाल्यावर वाताचे गतीस अडथळे निर्माण होत नाहीत.

कांही दोष शरीरामध्यें विलीन झालें तर तें नाहीसे करण्यासाठीं धूमयोगाचा अवलंब करावा.

९ श्वासरोग्यांला स्वेद

तदार्त्तञ्च पूर्वं स्वेदैरुपाचरेत् ।
स्निग्धैर्लवण तैलाक्तं तैः खेषु ग्रथितः कफः ।।
सुलीनोऽपि विलीनोऽथ कोष्ठं प्राप्तः सुनिर्हरः ।
स्रोतसां स्यान्मृदुत्वंच मारुतस्यानुलोमता ।। अ. हृ. चि. अ. ४ श्लो. १२

श्वासरोगाने पिडीत झालेल्या रोग्याला स्निग्ध व लवणयुक्त औषधींनी सिद्ध केलेल्या तेलानें स्वेद द्यावा. त्याने सर्व स्रोतसांत ग्रथीत झालेला कफ पातळ होऊन कोठ्यांत येईल तेथून तो बाहेर काढावा त्यामुळे सर्व स्रोतसें मृदु होऊन वाताचें अनुलोमन होईल.

अनुबन्धज चिकित्सा

१० स्वेद कोणाला देऊ नये

न स्वेद्याः पित्तदाहार्ता रक्तस्वेदातिवर्तिनः ।
क्षीणधातुबला रुक्षा गर्भिण्यश्चापि पित्तला: ।।

पित्त व दाहाने पिडीत असलेले, अधिक रक्तस्राव व स्वेदस्राव होणारे, ज्यांचें धातूबल दुर्बल आहे असें, रुक्ष प्रकृतींचें पित्त प्रकृती असलेले, तसेंच गर्भिणी स्त्रिया यांना स्वेदन योग्य नाही.

कोष्णः काममुरः कण्ठं स्नेहसेकैः सशर्करैः ।
उत्कारि कोपनाहैश्च मृदुभिः स्वेदयेत् क्षणम् ।। च. चि. अं. ४७०

तरी पण त्यांची छाती व गळा यावर साखर घातलेल्या कोमटशा, स्निग्ध सेचनानी किंवा सौम्य अशा उष्ण पोटीसांनी क्षणभर शेक करावा.

श्वासावर पोटीस

तिलोमामाषगोधूम चूर्णैर्वात हरैः सह ।
स्नेहैश्चोत्कारिका साम्लैः सक्षीरैर्वा कृताहिता च. चि. अं. ४७०

तीळ, अळशीचें बी, उडीद, गहू यांचें चूर्ण, तूप, तेल इ. स्नेहाबरोबर किंवा दूधाबरोबर आम्लपदार्थ घालून तयार केलेलें पोटीस हितकारक आहे. यानें उत्तम स्वेदन होते.

११ श्वासावर क्वाथ

कुलत्थ नागर व्याघ्री वासाभि: क्वथितं जलम् ।
पीतं पौष्कर संयुक्तं श्वासकास निवारणम् ।। यो. र. ६८९

कुळीथ, सुंठ, रिंगणीमूळ व अडुळसा यांचा काढा, पोखरमुळाचें चूर्ण घालून प्यावा. तो कास–श्वास नाशक आहे.

दशमूलीकृत: क्वाथ: पौष्करेणाव चूर्णित: ।
श्वासकासप्रशमन: पार्श्वशूलनिवारण: ।। यो. र. ६९०

दशमूळाचा काढा, पोखरमुळाचें चूर्ण घालून घ्यावा. तो श्वास, कास व कुशीतील शुल यांचा नाश करितो.

वासाहरिद्राधनिकागुडूची भार्गीकणानागररिंगणीनाम् ।
क्वाथेन मारीचरजोन्वितेन श्वास: शमं याति न कस्यपुंस: ।। यो. र. ६९०

अडुळसा, हळद, धणीं, गुळवेल, भारंगमूळ, पिंपळी, सुंठ, रिंगणीमूळ यांचा काढा मिऱ्याची पूड घालून घेतला असतां कोणाचा श्वास शमन होत नाही ?

भार्गी नागरयो: क्वाथं श्वासत्राणाय पाययेत् ।। यो. र. ६०

श्वासापासून मुक्त होण्याकरितां भारंगमूळ, सुंठ यांचा काढा, प्यावयास द्यावा.

## अवलेह

१२ श्वासावर अवलेह

गुडं कटुकतैलेन मिश्रयित्वा समं लिहेत् ।।
त्रि:सप्ताहप्रयोगेण श्वासो नि:शे तां व्रजेत् ।। यो. र. ६९२

शिरसाचें तेलाबरोबर गुळ चाटावा. हा प्रयोग एकवीस दिवस केल्यास श्वास नि:शेष बरा होतो.

१३ श्वासावर चूर्ण

गुडोषण निशारास्ना द्राक्षामार्गधिका: समा: ।
तैलेनचुर्णीता लीढास्तीव्रश्वासनुद: स्मृता: ।। यो. र. ६९१

गुळ, मिरी, हळद, रास्ना, मनुका व पिंपळी यांचें चूर्ण करून शिरसतेलाशीं चाटावें. तें तीव्र श्वासाचा नाश करिते.

मर्कटीनां तु बीजानां चूर्णं माक्षिक सर्पिषा ।
प्रलिह्य प्रातरुत्थाय श्वासार्तः स्वास्थ्यमाप्नुयात् ॥ यो. र. ६९१

कवचबीजाचें चूर्ण मध व तुपाशीं प्रातःकाळीं चाटावे. म्हणजे श्वासाचें रोग्याला स्वस्थपणा मिळतो.

हरिद्रा मरिचं द्राक्षा गुडोरास्ना कणा शठी ।
कटुतैले लिहन् हन्यात् श्वासान् प्राणहरानपि ॥ यो. र. ६९२

हळद, मिरे, मनुका, गुळ, रास्ना, पिंपळी कचोरा, यांचें चूर्ण सिरसेलाशीं चाटावें. म्हणजे प्राणहर अशा श्वासाचेंहि निवारण होते.

भार्गी नागरयोश्चूर्णं लीढमार्द्रक वारिणा ।
श्वासं निहंति दुर्धर्षं पंचानन इवद्विपम् ॥

भारंगमूळ व सुंठ ह्यांचें चूर्ण आल्याच्या रसाशी चाटावें. तें सिंह जसा हत्तीचा नाश करितो. त्याचप्रमाणे दुर्धर श्वासाचा नाश करिते.

## १४ श्वासकुठार

रसो गन्धो विषं चैव टंकणं च मनःशिला।
एतानि टंकमात्राणि मरिचं चाष्टटंककम् ॥
एकैकं मरिचं दत्वा खल्वे सूक्ष्मं विमर्दयेत् ।
त्रिकटु टंकमात्रं च दत्वा पश्चाद्विचूर्णयेत् ।
सर्वमेकत्र संयोज्यं काचकूप्यां विनिक्षिपेत् ।
कासे श्वासे च मंदाग्नौ वातश्लेष्मामयेषु च ॥
गुंजामात्रं प्रदातव्यं पर्णखंडेन धीमता ।
सन्निपाते च मूर्छायामपस्मारे तथा पुनः ॥
अतिमोहत्वमापन्ने नस्यं दत्वा विचक्षणः ।
रसः श्वासकुठारोऽयं सर्वश्वासविकारहा ॥

पारा, गंधक, बचनाग, टांकणखार व मनशीळ हीं सर्व समभाग आणि मिरी आठभाग. मिऱ्याशिवाय सर्व जिनसांचा बारीक खल करून एक एक मिऱ्याचा दाणा घालून सूक्ष्म खल करावा. नंतर तीन मासे त्रिकूट चूर्ण घालून पुन्हा खल करावा. आणि कांचेच्या शिशींत भरून ठेवावा, आणि खोकला, श्वास, अग्निमांद्य, वातकफजन्य विकार यावर एक गुंजभर विड्यांच्या पानाशीं द्यावा. आणि सन्निपात, मूर्च्छा, अपस्मार, अतिमोह झाला असतां ह्याचें नस्य द्यावें, हा श्वासकुठाररस सर्व श्वास-विकारांचा नाशक आहे. कांही वैद्य वरील चूर्णाला आल्याच्या रसाची भावना देऊन याच्या एक-दीड गुंजेच्या गोळ्या करितात.

१५ श्वासचिन्तामणि

द्विकर्षं लौहचूर्णस्य तदर्धं गन्धमभ्रकम् ।
तदर्धं पारदं ताप्यं पारदार्धेन मौक्तिकम् ॥
शाणमानं हेमचूर्णं सर्वं सम्मर्द्य यत्नतः ।
कण्टकारीरसैश्चापि श्रृंगवेररसैस्तथा ॥
छागीक्षीरेण मधुकैः क्रमेण मतिमान् भिषक् ।
गुंजाचतुष्टयञ्चास्थ विभीतक समन्वितम् ॥
भक्षयेत् श्वासकासार्तो राजयक्ष्मनिपीडितः　भै. र. ३३४-

लोहभस्म २ तोळे, शुद्ध गंधक व अभ्रक १-१ तोळा, शुद्ध पारा व सुवर्णमाक्षिक भस्म प्रत्येकी अर्धा तोळा, मौक्तिकभस्म व सुवर्णभस्म ३-३ मासे, पहिल्याने पारा व पहिल्याने पारा व गंधक यांची कज्जली करून इतर द्रव्यें त्यांत मिळवावीत. तीं सर्व खलांत घालून त्यांत रिंगणीचा काढा, आल्याचा रस बकरीचें दूध व मध यांचीं १-१ भावना द्यावी. ४-४ गुंजेच्या गोळ्या करून त्यापैकी १-१ गोळी बेहाडयाच्या चूर्णाबरोबर मध मिसळून घ्यावी. म्हणजे श्वास, कास, राजयक्ष्मा, हे विकार नाहीसे होतात.



१६ श्वासकासचिंतामणि

पारदं माक्षिकं स्वर्णं समांशं परिकल्पयेत् ।
पारदार्ध्दं मौक्तिकंच सूताद् द्विगुणगन्धकम् ॥
अभ्रं चैव तथा योज्यं व्योम्नो द्विगुणलौहकम् ।
कण्टकारीरसेनैव छागीदुग्धेन च पृथक् ॥
यष्टीमधु-रसेनैव पर्णपत्र-रसेन च ।
भावयेत् सप्तवारं च द्विगुंजां वटिकां भजेत् ॥
पिप्पलींमधुसंयुक्तां श्वासकासविमर्दिनीम् ॥　भै. र. ३३४

पारा, स्वर्णमाक्षिक, सुवर्णभस्म १-१ भाग, मोतीभस्म, $\frac{1}{2}$ भाग गंधक तसेंच अभ्रकभस्म २-२ भाग, लोहभस्म ४ भाग, सर्व एकत्र करून घोटावे. त्यास रिंगणी, बकरीचें दूध, जेष्ठमधाचा काढा, व विडयाचें पानाचा रस यांनी प्रत्येकीं ७-७ भावना द्याव्यात. दोन गुंजेच्या गोळ्या कराव्यात. हें पिंपळीचूर्ण आणि मध यांचें बरोबर सेवन केल्यानें श्वास आणि कास हे रोग नष्ट होतात.

१७ मल्लसिंदुररस

नवकर्षमितः सूतो रसचन्द्रश्च तत्समः ।
चतुःकर्षमितो मल्लः सार्द्धपंचाक्षसम्मितः ॥

गन्धकश्चेति तत्सर्वं काचकूप्यां निधापयेत् ।
क्रमवृद्धाग्निना सम्यग्वालुकायन्त्रगं पचेत् ॥
वन्हि षोडशयामंच दत्वा शीतं समुद्धरेत् ।
रसोऽयं मल्लसिन्दूरः सर्ववातविकारनुत् ॥
युक्तानुपानतो हन्यात्सन्निपातादिकान्गदान् ॥

शुद्ध पारा व रसकापूर ९-९ तोळें, पांढरा सोमल ४ तोळे, शुद्ध गंधक ५॥ तोळे. सर्वांची कज्जली करून सांत मातकापड केलेल्या आतशिशिमध्ये भरून वालूकायंत्रांत ठेवून, त्यास मंद, मध्यम व तीक्ष्ण अग्नि १६ प्रहरपर्यंत द्यावा. स्वांगशीत झाल्यावर आतशिशीच्या उर्ध्वनलीकेमध्यें सांठलेला मल्लसिंदूर काढावा, हा मल्लसिंदूर योग्य अनुपानासह दिल्यानें, सन्नीपात, श्वास, कास व सर्व वातविकार नाहीसे करतो.

## १८ समीरपन्नगरस

पारदं गन्धकं मल्लं हरितालं तथैव च ॥
एतच्चतुष्टयं सर्वं तुलसीरसमर्दितम् ।
वटिं कृत्वाऽभ्रकेनैव वेष्टयेद्गोलकं तु तत् ।
शरावयुगुले क्षिप्त्वा वालुकायंत्रगं पचेत् ॥
दीपिकाप्रमितं वन्हि दत्वा यामचतुष्टयम् ॥
स्वांगशीतं समुद्धृत्य नाम्नाऽसौ वातपन्नगः ।
सन्निपाते यथोन्मादे संधिबंधे कफामये ॥
नागवल्या दलेनैव भक्षयेद् गुंजकाद्वयम् र. चं. ३५१

पारा, गंधक, सोमल व हरताळ हे चार जिन्नस समभाग घेऊन कज्जली करून तुळशीच्या पानांच्या रसांत त्यांचा खल करावा. नंतर त्याचा गोळा करून त्याजवर अभ्रकाचे पत्रे गुंडाळून शरावसंपुटांत घालून वालुका यंत्राचा चार प्रहरपर्यंत त्यास मंद आच द्यावी. स्वांगशीत झाल्यावर रसायन काढून घ्यावे. याला समीरपन्नरस असें म्हणतात. हा सन्नीपात, उन्माद, सांधे धरणें व कफरोग याजवर विड्याच्या पानांतून दोन गुंजा प्रमाणानें द्यावी.

## १९ रससिंदूर

पलद्वयं शुद्धरसं पलार्धं शुद्धगंधकम् ।
कर्षार्धं नवसारं च जम्बीरेण विमर्दयेत् ॥
काचकूप्यां क्षिपेच्चैव सप्तधा मृत्कपटैः ।
विलेप्य काचकूपीं तामा तपे शोषयेद् दृढम् ॥

छिद्रभाण्डे ततः कूपीं न्यसेत्सिकतयन्त्रके ।
कूपिकाकंठमात्रेण ततश्चूल्यां विनिक्षिपेत् ।।
पचेद्व्यामाष्टकं चैव कूपिकां च क्षणे क्षणे ।
संशोध्य पाचयेद्यं स्वांगशीतं समुद्धरेत् ।
ग्राह्यं च दरदाकारं देवदानव दुर्लभम् ।।
सेवयेद्रोगनाशाय तत्तद्रोगानुपानतः ।।
बल्लं वा बल्लयुग्मं वा कणया मधुना सह ।।
सेवितं कामिनीकायं दर्शयेद्रतिकौतुकम् ।
वीर्यबंधकरं शीघ्रं योषामदविनाशनम् ।।
सिंदुरं हरवीर्य संभवामिदं रूक्षाग्निमांद्यापहम् ।
यक्ष्मादिक्षय पांडुशोफमुदरं गुल्मप्रमेहापहम् ।।
शूलप्लीहविनाशनं ज्वरहरं दुष्टव्रणान्नाशयेत् ।
अर्शांसि ग्रहणीगदं दरहरंच्छर्दित्रिदोषापहम् ।। र. चं. २२

आठ तोळे शुद्ध पारा, दोन तोळे शुद्ध गंधक, अर्धा तोळा नवसागर, यांचा लिंबाच्या रसांत खल करावा नंतर एका कुपीस सात मातकापडे करून ती कुपी उन्हांत सुकवावी. व त्यात ती कज्जली भरावी. नंतर तळाला भोक पाडलेल्या मातीच्या डेरक्यांत ती कुपी ठेवून त्या कुपीच्या सभोवार गळापर्यंत वाळू घालून ते कुपीसह वालूकायंत्र चुलीवर ठेवून अग्नि द्यावा. व क्षणोक्षणीं सळईनें कुपीचें शोधन करावे. कुपीचें तोंड बंद करणारा रस खाली ढोसून कुपीचें तोंड मोकळे करावे. आठ प्रहरा नंतर अग्नि कमी करून स्वांगशीत झाल्यावर कुपी फोडून आंतील हिंगुलाप्रमाणें लाल व देवदानवाना दुर्लभ असा रस सिंदूर काढून घ्यावा व रोगनाश होण्याकरिता निरनिराळ्या अनुपानांतून द्यावा. हा रससिंदूर एक अगर दोन वाल पिंपळीचें चूर्ण व यांतून घेतला असतां रुक्षपणा, अग्निमांद्य यांचा नाश करतो व राजयक्ष्मा, क्षय, पांडुरोग, सूज, उदर, गुल्म, प्रमेह, शूळ, पांथरी, ज्वर, दुष्टव्रण, मूळव्याध, संग्रहणी, वांति व त्रिदोष यांचा नाश करितो.

## २० हरिद्रादि धूमवर्ति

हरिद्रां यवमेरण्ड मूलं लाक्षां मनःशिलाम् ।।
सदेवदार्वबलं मासीं पिष्टवावर्ति
तां घृताक्तां पिबेद्धूमं यवैर्वा घृतसंयुतैः ।। च. चि. अं. ४६९

जव, हळद, एरंडाचें मूळ, लाख, मनशिळ, देवदारु, हरताळ, जटामांसी हीं सर्व पाण्यांत बारीक वाटावी. तूप मिळवून स्निग्ध करावी व वर्तिका तयार करून त्याची धूरी घ्यावी. अथवा तूप मिळवून जवानी धूरी घ्यावी.

मधूच्छिष्टं सर्जरसं घृतं मल्लकसम्पुटे ।

कृत्वा धूमं पिबेच्छृंगं बालं वा स्नायुवागवाम् ।।
स्योनाकवर्धमानानां नाडीं शुष्कां कुशस्य वा ।
पद्मकं गुग्गुलुं लोहं शल्लकी वा घृताप्लुतम् ।। च. चि अं. ४६९

मेण, राळ, तूप हे एका संपुटांत घालून त्यांना पुट देवून त्यांत एरंडेल, गाईचें शिंग अथवा केस किंवा स्नायु हे घालून धूम्रपान करावें.

टेटूच्या, एरंडमुळाच्या अथवा कुशाच्या सुक्या दांड्याचा धूर ओढावा. किंवा पद्मक, गुग्गुळ, लोह, साळईचा डिंक यांना तूप लावून ( नळीत ठेवून ) धूम्रपान करावे.

## २१ धत्तूरफलशाखादिधूम

कनकस्य फलं शाखां पत्रं संकुटच यत्नतः ।
शोषयित्वा च तद्धूमपानाच्छ्वासो विनश्यति ।। भै. र. २३२

धोतऱ्याचें फळ, फांद्या आणि पानें हीं कुटून सुकवावी. नंतर या धोतऱ्याचें फळ फांद्या, पानादि चूर्णास धूर न होणाऱ्या प्रज्वलीत निखाऱ्यावर ठेवावे. मध्यभागीं छिद्र असलेलें झांकण ठेवावें व छिद्रास रबराची नळी जोडावी, व त्या नळीनें धूम्रपान करावे. त्यामुळे श्वासरोग नाहीसा होतो.



## २२ श्वासावर पथ्य

विरेचनस्वेदन धूम्रपान प्रच्छर्दनानि स्वपनं दिवा च ।
पुरातनाः पौष्टिकरक्तशालिकुलत्थगोधूमयववः प्रशस्ताः ।।
शशाहिभुक्ति त्तिरलावदक्षशुकादयो धन्वमृगा द्विजाश्च ।
पुरातनं सर्पिरजाप्रभूतं पयो धृतं चापि सुरा मधूनि ।।
पाटोलवार्ताकिर सोन बिम्बी जम्बीरतण्डूलियवास्तुकं च ।
द्राक्षा तृटिः पौष्करमुष्णवारि निदिग्धिका श्वासिनि पथ्यवर्गः ।।

## २३ श्वासात वर्ज्य पदार्थ

रेचक, स्वेदन, धूम्रपान, ओकारी, दिवसा झोप घेणें, जुनी साठी साळी किंवा तामसळ, हुलगे, गहूं, सातू हीं धान्यें प्रशस्त आहेत. ससा, मोर, तित्तिरपक्षी, लावा, कोंबडा, पोपट, जांगल देशांतील मृग व पक्षी, जुनें तूप, शेळीचें दूध व तूप, मद्य, मध व पडवळ, वांगीं, लसूण, तोंडलीं, जंबीर–लिंबू, तांदूळजा, चंदनबटवा, द्राक्षें, वेलचीं, पोखरमूळ, ऊनपाणी व रिंगणीं, हा श्वास रोग्याला पथ्यवर्ग सांगितला आहे.

रक्तस्त्रावः पूर्ववातान्नपानं मेषीसर्पिर्दुग्धमम्भोऽपि दुष्टम् ।
मत्स्याः कन्दाः सर्षपाश्चान्नपानं रूक्षं शीत गुर्वपि श्वासिवर्जन् ।।

रक्तस्त्राव, पूर्वेकडील वारा व अन्नपान, मेंढीचें दूध व तूप, दूषीत पाणी, मासे, कंद, शिरस, (मोहरी) रुक्ष, जड व थंड अशा प्रकारचीं अन्नपानें हीं श्वास-रोग्यानें हीं वर्ज्य करावींत.

## २७ श्वासावर सामान्य उपचार

नुकतेच झालेले क्षुद्रश्वास सोडून बाकीचे सर्व श्वासावर खालील उपचार करावे. पहिल्याने नारायण तेल किंवा कोणतेहि वातनाशक तेल घेऊन त्यांत कापूर व सैंधव घालून गरम करून छातीस चोळावे व गरम पाण्याच्या रबरी पिशवीनें, कांचेच्या बाटलीनें किंवा शेगडीवर फडक्याची पुरचुंडी गरम करून त्यांनी शेकावे किंवा जवस कुटून त्यांत तूप व हळद घालून पाण्यांत शिजवून तें एका फडक्यावर पसरून, अर्धे फडकें त्यावर लपेटून त्याने छाती शेकावी. व तेंच पुन्हां थोडें गरम करून छातीवर बांधावें. त्यामुळे स्रोतसांत चिकटून बसलेला व त्यामुळे वायुमार्ग अडविलेला असा गाठाळलेला कफ पातळ होतो. त्यामुळे स्रोतसे मृदु होऊन वायुच्या संचाराचा मार्ग मोकला होतो. याप्रमाणे स्रोतसांत चिकटलेला कफ स्नेहन केल्याने मृदु होतो व स्वेद दिल्याने तो कफ पातळ होऊन कोठ्यांत येतो. श्वासाला मदतगार असलेला आमाशयांतील कफ व स्नेहन, स्वेदन देऊन कोठ्यांत आणलेला कफ हे दोन्ही शरीराबाहेर घालविण्याकरितां वांतीचें औषध द्यावे. कफ वाढलेला नसेल तर वांतीचें औषध द्यावे. कफ वाढलेला नसेल तर वांतीचे औषध देऊं नये परंतु श्वासाचा विकार बरा होईपर्यंत छाती, पोट व पाठ दररोज शेकत जावे.

## २८ श्वासरोगावर प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा

श्वास रोग्याला पहिल्यानें इच्छाभेदी २ गुंजा किंवा एरंडेल तीन तोळे द्यावे. त्यानें ३-४ जुलाब होतील. दुसरें दिवशीं तूप २॥ तो. सैंधव १ मासा, मध ३ मासे हे सर्व कपभर गरम पाण्यांत घालून प्यावे.

४ वाजतां-श्वासांत फारसा खोकला नसेल तर—

| | |
|---|---|
| श्वासकुठार | ३ गुं. |
| समीरपन्नग | २ ,, |
| मल्लसिंदुर | २ ,, |
| अभ्रकभस्म | १ ,, |

सकाळीं स्नेहन घेतल्यानंतर दुपारीं ४ वाजतां व रात्रीं ९ वाजतां २ पुड्या मधांतून द्याव्या. परंतु श्वास जोराचा असेल तर समीरगजकेसरी १ गुंज पाण्याबरोबर घ्यावी. म्हणजें तात्काळ श्वास थांबेल.

याप्रमाणें ४ दिवस सकाळीं तूप सैंधव व दुपारीं व रात्रीं वरील औषध २ वेळ असें चालू ठेवावें.

पांचवे दिवशीं पळसपापडी ८ गुंजा, कृमिकुठार २ गुं. व गूळ १६ गुं. यांची गोळी करून घ्यावी. दुपारीं, रात्रीं कांहीच घेऊ नये. सहावें दिवशीं सर्व अंग शेकून टाकावे किंवा वाफारा द्यावा. व दुपारीं ४ वाजतां गेळफळ ४ तोळे, सैंधव २ मासे व मध ३ मासे हीं औषधें कपभर गरम पाण्यांत मिसळून द्यावी. याने दोन उलट्या होतील.

सातवे दिवशीं पुन्हा इच्छाभेदी २ गुंजा दुधांतून द्यावी. त्याचे दुसरें दिवसापासून खालील औषध सुरूं करावे.

| | |
|---|---|
| श्वासकुठार | ६ गुं. |
| समीरपन्नग | ४ ,, |
| मल्लसिंदुर | ४ ,, |
| अभ्रकभस्म | २ ,, |

४ पुड्या करून सकाळीं ७ वा., दुपारीं १ ला, ५ वाजतां. रात्रीं ९ वाजतां असें ४ वेळा मधांतून द्यावे. जरूरच वाटेल तर १–१ गुंज सर्वांचे प्रमाण वाढवावे.

श्वास जोराचा चालूं असेल तेव्हां एक गुंज समीरगजकेसरी पाण्याबरोबर द्यावी. ही गोष्ट पहिल्या दिवसापासून लक्षांत ठेवून समीरगजकेसरीचा उपयोग श्वासाचा जोर जेव्हां जेव्हां दिसेल तेव्हां तेव्हां करावा. शक्यतोवर दिवसांतून एकच वेळ करावा. श्वास फारच असेल तर पांच तासानंतर पुन्हां एकदा समीरगजकेसरी १ गुंज पाण्याबरोबर द्यावी. परसाकडे साफ होत नसेल तर एरंडेल ३ तोळे आठवड्यांतून २ दिवस देत जावे. रोगी अशक्त असेल तर वरील औषधी शिवाय हेमगर्भ एक गुंज आल्याच्या रसांतून, मध घालून ३–४ दिवस १ वेळ देत जावी.

पहाटे ३-४ वाजतां श्वास उमळत असेल तर रात्रीं झोपतांना ११ वाजतां एक गुं. समीरगजकेसरी पाण्याबरोबर. त्याने सकाळचा वेग थांबत नसेल तर पहाटे ३ वाजतां द्यावी, असे ४–५ दिवस करावे. खाण्याकरितां आंबट पदार्थ मुळीच खाऊ नये. रात्री मुळीच जेवूं नये, ५ वाजतां जेवून घ्यावे तेही थोडेच जेवावे किंवा थोडे दुध अगर चहा घ्यावा.

## २६ श्वासावर योग

श्वासरोगांत खालील योग फार उपयुक्त आहेत.

श्वासाबरोबर कफहि पडत असेल तर खालील योग वापरावा.

| | |
|---|---|
| श्वासकुठार ६ गुंज<br>आनंदभैरव ६ गुंज<br>मृगश्रृंग ६ गुंज | या सर्व औषधींच्या ४ पुड्या करून दिवसांतून ४ वेळ आल्याच्या रसांत मध घालून द्याव्या. |

लवकर गुण दिसून न आल्यास हें वरील प्रमाण दोन दोन गुंजानी वाढवावे. म्हणजे वरील तीनही औषधें एक एक मासा घेऊन त्याच्या ४ पुड्या कराव्या. व वरील अनुपानांतून द्याव्या.

| | | |
|---|---|---|
| २) | श्वासकुठार ६ गुंज<br>समीरपन्नग ४ गुंज | ४ पुड्या करून आल्याचा रस व मध यांतून किंवा वासावलेहातून द्याव्या. |

निव्वळ श्वासरोगांत कफ नसताना खालील योग उत्तम

| | | |
|---|---|---|
| ३) | मल्लसिंदुर ४ गुं.<br>समीरपन्नग ४ गुं.<br>कफकुठार ६ गुं. | ४ पुड्या करून वरीलप्रमाणें द्याव्या. किंवा वासावलेह अथवा कंटकार्यावलेहातून द्याव्या. |

वरील पैकी कोणताहि औषधींचा योग चालू असता श्वासाचा जोर जास्त दिसून आल्यास दिवसांतुन १ वेळ किंवा २ वेळ समीरगजकेसरी १ गुं. पाण्याबरोबर देत जावी.



४) पाहटे ३–४ वाजतापासून दमा सुरू होत असेल तर दमा सुरू होण्याच्या बेतातच समीरगजकेसरी १ गुं. पाण्याबरोबर घ्यावी. अर्ध्या तासांत दम्याचा जोर कमी होऊन झोप लागेल.

दमा असलेल्या माणसांनीं वरीलपैकी एखादा योग वरील अनुपानांतून घ्यावा व दमा वाढेल त्या वेळी समीरगजकेसरी १ गुं. पाण्याबरोबर घ्यावी. याप्रमाणें आठ दिवस घेत गेल्यानें श्वास पुष्कळच कमी होतो. समीरगजकेसरी हें औषध मात्र वारंवार घेऊं नये, ४–५ दिवस घ्यावे नंतर बंद ठेवावे पण वरील योग चालूच ठेवावा.

५) शुद्ध फुचल्याची बी उगाळुन अथवा चूर्ण करून अर्धी गुंज पोटांत घ्यावी. ती वाढवत वाढवत शक्तिमान पाहून सोसेल त्या मानानें २ गुंजेपर्यंत द्यावी.

६) वर्धमान पिंपळीचा प्रयोग शक्तिमानाप्रमाणें करावा.

७) रोगी फारच अशक्त असेल तर शक्तिकरिता वरील चार वेळच्या औषधी शिवाय सकाळी एक वेळ लक्ष्मीविलास हे औषध १ गुं. मधातून १०–१२ दिवस नियमितपणें द्यावे. पण वरील एखादा चालूच ठेवावा.

८) किंवा श्वासकुठार समीरपन्नग मल्लसिंदूर या योगाबरोबर हेमगर्भ स्वतंत्र अर्धा ते १ गुं. आल्याचा रस व मध यांतुन निजताना द्यावे.

९) दम्यामुळे पहाटे ३–४ पासून झोपमोड होत असेल तर समीरगजकेसरी १ गुं. त्याच वेळी अवश्य घ्यावी, अर्ध्या तासानें दमा खात्रीनें कमी होईल.

१०) रससिंदुर व चंद्रोदय ही दोन्ही औषधें श्वासरोगांत उपयुक्त आहेत.

विशेष --वरील कोणतेही औषध देत असताना छाती शेकणें हे दररोज चालू ठेवावे.

११) महाश्वास असल्यास हेमगर्भ १ गुं. आल्याचा रस २ गुं पिंपळी व मध यातून सकाळी द्यावा त्याचबरोबर समीरपन्नग १ गुं. व मल्लसिंदुर १ गुं. दोन्ही मिळवून आल्याचा रस व मध पिंपळी यातून दुपारी १२ वाजता व पुन्हा सायंकाळी ५ वाजता द्यावे. व समीरगजकेसरी १ गुं. पाण्याबरोबर रात्री १० वाजता द्यावी पण त्याचे अगोदर दोन तास म्हणजे रात्री आठ वाजता हेमगर्भ वरील अनुपानातून द्यावा. याप्रमाणें चार दिवस हे औषध चालू ठेवावे.

१२) श्वासकुठार ६ गुं.. समीरपन्नग, ४ गुं. मल्लसिंदुर ४ गुं. मृगश्रृंग ६ गुं. ४ पुड्या.

या सर्वांचें मिश्रण आल्याचा रस व मध यांतून दिवसांतून ४ वेळ घेणें. श्वासरोगावर उत्तम योग आहे.

१३) मृगश्रृंग ६ गुं. सितोपला ४ मासे अभ्रक ३ गुं श्वासकुठार ६ गुं. समीरपन्नग ४ गुं. = ४ पुड्या, आल्याचा रस व मध यांतून ४ वेळ घेणें.

इतर औषधाबरोबर दिवसांतून एक वेळ. आपामार्गक्षार एकमासा मधातून घेणें.

जोराचा श्वास चालु असेल तर

१४) (१) समीरपन्नग २ गुं. व मल्लसिंदुर ३ गुं. = २ पुड्या (२) समीरगज केसरी १ गुं. = १ वेळ असे एकूण ३ वेळ हे औषध दिल्याने ताबडतोब आराम वाटेल.

## २७ श्वास रोग असताना पाळावयाचे नियम

१) या रोगांत थंडी पासून बचाव करणें हें महत्त्वाचें कर्तव्य समजावे.

२) गार वारा अंगावर येणार नाही अशी काळजी घ्यावी.

३) गळ्याला उनी किंवा सुती जाड कपडा किंवा रुमाल गुंडाळुन ठेवावा.

४) आंगांत गरम कपडे असावे. छातीला थंडी मुळीच लागू देऊं नये, याव रित अंगांत जाकीट नेहमी ठेवावे.

५) दररोज एकदां तरी छाती, पोट व पाठ शेकावें.

६) निजतांना थंड हवा व समोरचा वारा येंत नसेल अशा ठिकाणीं निजावे.

७) रात्रीं जागरण करूं नये. व दिवसा निजूं नये.

८) निजतांना दम्याचा वेग जास्त असेल तर एक गुंज समीरगजकेसरी गरम पाण्याबरोबर घेऊन अर्धा कप गरम पाणी वरून प्यावें.

९) श्वासाच्या रोग्याने पहाटे उठूं नये. थोडेसें उशीरा उठावें.

१०) पहाटे तीन चार वाजतां श्वासाचा जोर जास्त असल्यास व झोपमोड होत असल्यास समीरगजकेसरी एक गुंज गरम पाण्याबरोबर द्यावी. म्हणजे अर्ध्या तासांनी दम्याचा त्रास अजिबात थांबेल व झोप लागेल.

११) सकाळीं गरम पेय द्यावे. दूध घेण्याची संवय असेल तर चार पिंपळ्या पावभर दूधांत टाकून, ते उकळू द्यावे. त्यांत जरूरीपुरति खडीसाखर किंवा साखऱ्या घालून तें दूध गरम गरम थोडें थोडें प्यावें.

१२) सकाळीं ठरले असेल तें औषध ठराविक वेळीं योग्य अनुपानांतून घ्यावे. व दिवसांतून द्यावयाची ठरलेलीं औषधें योग्य अनुपानांतून त्या त्या द्यावीत.

१२) शक्यतोवर दमा असलेल्या रोग्यानें दररोज स्नान करूं नये.

१३) जेवणांत भात फारच कमी खावा किंवा बंदच करावा.

१४) जेवणांत आंबट पदार्थ अजिबात बंद करावे. थंड पाणी व थंड पदार्थ खाऊं नये.

१५) जेवणांत चांगलें तूप, साखर, पुदिना, आले, लसूण, हिंग, संचल, जिरें, मिरे, सुंठ, सैंधव, डाळींब, जवखार, इत्यादि पदार्थ असावेत.

१६) पिण्याकरितां पाणी घ्यावयाचे तें सुंठ मिरे दोन दोन दाणे टाकून किंचित आटवून थंड केलेलें पाणी पिण्यास द्यावे. गार पाणी पिऊं नये.

१७) दमेकऱ्याने दुपारीं एकदाच जेवावे. रात्री जेऊ नये. धानाच्या लाह्या मीठ लावून किंवा दुधांत घालून घ्याव्या किंवा एखादे गरम पेय घ्यावे. चहा चालेल, किंवा कपभर गरम दूध सायंकाळीं घ्यावे.

१८) वर्ज्य पदार्थ–तेलांत तळलेले पदार्थ, तुपांत तळलेले पदार्थ, सर्व आंबट व थंड पदार्थ श्रीखंड, बासुंदी, पुऱ्या, काकडी, केळे, कोहळे, बटाटे, कलिंगड, अंजीर, पेरू, कोल्ड्रिंक, थंड फळें केव्हाहि खाऊं नये.

१९) जेवल्यानंतर द्राक्षासव दोन तोळे घ्यावे.

———

# अतिसार चिकित्सा प्रकरण

## अध्याय ११ वा

### १ अतिसाराचें संक्षिप्त वर्णन

अतिसारांत शरिरांतील अपाधातु प्रवृद्ध म्हणजे शरीरांतील द्रव धातु श्लेष्मपित्तरस रक्त स्वेद इ. द्रव धातु यांची जास्त प्रमाणांत वाढ झालेली असते, तसेच वायुचीहि वृद्धि होते. आणि त्या प्रकुपित वायुमुळे हा द्रवधातु आतडीत आणल्या जातो. तो द्रवधातु अग्निला मंद करून मळाला पातळ करितो. व तो प्रकुपित वायु त्या मळमिश्रित द्रव धातुला जोराने बाहेर ढकलतो. अशा प्रकारे तो द्रवधातु पुष्कळ वेळा जास्त प्रमाणांत गुदद्वारावाटे कांही दिवस बाहेर जात राहतो त्याला अतिसार असे म्हणतात. औषधोपचार करताना अतिसारांत बाहेर येणारा हा मळ पक्व आहे की अपक्व आहे याचा पहिल्यानें विचार करून तो आमातिसार असेल तर पहिल्या लंघन पाचन ह्या क्रिया करून पातळ व हलके पदार्थ खाण्यास द्यावें. अतिसार हा अग्निस मंद करून आमाशयापासून उत्पन्न होतो. तो वातजन्य जरी असला तरी त्यावर लंघन हितकारकच आहे. अतिसारांत शूळ व पोटास फुगारा राहत असेल तर अशावेळीं वांतिचे किंवा जुलाबाचेच औषध द्यावे पण अशा वेळी स्तंभन औषध मुळीच देऊ नये. हिरड्याचें चूर्ण ३ मासे गरम पाण्याबरोबर दिल्यास रोग्याला तें प्राणदायकच होईल. अतिसार झालेला जर वृद्ध असेल वयानें लहान असेल किंवा अतिशय अशक्त असेल तर अतिसार हा आमयुक्त जरी असेल तरी अशावेळीं स्तंभक औषधाचाच उपयोग करणें जरूर असते. पण त्याचबरोबर पाचक व दीपक औषधेहि सुरू ठेवावी. अतिसारांत विशेषत: लंघन, पाचन, दिपन औषधें, ताक, षंडगयुष, मुगाचे कढण, पेया, पेज, यांत पाचक, दीपक औषधें घालून योग्य प्रमाणांत दिल्यास हितकारकच होईल.

अतिसारांत पहिल्याने पाचक. दीपकअशीं औषधें सुरूं करून नंतर पाचक, दीपक औषधीच्या बरोबर स्तंभक औषधेंहि थोड्या प्रमाणांत सुरूं ठेवावी. पुढें चूर्ण, काढें, गुटिका व रस सांगण्यांत आले आहेत. त्यापैकी पाचक, दिपक बरोबरच एकादे स्तंभक औषध सुरूं ठेवावें. जर आमाचीं लक्षणें दिसून येतील तर मात्र लंघन, पाचन व दीपन असेंच औषध द्यावे.

संग्रहणींत सांगितलेलीं औषधेंहि अतिसारांत उपयोगी आहे. चित्रकादि चूर्ण भल्लातकक्षार, पंचलवण गुटिका, ग्रहणीगजकेसरी. ग्रहणीकपाट, कर्पूररस, इ. औषधांतून

कोणतीहि दोन तीन औषधें योग्य प्रमाणांत एकत्र करून गरमपाण्याबरोबर प्यावें. याशिवाय कांही अनुभविक, कांही चिकित्सा योग केले आहे तते फारच उपयुक्त आहेत.

## २ अतिसाराची संप्राप्ति

स सुतरां जायतेऽत्यंबुपानतः ।
कृशशुष्कामिषासात्म्यतिलपिष्ट विरूढकैः ।।
मद्यरूक्षाति मात्रान्नैरर्शोभिः स्नेहविभ्रमात् ।
कृमिभ्यो वेगरोधाच्च तद्विधैः कुपितोऽनिलः ।।
विस्रंसयत्यधोऽब्धातुं हत्वातेनैव चालनम् ।
व्यापद्यानुशकृत् कोष्टं पुरीषं द्रवतां नयन् ।
प्रकल्पतेऽतिसाराय वा. नि.

तो बहुतकरून अतिशय पाणी प्याल्यानें, रोडावलेल्या जनावराचें वाढलेलें मांस खाल्ल्यानें, तसेच असात्म्य पदार्थ, तीळ, पिठाचे पदार्थ, कोंब आलेलें धान्य, मद्य, रुक्ष व अतिशय अन्न खाल्ल्यानें मुळव्याधीपासून, स्नेहपानांत चूक झाल्याने व मलमूत्राचे वेग थाबविल्यानें अशाच प्रकारच्या वातप्रकोप कारणांनी वायु कुपित होऊन रसादि जलात्मक धातूस खाली नेऊन त्यांच्याच योगानें जठराग्नीस मंद करून मळाजवळच्या भागांत म्हणजे मोठ्या आंतड्यांत विकार उत्पन्न करून ती शून्य करून व विष्टेस पातळ करून अतिसार उत्पन्न करितो.

## अतिसार संप्राप्ति

संशम्यापां धातुरग्निं प्रवृद्धो वर्चोमिश्रनो वायुनाऽधः प्रणुन्नः ।
सरत्यतीवाऽतिसारं तमाहुर्व्याधिं घोरं षडविधं सं वदन्ति ।। भै. र. १४९

वाढलेला अपाधातु जठराग्नीस मंद करून मळांत मिसळून त्याला पातळ करितो. प्रकुपित झालेल्या वायुमुळें तो मळमिश्रित द्रव गुदद्वारावाटे वारंवार बाहेर ढकलल्या जातो. याप्रमाणें पुष्कळ वेळां पुष्कळ प्रमाणांत कांही दिवस हा द्रवमळ बाहेर निघत राहणें याला अतिसार असें म्हणतात.

## अतिसाराची व्याख्या

" गुदेन बहुद्रवसरणमतिसारः "

गुदद्वारावाटें पुष्कळ वेळ, पुष्कळ प्रमाणांत मलयुक्त द्रवभाग निघणें याला अतिसार म्हणतात.

## ३ अतिसाराचा चिकित्साक्रम

आमपक्वक्रमंहित्वा नातिसारे क्रिया हितः ।

अतः सर्वाति सारेषु ज्ञेयं पक्वामलक्षणम् ॥ भै. र.

अतिसारांत होणारा मळ हा पक्व आहे का आमयुक्त आहे, याचें ज्ञान करून घेतल्या शिवाय अतिसाराची चिकित्सा करतां येणें शक्य नाही. याकरितां चिकित्सा करण्याचें पूर्वीं आमातिसार व पक्वातिसार यांचीं लक्षणें जाणणें अत्यंत अवश्य आहे.

४ आमपक्वातिसारलक्षण

मज्जत्यामा गुरुत्वाद्विट पक्वा तु प्लवते जले ।
विनाति द्रवसंघात शैत्य श्लेष्म प्रदूषणात् ॥ भै. र. बली

आमातिसारांत, आमदोषयुक्त विष्टा ही जड असल्यामुळे पाण्यांत टाकल्यानें तो पाण्यांत बुडते. पक्वातिसारांत अन्नाचें पचत नीट झाल्यामुळे तो मळ हलका होतो. तो पक्व मळ पाण्यांत टाकल्यास तो तरतो. कधीं कधीं याचें उलट हीं लक्षणें दिसून येतात. आमदोषयुक्तमळांत जलांश अधिक असल्यास तो पाण्यावर तरतो. त्याचप्रमाणें पक्वातिसारांत मळ द्रवपदार्थ यांत शैत्य व कफ अधिक प्रमाणांत असेल व तो मळ घट्ट स्वरूपांत असेल तर तो पाण्यांत टाकल्यानें डुबतो.

हीं जीं विरोधी वचनें दिसून येतात, याकरितां सर्व गोष्टींचा विचार करून व ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारें परीक्षा करून आमातिसार व पक्वातिसार यांचा निर्णय लावून घेतला पाहिजे.

५ आमपक्वमळाचें स्पष्ट लक्षण

शकृद् दुर्गंधि साटोप विष्टंभार्त्ति प्रसेकिनः ।
विपरीतं निरामंतु कफात्पक्वंच मज्जति ॥ भै र.

आमातिसारांत–मळांत अत्यंत दुर्गंधी असते. उदरांत गुडगुड आवाज होतो. पोटाला फुगारा, सुई टोचल्याप्रमाणें पिडा होणें, तोंडांतून लाळ गळणें, हीं लक्षणें होतात. पक्वातिसारांत याच्या उलट म्हणजे मळाला दुर्गंधि येणें, फुगारा व पिडा होणें, इत्यादि लक्षणें नसतात. कफाधिक्य पक्वातिसारांत मळ पाण्यांत बुडतो तो कफामुळे बुडतो. आमातिसाराप्रमाणें दुर्गंधी वगैरे लक्षणें नसली म्हणजे तो पक्वातिसार समजावा.

६ आमातिसारांत पंचकर्म व पथ्य

आमपक्वक्रमं हित्वा नातिसारे क्रिया यतः ।
अतः सर्वातिसारेषु ज्ञेयं पक्वामलक्षणम् ॥
आमे विलंघनं शस्तमादौ पाचनमेव च ।
कार्यं वाऽनशनस्यान्ते सद्रवं लघुभोजनम् ॥

**लंघनमेकं मुक्त्वा नान्यदस्तीह भेषजं बलिनाम् ।**
**समुदीर्ण दोषनिचयं शमयति तत्पाचयत्येव ॥** यो. र. ४२८

अतिसार आम आहे की पक्व आहे हे जाणल्यावाचून ज्या अर्थी क्रिया करू नये म्हणून सांगितलें आहे, त्या अर्थी अतिसार आम आहे की पक्व हें लक्षपूर्वक जाणावें. आमातिसारांत प्रथम लंघन व पाचन करावें. लंघनावर पातळ व हलकें अन्न खावें. बलवान मनुष्याचे अतिसारावर लंघनाशिवाय दुसरें औषध नाही. कारण तें संचित झालेल्या दोषांना बाहेर काढते. अतिसाराचें पाचन व शमन करते.

**अतीसारो हि भूयिष्ठं भवत्यामाशयान्वयः ।**
**हत्वाग्निं वातजेऽप्यस्मात्प्राक्तस्मिंल्लंघनं हितम् ॥** वा. भ. चि.

अतिसार हा बहुतकरून अग्नीस मंद करून आमाशयापासून उत्पन्न होतो. म्हणून तो वातजन्य असला तरीदेखील त्यावर प्रथम लंघनच हितावह होते.

तरी दुधभात, आमसोलाचें सार, आले व पदीना आवळा याची चटणी हे एक वेळीं खाण्यास दिल्यास चालेल, रात्रीं वाटल्यास एक मोसंबी किंवा अर्धा कप चहा यापेक्षा जास्त कांहीहि नको. याप्रमाणे तीन दिवस पथ्य करण्यास सांगावें.

**शूलानाहप्रसेकार्तं वामयेदतिसारिणम् ।** वा. भ. चि.

अतिसारांत पोटशूळ, पोटफुगी व लाळ सुटणें हे विकार असल्यास वांति करवावी गेळफळ ३ ते ४ मासे, सैंधव १ मा., व मध ३ मासे हे सर्व एकत्र करून कप भर पाण्यांत मिसळून देणें. १-२ वांत्या होतील.

## ७ स्तंभन केव्हां देऊं नये

**प्रयोज्यं न तु संग्राहिपूर्वमामातिसारिणि ।**
**अपि चाध्मानगुरुता शूलस्तैमित्यकारिणि ।**
**प्राणदा प्राणदा दोषे विबद्धेसंप्रवर्तिनी ॥** वा. भ. चि.

आमातिसारावर प्रथम संग्राहि औषध देऊं नये. पोटफुगी, जडपणा, शूळ व ओलसरपणा हे विकार असून शौचास थोडे थोडे होत असल्यास स्तंभन औषध देऊं नये. उलट रेचन करणारेच औषध द्यावें. हिरडयाचें चूर्ण ३ मासे गरम पाण्याबरोबर द्यावें. तें त्या रोग्याला प्राणदायक होतात.

## ८ अतिसारात चिकित्सा

कुपित वायूचेंच नांव शूळ आहे म्हणून वातनाशक चिकित्साच उपयुक्त आहे. व वातनाशक औषधांत तेलतूप हे श्रेष्ठ आहे.

**तद्धि वातजितामग्र्यं शूलं च विगुणोऽनिलः ।** वा. भ.

कुंथणें, गुद बाहेर येणें, मूत्राघात व कंबर धरणें यावर-

(१) गोड व आंबट पदार्थांनी सिद्ध केलेल्या तुपाचा किंवा तेलाचा बस्ति द्यावा.
(२) पंचामृतपर्पटी व अग्नितुंडी हीं औषधें १-१ गुंज दिवसांतून ३ वेळ तुपांतून द्यावी.

## ९ अतिसारात द्यावयाचे पाणी

ह्रीबेरशृंगबेराभ्यां मुस्तपर्पटकेन वा ।
मुस्तोदीच्यश्रृतं तोयं देयं चापि पिपासवे ॥ यो. र. ४२८

वाळा, आले, नागरमोथे, पित्तपापडा किंवा नागरमोथे व वाळा घालून शिजवलेलें पाणी अतिसारामध्ये तहान लागली असतांना प्यावयास द्यावे.

## १० अतिसारांत स्तंभन वर्ज्य

न तु संग्रहणं दद्यात्पूर्वमामातिसारिणाम् ।
दोषो ह्यादौ वर्धमानो जनयत्यामयान्बहून् ॥
शोफपाण्ड्वामयप्लीहकुष्ठगुल्मोदरज्वरान् ।
दण्डकालसकाध्मान ग्रहण्यर्शोगदांस्तथा ॥ यो. र. ४२९

आमातिसारी मनुष्यास आधी संग्राहक ( मळ घट्ट करणारें ) औषध देऊं नये कारण आधी संग्राहक औषध दिल्यानें वाढलेलें दोष अनेक रोग उत्पन्न करितात. सूज, पांडुरोग, प्लीहा, कुष्ठ, गुल्म, उदर, ज्वर, दंडकालसक, आध्मान, संग्रहणी व मूळव्याध विकार करितात.

## ११ कांही आमातिसाराचे स्तंभन अवश्य

डिम्भजः स्थविरो वाऽपि वातपित्तात्मकस्वरः ।
क्षीणधातुर्ज्वरार्तश्च बहुदोषोऽतिविस्त्रतः ॥
आमोऽपि स्तम्भनीयः स्यात्पाचनान्मरणं भवेत् ॥ यो. र. ४२९

बालकाला झालेला अतिसार, वृद्धाला झालेला अतिसार, वातपित्तात्मक अतिसार, धातुक्षीणाला झालेला अतिसार, ज्वरी मनुष्याला झालेला अतिसार अतिशय दोषामुळे अतिशय स्त्रवणारा हे सर्व आमयुक्त जरी असले तरी त्याचें स्तंभन करावें, कारण त्याचें पाचन होईपर्यंत मृत्यु येण्याचा संभव असतो.

## १२ आमातिसारात हिरडा उपयुक्त

तस्मादुपेक्षेतो क्लिष्टान् वर्तनान् स्वयं मलान् ।
कृच्छ्रांवा वहतां दद्यात्‌भयां सप्रवर्तिनीम् ॥ च. चि श्लो·

या कारणामुळे उत्क्लिष्ट होऊन स्वयंप्रवृत्त झालेल्या दोषांना न रोखतां तसेच

जाऊं द्यावे व थोडे थोडे निघत असल्यास हिरडा वगैरे रेच करणारे औषध देऊन पुष्कळ प्रमाणांत बाहेर जाण्यास मदत करावी.

## १३ आमातिसारांत श्रेष्ठ औषध

तया प्रवाहिते दोषे प्रशाम्यत्युदरामय: ।
जायते देहलघुता जाठराग्निश्च वर्धते ॥
लंघनं चाल्पदोषाणां प्रशस्तमतिसारिणाम् ।
प्रमध्यां मध्यदोषाणां दद्याद्दीपन पाचनीम् । च. चि अ. १९ श्लो २०

त्याने दोष प्रवाहित झाल्यावर उदरांतील विकृति शांत होते शरीर हलकें वाटते. जठराग्नि प्रदिप्त होतो. अल्पदोषवाले अतिसाराचे रोग्यांना लंघन हे हितकारक आहे. दोष जर मध्यम स्थितींत वाढलेलें असेल तर दीपन, पाचन, चिकित्सा करावी.

आमे विलंघनं शस्तमादौ पाचन मेव वा ।
कार्यंचानशनस्यान्ते प्रद्रवं लघुभोजनम् भै. र. १५२

आमातिसारामध्यें प्रथम लंघन करून पाचक औषधें द्यावींत. तसेंच लंघन झाल्यानंतर लाज, पेया, मंड इत्यादि लघु व द्रव असे पदार्थ द्यावेत.



## १४ ताक हे ग्रहणीरोगांत प्रशस्त कां?

ग्रहणीदोषिणां तक्रं दीपनं ग्राहि लाघवात् ।
पथ्यं मधुरपाकित्वान्न च पित्तप्रकोपणम् ॥
कषायोष्णविकाशित्वाद्रूक्षत्वाच्च कफे हितम् ।
वाते स्वाद्वम्लसांद्रत्वात् सद्यस्कमविदाहि तत् भै. र. १६७

ग्रहणी रोगानें पिडीत असलेल्यांना ताक हें हलकें, पाचक, अग्नीस प्रदीप्त करणारे तसेंच तें ग्राही असल्यानें पथ्यकारक आहे. त्याचा पाक मधुर असल्याने पित्ताचा प्रकोप करीत नाही. आणि कषाय, उष्णवीर्य, विकाशी व रुक्ष असल्यानें तें कफप्रकोपास शांत करते. तसेंच तें मधुर, आम्ल आणि सांद्र असल्यानें वातप्रकोपाचें शमन करते. ताबडतोब घुसळलेलें ताक विदाहि होत नाही. तें ग्रहणीस जसें प्रशस्त आहे, तसेंच तें अतिसारांतहि फायदेशीर आहे.

## १५ षडंगयूष अतिसारांत हितकर

हितं लंघनमेवाऽऽदौ पूर्ववत्तेन मानव: ।
षडंगं वाऽथवा यूषं पिप्पल्यादि प्रयोजयेत् ॥ यो. र. ४२७

ह्या अतिसारामध्येंहि ज्वर चिकित्सेंत सांगितल्याप्रमाणें लंघन हेंच प्रथम हितकारक आहे. अथवा षडंगयूष, पिप्पल्यादि यूष यांची योजना करावी.

१६ षडंगयूषकृति

मुद्गयूषं रसं तक्रं धान्यजीरकसंयुतम् ।
षडगं यूषमित्याहुः सैंधवेन समन्वितम् ॥
अग्निसंदीपनं प्रोक्तं ग्रहणीदोषनाशनम् ।
अरोचके ज्वरे चैव श्रेष्ठमेव प्रवाहिके ॥ यो. र. ४२७

मुगाचें कढण मांसरस व ताक यांत सैंधव, जिरे, धनें, यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण केलें म्हणजे त्याला षडंगयूष असें म्हणतात. हा अग्निदीपक, संग्रहणीचा दोष नाशक. अरुचि, ज्वर प्रवाहिका ( आमाशयाची हगवण ) ह्यांजवर फार उत्तम आहे.

१७ अतिसार गेल्याची लक्षणें

यस्योच्चारं विना मूत्रं सम्यग्वायुश्च गच्छति ।
दीप्ताग्नेर्लघुकोष्ठस्य स्थितस्तस्योदरामयः ॥ यो. र. ४२७

ज्याला शौचाला न होता लघ्वी होते, वायु चांगला सरतो, अग्नि प्रदीप्त होतो. व कोठा हलका होतो. त्याचा अतिसार गेला म्हणून समजावे.



१८ दाडिमाष्टक

कर्षोन्मिता तुगाक्षीरी चातुर्जातं तु कार्षिकम् ।
यवानीधान्यकाजाजी ग्रंथिव्योषं पलांशकम् ॥
पलानि दाडिमस्याष्टौ सितायाश्चैकतः कृतम् ।
गुणैः कपित्थाष्टकवच्चूर्णोऽयं दाडिमाष्टकः ।

वंशलोचन १ तोळा, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर ही प्रत्येकी ३-३ मासे. ओवा, धनें, जिरे, पिंपळमूळ, सुंठ, मिरी, पिंपळी ही प्रत्येकी ४-४ तोळे, डाळिंब ३२ तोळे व साखर ३२ तोळे यांचें एकत्र चूर्ण करून घ्यावें. ह्याला दाडिमाष्टकचूर्ण म्हणतात. हें गुणाने कपित्थाष्टक चूर्णाप्रमाणेंच आहे.

१९ शंखोदररस

कम्बूभस्म चतुष्कर्षं कर्षैकमहिफेनकम् ।
जातीफलं टंकणं च पृथक्कर्षं विनिक्षिपेत् ॥
अतिसूक्ष्मं विमर्द्याथ नवनीतेन गुंजकम् ।
रसः शंखोदरो नाम सर्वातीसारनाशनः ॥ यो. र. ४५८

शंखभस्म ४ तोळे, अफू १ तोळा, जायफळ, टांकणखाची लाही १-१ तोळा या सर्वांचा अति बारीक खल करून एक गुंजेप्रमाणे लोण्यांतून द्यावा. याला शंखोदर रस असें म्हणतात. हा सर्व अतिसारांचा नाशक आहे.

## २० अतिसारावर चूर्ण

### लघुगंगाधर चूर्ण

मोचरसमुस्तनागरपाठारलुधातकी कुसुमैः ।
चूर्णं मथितसमेतं रुणद्धि गंगाप्रवाहमपि ॥ यो. र. ४३४

मोचरस, नागरमोथे, सुंठ, पहाडमूळ, टेटूमूळ व धायटीचीं फूलें यांचें चूर्ण निर्जळ दह्याशी घेतलें असतांना तें गंगाप्रवाहासारख्या अतिसाराचेंहि शमन करतें. त्याला लघुगंगाधर चूर्ण असें म्हणतात.

शुण्ठीसातिविषाहिंगुमुस्ताकुटज चित्रकैः ।
चूर्णमुष्णाम्बुना पीतमामातिसारनाशनम् ॥ यो. र. ४३२

सुंठ, अतिविष, हिंग, नागरमोथे, कुडयाची साल व चित्रकमूळ ह्यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें. तें आमातिसाराचा नाश करिते.

### चित्रकादि चूर्ण

चित्रकचूर्ण – ग्रहणी अध्यायांत सांगितलें आहे. तें अतिसारांत फार प्रशस्त आहे.

कलिंगाति विषाहिंगुपथ्या सौवर्चलं वचा ॥
शूलस्तम्भ विबन्धघ्नं देयं दीपनपाचनम् ।

इंद्रजव, अतिविष, हिंग, हिरडेदळ, पादेलोण, व वेखंड यांचें चूर्ण, शूल, मलाचा अवरोध व मळाची गांठ यांचा नाश करिते. तें दिपक व पाचक आहे.

कुटजाति विषाचूर्णं मधुना सह लेहितम् ।
चिरोत्थितमतीसारं पक्वं पित्तास्त्रजं जयेत् ॥ यो. र. ४३४

कुडयाची साल व अतिविष यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें फार दिवसांच्या रक्तपित्तजन्य पक्वातिसाराचा नाश करिते.

### आमातिसारावर चिकित्सा योग

त्र्यूषणाति विषाहिंगुबचासौवर्चलाभयाः ।
पीत्वोष्णेनाम्भसा जह्यादामातीसारमुद्धतम् ॥ यो. र. ४३०

सुंठ, मिरी, पिंपळी, अतिविष, हिंग, वेखंड, पादेलोण, हिरडेदळ यांचें चूर्ण ऊन पाण्याच्या घोटाशीं घ्यावें. तें वाढलेल्या आमातिसाराचा नाश करिते.

धान्यवालक बिल्वाब्दनागरैः शोधितं जलम् ।
आमशूलहरं ग्राहि दीपनं पाचनं परम् ॥ यो. र. ४३१

घनें, वाळा, बेलफळ, नागरमोथे व सुंठ यांचा काढा, आम व शूळ यांचा नाशक असून ग्राही, दीपक व पाचक आहे.

सेवितं सगुडं बिल्वं बिल्वतुल्यपयोधरे । यो. र. ४३१

कोवळचा बेलफळांतील गर व मूळ एकत्र करून खाल्ला असतां आमातिसार दूर होतो.

सत्वाशुण्ठयोषण भंगीसमांशं सूक्ष्मचूर्णितम् ।
यथासात्म्यं सेवनीयं शीततोयानुपानतः ।।
सशूलमामदोषं च नाशमायाति सत्वरम् ।
दध्योदनं पथ्यमत्र उचितं रोगशान्तये ।। यो. र. ४३२

सुंठ, मिरे, भांग, यांचें समभाग चूर्ण करून जसे मानवेल त्या मानानें थंडपाण्याशीं सेवन करावे, म्हणजे शूलयुक्त आमदोष नाश होतो. ह्याजवर रोगशांतीकरितां दहीभाताचें पथ्य करावें.

## २१ अतिसारावर काढे

धान्यनागरजः क्वाथः पाचनो दीपनस्तथा ।
एरण्डमूलयुक्तश्च जयेदामानिलव्यथाम् । यो. र. ४३३

धनें, सुंठ व एरंडमूळ यांचा काढाहि दीपक व पाचक असून आमवातासंबंधीं पीडा दूर करतो.



## २२ रक्तातिसार चिकित्सा

जम्ब्वाम्रामलकीनां च पल्लवैश्च रसो जयेत् ।
मध्वाज्यक्षीरसंयुक्तो रक्तातीसारनाशनः ।। यो. र. ४२८

जांभूळ, आंबा, आवळी या झाडांच्या पानांचा रस, तूप, मध, दूध घालून घ्यावा, म्हणजे रक्तातिसाराचा नाश होतो.

गुडेन खादयेब्दिल्वं रक्तातीसारनाशनम् ।
आमशूलविबन्धघ्नं कुक्षिरोगविनाशनम् ।। यो. र. ४२८

कोवळचा बेलफळाचा गर गुळाशीं खावा. तो रक्तातिसार नाशक असून, आमशूल, मलावरोध व कुशींतील रोग ह्यांचा नाशक आहे.

## २३ प्रवाहिका संप्राप्ति नं. २

वायुः प्रवृद्धो निचितं बलासं नुदत्यधस्तादहिताशनस्य ।
प्रवाहतोऽल्पं बहुशो मलाक्तं प्रवाहिकां तां प्रवदन्ति तज्ज्ञाः ।। सु उ.अ.४०

अहितकारक आहार केल्यानें कोठयांत संचित झालेल्या कफाला जेव्हां प्रकुपींत वायू बाहेर काढण्यास प्रेरीत होतो, तेव्हां कुंथल्यामुळे थोडचा थोडचा प्रमाणांत मलयुक्त कफ गुदामार्गे बाहेर पडतो. या अवस्थेला विद्वान प्रवाहिका असें म्हणतात.

## प्रवाहिका संप्राप्ति

प्रवाहिका वातकृता सशूला पित्तात् सदाहा सकफा कफाच्च ।
सशोणिता शोणितसंभवा च ताः स्नेहरूक्षप्रभवा मतास्तु ॥
तासामतीसारवदादिशेच्च लिंगं क्रमं चामविपक्वतां च ।

वातयुक्त प्रवाहिका, शूलयुक्त, पैत्तिकदाहयुक्त, श्लैष्मिक श्लेष्मायुक्त, रक्तज रक्तयुक्त असते. कफज प्रवाहिका, स्निग्धपदार्थजन्य व वातिक रुक्षपदार्थजन्य असते. (तीक्ष्ण, उष्ण पदार्थजन्य, पित्तज व त्याचप्रमाणे रक्तजप्रवाहिका) या सर्वांचें लक्षण चिकित्सा, आमता व पक्वता याचें वर्णन अतिसाराप्रमाणे करावें.

## २४ प्रवाहिकेवर योग

कल्कः स्याद्बालबिल्वानां तिलकल्कश्च तत्समः ।
दघ्नः सारोऽम्लस्नेहाढ्यः षट् च हन्यात्प्रवाहिकाः ॥ यो. र. ४४८

कोवळ्या बेलफळाचा गर, त्याच्या समान तिळाचा कल्क, दही ( दह्यावरील साय ] डाळिंब, लिंबाचा रस व तूप किंवा तेल हे सहा पदार्थ प्रवाहिकेचा नाश करितात.

बालबिल्वं गुडं तैलं पिप्पली विश्वभेषजम् ।
लिह्याद्वाते प्रतिहते सशूले सप्रवाहिके ॥ यो. र. ४४८

बालबेल (कोवळे बेलफळ), गूळ, तेल, पिंपळी, सुंठ यांचा कल्क वातजन्य वाहिका शूळ ह्याजवर द्यावा.

पयसा पिप्पलीकल्कः पीतो वा मरिचोद्भवः ।
त्र्यहान्निर्वाहिकां हन्याच्चिरकालानुबन्धिनीम् ।: यो. र. ४४८

पिंपळीचा अथवा मिऱ्यांचा कल्क दुधाबरोबर घ्यावा. तो फार दिवसाच्या प्रवाहिकेचा तीन दिवसांत नाश करतो.

तैलं सर्पिर्दधि क्षौद्रं विषा विश्वं सकाणितम् ।
सर्वमालोड्य पातव्यं सद्यो निर्वाहिकां हरेत् ॥ यो. र. ४४८

तेल, तूप, दहि, मध, अतिविष, सुंठ, काकवी हीं सर्व एकत्र करून द्यावी म्हणजे तात्काळ प्रवाहिकेचा नाश होतो.

दध्ना ससारेण समाक्षिकेण भुंजीत निःसारक पीडियस्तु ।
सुतप्तकुण्ठीक्वथितेन वाऽपि क्षीरेण शीतेन मधुप्लुतेन ॥ यो. र. ४४९

ज्याला प्रवाहिकेचा आजार आहे त्याने दही, डाळींबाचा रस व मध याजबरोबर ताक व सुंठ यांची कढी करून त्याजबरोबर किंवा तापवून थंड झालेले दूध व मध ह्याजबरोबर सेवन करावें.

बला विद्वशृतं क्षीरं गुडतैलानु योजितम् ।
दीप्ताग्नि पाययेत्प्रातः सुखदं वर्चसः क्षये ॥ यो. र. ४४९

चिकणामूळ व सुंठ ह्या द्रव्यांनी सिद्ध केलेले दूध, गुळ व तेल घालून ज्याचा जठराग्नि अतिशय प्रदीप्त असून मलाचा क्षय होतो, त्याला प्रातःकाळीं पिण्यास द्यावे.

## २५ षडंगयूष

मुग्दयूषं रसं तक्रं धान्यजीरकसंयुतम् ।
षडंगं यूषमित्याहुः सैन्धवेन समन्वितम् ॥
अग्निसंदीपनं प्रोक्तं ग्रहणीदोषनाशनम् ।
अरोचके ज्वरे चैव श्रेष्ठमेव प्रवाहिके ॥ यो. र. ४२८

मुगाचें कढण, मांसरस व ताक यांत सैंधव, जिरे व धनें यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण केलें असतां त्यास षडंगयूष असें म्हणतात. हा अग्निदीपक संग्रहणीचा दोषनाशक, अरुचि, ज्वर आणि प्रवाहिका ( आमांशाची हगवण ) याजवर फार उत्तम आहे.

## २६ बिल्वमज्जादियोग

बिल्वोषणं गुडं लोध्रं तैल लिह्यात्प्रवाहणे ॥ १२३ भै. र. १६१

कच्च्या बेलफळाची सुकलेली मज्जा, जुना गूळ, तिळाचें तेल, काळे मिरे, हे सर्व समभाग घेऊन दररोज १ तोळा प्रमाणानें सेवन करावेत. त्यामुळे प्रवाहिका थांबते.

## २७ प्रवाहिकेमध्यें भोजन विधी

दध्ना समारेण समाक्षिकेण भुंजीत निश्चारकपीडितस्तु ।
सुतप्तकुध्यक्वथितेन वाऽपि क्षीरेण शीतेन मधुप्लुतेन ॥ भै. र. १६२

दहि ( मलईयुक्त ) त्यांत सहद मिसळून त्याबरोबर प्रवाहिकेने पिडीत मनुष्यास भोजन द्यावें.

अथवा सोनें व चांदी सोडून इतर धातूचा तूकडा तापवून बकरीच्या दूधात सात वेळा बुडवावा. त्यांत मध घालून त्याचें बरोबर जेवण करावे.

## २८ दाडिमादिलेह

दाडिमादि फलप्रस्थं चतुष्प्रस्थजले पचेत् ।
चतुर्भागकषायेऽस्मिंशर्कराप्रस्थमेव च ॥
नागरं पिप्पलीमूलं कणाधान्यक दीप्यकम् ।
जातीफलं जातिपत्रं मरिचं जीरकं तुगा ॥
विजया निम्बपत्रं च समंगा कूटशालमली ।

अरलुवतिविषा पाठा लवंगं च पृथक्पलम् ।।
घृतस्य मधुनाः प्रस्थं सर्वलेहं विपाचयेत् ।
दाडिम्बलेहकं नाम ज्वरातीसारनाशनम् ।।
आमरक्तं चाऽऽमशूलं मान्द्यशोफक्षयापहम् ।
धातुलीनं धातुगतमश्विभ्यां निर्मितं पुरा ।। यो. र. ४५३

कोवळीं डाळींबें ६४ तोळे घेऊन ती २५६ तोळे पाण्यांत शिजवावीत. चवथाई काढा उरला म्हणजे त्यांत ६४ तोळे साखर घालून पाक करावा. आणि त्यांत सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, धने, ओवा, जायफळ, जायपत्री, मिरी, जिरे, वशंलोचन, भांग, बाळांत लिंबाचीं पानें, लाजाळू, काळ्या शेवरीची साल, टेटूमूळ, अतिवीष, पहाडमूळ, लवंग, हे जिन्नस चार चार तोळे घेऊन चूर्ण करावे व त्या पाकांत घालावे. तूप व मध ६४, ६४ तोळे घालून शिजवावे. लेहाप्रमाणे झाल्यावर भांड्यांत भरून ठेवावें. यास दाडिमावलेह असें म्हणतात. हा ज्वरातिसार नाशक आहे. आव, रक्त, आमशूळ, अग्निमांद्य, सूज व क्षय यांचा व धातुगत विकारांचा नाश करतो. हा अश्विनीकुमारानी सांगितला आहे.

## २९. कुटजावलेह

शतं कूटजमूलस्य क्षुण्णं तोयार्मणे पचेत् ।
क्वाथे पादावशेषेऽस्मिल्लेहं पूतं पुनः पचेत् ।।
सौवर्चलयवक्षारबिडसैंधव पिप्पली ।
धातकीन्द्रयवाजाजीचूर्णं दत्वा पलद्वयम् ।।
लिह्याद्बदरमात्रं तु तच्छीतं मधुसंयुतम् ।
पक्वापक्वमतिसारं नानावर्णं सवेदनम् ।।
दुर्वारं ग्रहणीरोगं जयेच्चतैत्प्रवाहिकाम् ।। यो. र. ४५४

शंभर तोळे कुडयाचीं मुळे आणून तीं कुटून १०२४ तोळे पाण्यांत काढा करावा. चतुर्थांश उरल्यावर उतरून गाळून घेऊन पुन्हां पचन करावा. लेहाप्रमाणें दाट झाल्यावर त्यांत पादेलोण, जवखार, बिडलोण, सेंधेलोण, पिंपळी, धायटीची फुलें, इंद्रजव व जिरे यांचें समभाग चूर्ण आठ तोळे त्यांत घालून, ढवळून बोराएवढ्या गोळ्या कराव्यांत. एक एक गोळी मधाबरोबर घ्यावी. याला कुटजावलेह म्हणतात. हा पक्व किंवा अपक्व अतिसार अनेक वर्णाचा, वेदनायुक्त, अतिसार, दुर्धर संग्रहणी रोग व प्रवाहिका यांना जिंकतो.

## ३० संजीवनी गुटिका

विडंग नागरं कृष्णा पथ्या वन्हिर्बिभीतकः ।
बचा गुडूची भल्लातं विषं चात्र प्रयोजयेत् ।।

एतानि समभागानि गोमूत्रेणैव पेषयेत् ।
गुंजाभा गुटिकाः कार्या दद्यादार्द्रकजै रसैः ॥
एकामजीर्णयुक्तस्य द्वे विषूच्यां प्रदापयेत् ।
तिस्त्रो भुजंगदष्टस्य चतस्त्रः संनिपातिनः ।
गुटिका जीवनी नाम्ना संजिवयति मानवम् ॥ यो. र. भा. १५२३

वावडिंग, सुंठ, पिंपळी, हिरडेदळ, चित्रक, बेहडेदळ, वेखंड, गुळवेल, बिब्बे व बचनाग हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून, गोमूत्रांत खल करून गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्यात आणि आल्याच्या रसाशीं द्याव्यात. सर्पदंशावर तीन गोळ्या द्याव्या आणि सन्निपातावर चार गोळ्या द्याव्यात. ही संजीवनी नांवाची गुटिका मनुष्याला सजीव करिते.

## ३१ अहिफेन वटिका

अहिफेनं सखजुरं धृष्ट्वा गुंजैकमात्रकम् ।
रक्तस्त्रावमतीसारमतिवृद्धं विनाशयेत् ॥

शुद्ध अफिम व पेंड खजूर हे दोन्ही वजनांत समभाग घेऊन खलांत घालून बत्त्यानें खूब कुटावें व नंतर घोटावें, नंतर १-१ गुंजेच्या गोळ्या कराव्या. १-१ थंड पाण्याबरोबर घ्याव्या. त्यानें अतिशय वाढलेल्या अतिसाराचा नाश होतो.

## ३२ जातिफलादि वटी (अतिसार)

जातीफलं खर्जुरमहिफेनं तथैव च ।
समभागानि सर्वाणि नागवल्ली रसेनच ॥
वल्लमात्रा वटी कार्या देयातक्रानुपानतः ।
अतीसारं जयेतघोरं वैश्वानर इवाहुतिम् ॥ भैशष्य

जायफळ, पेंडखजूर व अफू समभाग घेऊन विड्याचें पानाचे रसांत मर्दन करून ३ गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्यात. ह्या गोळ्या ताकाबरोबर घेतल्यानें प्रबळ असा अतिसार नाहीसा होतो.

## ३३ कर्पूररस (अतिसार)

हिंगुलमहिफेनश्च मुस्तकेंद्रतयवं तथा ।
जातीफलंच कर्पूरं सर्वं संमर्द्य यत्नतः ॥
जलेन वटिका कार्या द्विगुंजा परिमाणतः ।
ज्वरातिसारिणे चैव तथातिसार रोगिणे ।
ग्रहणी षट्प्रकारेच रक्तातिसार उल्बणे ॥ भै. र.

शुद्ध हिंगुळ, शुद्ध अफू, नागरमोथेचूर्ण, इंद्रजवचूर्ण, जातिफळचूर्ण व कापूर ह्रीं सर्व समभाग घेऊन, वस्त्रगाळ चूर्ण करून पाण्याबरोबर खलांतघोटावें व नंतर २-२ गुंजेच्या गोळ्या करून सावलीत सुकवून भरून ठेवाव्या. याची एक एक गोळी, ज्वरातिसार, अतिसार, सहा प्रकारचे ग्रहणी रोग, तीव्र रक्तातिसार, या विकारांत पाण्याबरोबर द्यावी.

३४ शृतजलाचे महत्त्व

यथा शृतं भवेद्वारि तथाऽतीसारनाशनम् ।
अतिसारं निहन्त्येव शतभागशृतं जलम् ।

पाणी जितकें आटवावें तितकें तें अतिसाराचा नाश करिते. आटवून शतांश उरविलेलें पाणी अतिसाराचा नाश करिते.

३५ षडंगयुष नं. २

बिल्वं च धान्यं च सजीरकं च पाठां च शुण्ठीं तिलसंयुतां च ।
पिष्ट्वा षडंगः स हितो नराणां युतो ह्यतीसारहरः प्रदिष्टः ।।

यो. र. ४२८

कोवळें बेलफळ, धनें, जिरे, पहाडमूळ, सुंठ, तीळ ह्यांचें चुर्ण एकत्र करून वरील प्रमाणें यूष तयार करावा. ह्यालाहि षडंगयूष म्हणतात. हा अतिसार नाशक आहे.

३६ कण्हेरीचे गुण

तृष्णापनयनी लघ्वी दीपनी मलशोधिनी ।
चिरे चैवातिसारे च यवागूः सर्वदा हिता ।। यो. र. ४२८

कण्हेरी ही तहान नाशक, हलकी, अग्निदीपक व मलशोधक असल्यामुळे फार दिवसांच्या अतिसारावर सर्वदा हितकारक आहे.

३७ अंग बाहेर येणें

गुदो बहुभिरुत्थानैर्यस्य पित्तेन पच्यते ।
सिंचयेत्तं सुशीतेन पटोल मधुकाम्बुना ।।
रक्तातिसारिणामाजं पयः सक्षौद्रशर्करम् ।
गुदप्रक्षालने सेके प्रशस्तं पानभोजने ।। यो. र. ४४१

अतिशय रेच झाल्यामुळे पित्त वाढून गुद पिकतें. त्याला पडवळ व जेष्ठमध यांचा काढा करून तो थंड झाला म्हणजे त्याने वरचेवर सेचन करावें. रक्तातिसार झालेल्या मनुष्याला शेळीचें दूध, मध व साखर घालून पिण्यास द्यावे. गुद प्रक्षालन व सेचनहि करावे.

३८ समीरगजकेसरी

नवाहिकेनं कुचिलं नवानि मरिचानि च ।
समभागानि सर्वाणि रक्तिकाप्रमितानि च ।
दद्यात्समीरे चैतानि पुनस्तांबूलचर्वणम् ।
कुब्जे च खंजवाते च सर्वजे गृध्रसीग्रहे ॥
अवबाहौ प्रयोक्तव्यः शोफे कंपे प्रतानके ।
विषूच्यां मरुचौ देयमपस्मारे विशेषतः ॥ र. चं. ३५५

अफू मिरे, कुचला समभाग घेऊन, वस्त्रगाळ चूर्ण करून आल्याच्या रसांत खल करावा. एक एक गुंजेच्या गोळया कराव्या. एक गोळी पाण्याबरोबर गिळून घ्यावी. वरून विडा खावा. कुबडेपणा, लंगडेपणा, त्रिदोषजन्य गृध्रसीवात, अवबाहूक वात, सूज, कंपवात, दंडापतानक, विषूचिका, अरूचि, विशेषतः अपस्मार ह्यावर हें उत्तम गुण देणारें आहे.

अनुभव असा आहे कीं वरील रोगावर गुण खात्रीने येतो. त्याशिवाय श्वास जोराचा उसळला असेल तर समीरगजकेसरी एक गूंज पाण्याबरोबर द्यावी. म्हणजे वीसपंचेवीस मिनिटांत श्वासाचा जोर कमी होतो. तसेंच शूळ कितीहि तीव्र उमळलेला असो. समीरगजकेसरी एक गूंज पोटांत गेल्यावर पंधरा वीस मिनिटांनी तो पोटशूळ ताबडतोब थांबतो· तसेच–

गृध्रसी (सायटिका) चा विकार यावरहि समीरगजकेसरी उत्तम गुण देणारी आहे. तसेच शरीराचे कोणतेहि भागांत कितीहि तीव्र वेदना असल्या तरी समीरगज केसरी घेतल्याने ताबडतोब आराम वाटतो. हें एक अप्रतिम औषध आहे.

३९ ग्रहणी कपाटरस (स्वल्प)

दरदं गंधपाषाणं तुगाक्षीर्यहि फेनकम् ।
तथा वराटिकाभस्म सर्वक्षीरेण मर्दयेत् ॥
रक्तिका युग्ममानेन छायाशुष्कां वटीं चरेत् ।
ग्रहणीं विविधां हंति रक्तातिसारमुल्बणम् ॥ भ. र.

शुद्ध हिंगुळ एक तोळा, शुद्ध गंधक १ तो., वंशलोचन १ तो., शुद्ध अफू १ तो. व कपर्दिकभस्म १ तो. घेऊन पहिल्यापारागंधकाची कज्जली करून नंतर अफू पाण्यांत मिळवून त्यांत ती कज्जली व इतर द्रव्यांचें वस्त्रगाळ चूर्ण मिसळून घोटावें. नंतर त्यांत बकरीचें दुध घालून चांगलें घोटावें. एक प्रहरभर घोटल्यानंतर दोन गूंजेच्या गोळया कराव्या. त्या सावलींत वाळवून भरून ठेवाव्यात. ही गोळी सकाळ संध्याकाळ एक एक थंड पाण्याबरोबर घेतल्याने सर्व प्रकारच्या संग्रहणीचा व अतिसाराचा नाश होतो.

४० ग्रहणीगजकेसरी रस

गन्धं पारदमभ्रकं च दरदं लोहं च जातीफलं ।
बिल्वं मोचरसं विषं प्रतिविषां व्योषं तथा धातकीम् ।
भंगामप्य भयां कपित्थजलदौ दीप्यानलौ दाडिमम् ।
टंकाद्रुस्म कलिंगकान्कनकजं बीजं च पक्षेक्षणम् ॥
एतत्तुर्यमफेनमेतदखिलं संमर्द्य संचूर्णयेत् ।
धत्तूरच्छदजै रसैश्च मतिमान्कुर्यान्मरीचा कृतिम् ।
दत्ता सा ग्रहणीगदं सरुधिरं सामं सशूलं चिरा-
त्तीसारं विनिहन्ति जूर्तिसहितं तीव्रां विषूचीमपि ॥
दुःसाध्यामपि बिम्बसीं परिहरेदुक्तानुपानैरयं ।
नाम्ना तु ग्रहणीमतंगजमदध्वंसीभकण्ठीरवः ॥ यो. र. ४७९

गंधक, पारा, अभ्रक, हिंगुळ, लोहभस्म, जायफळ, मोचरस, बचनाग, अतिवीष, बेलफळ, सुंठ, मिरी, पिंपळी, धायटीचीं फुलें, भांग, हिरडेदळ, कवठ, नागरमोथे, ओवा, चित्रक, डाळिंब, टांकणखाराची लाही, इंद्रजव, धोतऱ्याचें बी, गजग्यांतील बी व यांच्या चवथाई अफू या सर्वांचें बारीक चूर्ण करून त्याला धोतऱ्याच्या रसाची भावना देऊन मिऱ्याएवढ्या गोळ्या कराव्यात. रक्तयुक्त, आमयुक्त, शूलयुक्त संग्रहणी, फार दिवसांचा अतिसार आणि ज्वरयुक्त विषुचिका यांचाहि नाश करितात. या रसाला ग्रहणी गजकेसरी असें म्हणतात.

४१ अतिसार वारणो रस

दरदं कृतकर्पूरं मुस्तेंद्रयव संयुतम् ।
सर्वातिसारशमनं खाकसीक्षीरभावितम् ॥ भै. र.

शुद्ध हिंगुळ, शुद्ध कापूर, नागरमोथा, इंद्रजव हे सर्व समभाग, घेऊन बारीक चूर्ण करून तें वस्त्रगाळ करावे. नंतर अफूच्या पाण्याची भावना द्यावी. चांगली घोटाई झाल्यावर १-१ गुंजेच्या गोळ्या कराव्यात. प्रत्येक वेळेस १ गोळी पाण्याबरोबर घ्यावी. याने सर्व प्रकारचे अतिसार नाहीसे होतात.

४२ ग्रहणी चिकित्सा अतिसारांत उपयोगी

ग्रहण्यां येरसा वाच्यास्ते अतिसारे नियोजिताः ।
हन्युः सर्वमतिसारं शिवस्याज्ञाविशेषतः ॥ भै. र.

ग्रहणीरोगांत ज्या ज्या योगांचा उपयोग केला आहे ते सर्व योग अतिसारांत उपयोगी आहेत. अशी शिवाची आज्ञा आहे.

४३ वर्ज्य पदार्थ

स्नानाभ्यंगावगाहांश्च गुरुस्निग्धाति भोजनम् ।
व्यायाममग्निसन्तापमतीसारी विवर्जयेत् ॥ भै. र. १६६

अतिसारानें पीडीत असलेल्या मनुष्यानें स्नान, तेलानें मालीश करणें, पाण्यांत पोहणें, जड, स्निग्ध व अधिक प्रमाणांत भोजन, व्यायाम, जास्त शेक घेणें व उन्हांतून फिरणें हे सर्व वर्ज्य करावे.

ग्रहणी अध्यायांत जेथे पदार्थ खाण्याकरितां सांगितलें असतील ते सर्व अतिसारांतहि खाण्याकरितां योग्य समजावे. तसेंच जे वर्ज्य करावे म्हणून सांगितलें असतील ते सर्व अतिसारांतहि वर्ज्यच समजावें.

४४ अतिसारावर प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा. योग–१

अतिसार नुकताच सुरू झाला असेल तर सुरुवातीस तीन वेळ पाचक औषध व एकवेळ प्रतिबंधक औषध द्यावे. कारण पुष्कळ वेळा शौचाला होणें व पुष्कळ द्रवभाग बाहेर निघून जाणें हें बरोबर नाही. तो द्रव काय म्हणजे कफ, पित्त, स्वेद, मेद, यांतील जलांश पुष्कळ प्रमाणांत असतो. म्हणून पाचक औषध तीन वेळ देऊन एक वेळ प्रतिबंधक द्यावें. खाण्याकरितां उपवास केला तर फारच चांगलें, नाही तर मोसंबी, डाळिंब, चहा यावरच एक दोन दिवस ठेवावें. पण तेंहि थोडेंच द्यावे. तीन वेळ पाचक औषधें असल्यामुळे व पोटांत अन्न घालण्याचें थांबविल्यामुळे पोटांतील आमाचें सहजच पचन होईल. व बराचसा आमयुक्त मळ बाहेर जाईलहि. पण फारच करपट ढेकर येत असतील तर एकदा वांतीचें औषध द्यावें व वर सांगितल्याप्रमाणें पाचक व फक्त एक वेळ प्रतिबंधक औषध द्यावें. तिसरें दिवशीं दोन वेळ पाचक औषधें व दोन वेळा प्रतिबंधक औषधें द्यावें. जुलाब होत राहुन रोगी गळाला नसेल व शौच्याचे वेळेस दुर्गंधी येत नसेल तर पुन्हां एकदा जुलाब द्यावा. म्हणजे आम निघून जाईल व दुर्गंधी कमी होईल. खाण्याकरितां पुन्हां पुढेहि दोन दिवस वरीलप्रमाणेंच ठेवावें. पिण्याकरितां पाणी उकळी येईपर्यंत तापवून थंड करूनच देत जावे. व दिवसांतून एकदा पोट शेकावें व बांधून ठेवावे. चार दिवसानंतर मात्र खाण्याकरितां फक्त एक वेळ ताक, भात, मीठ व तूप द्यावे. रात्रीं मोसंबी किंवा एक वेळ चहा द्यावा. बिमार अशक्त असेल तर एक वेळ सुवर्ण मालिनीवसंत दुधांतून देत जावा.

अनुभविक चिकित्सा. योग–२

| | |
|---|---|
| संजीवनी | १२ गुं |
| शंखवटी | ४ ,, |
| शंखभस्म | ४ गुं. |

संजीवनीचें कमी प्रमाण दिले तर गुण येत नाही. प्रत्येक वेळी चार गुंज दिल्यानेच काम देते. ३ पुड्या गरम पाण्यांतून सकाळीं, दुपारीं व सायंकाळीं.

गृहणी-गजकेसरी १ गुं.
अग्निकुमार १ ,,

१ पुडी निजतांना गरम पाण्याबरोबर हे दोन योग मिळून ४ वेळ घ्यावे. याप्रमाणे दोन दिवस दिल्यानंतर अतिसार पूर्वीप्रमाणेच होत राहिला तर व शौचाला दुर्गंधी येत असेल तर व करपट ढेकर येंत असेल तर पुन्हा दोन दिवस हेच दोन योग चार वेळ गरम पाण्यंतून द्यावे.

ग्रहणी गजकेसरी २ गुं.
संजिवनी गुटिका ८ ,,
शंखवटी ३ ,,

२ पुड्या सकाळीं व ४ वाजतां.

शंखवटी २ गुं.
अग्निकुमार २ ,,
कपर्दिकभस्म ३ ,,

२ पुड्या दुपारीं १२ वाजतां व रात्रीं ताकांतून किंवा गरम पाण्यांतून देणें.

कर्पूररस ४ गुं.
शंखवटी ४ ,,
संजीवनो १२ ,,

४ पुड्या. सकाळीं, दुपारी, सायंकाळीं व निजतांना कुटजारिष्टांतून घेणें. रोगी आल्याबरोबर फारच गळल्यासारखा दिसेल तर मात्र प्रतिबंधक. पाचक व शक्तिवर्धक अशी योजना करावी.

सुवर्णमालिनी वसंत १ गुंज-सकाळीं दुधांतून देणें, ७ वा.

ग्रहणीगजकेसरी ४ गुं.
शंखवटी ४ ,,
संजिवनी १२

४ पुड्या कुष्टजारिष्ट एक तोळा यांत तितकेच पाणी मिळवून घालून देणें. सकाळीं ८ वाजतां, १२ वाजतां, ५ वाजतां व रात्रीं १० वाजतां. खाण्याकरितां चहा, बिस्किट, मोसं ी, डाळिंब व रोगाचा जोर पाहून भात, ताक किंवा मुगाचे वरण देणें.

## अनुकिभव चिकित्सा योग ३

याच ग्रंथांतील चिकित्सा प्रकरणांत जे औषधीचे पाठ दिले आहेत, त्यांपैकी तीन किंवा चार औषधें. तीन पाचक औषधें व एक प्रतिबंधक अशीं औषधें योग्य प्रमाणांत एकत्र करून तीं ताकांतून किंवा कुटजारिष्टांतून घेणें.

जातिफलादि चूर्ण ८ गुंजा
हिंगाष्टक १६ ,,

अग्निकुमार ४ „

४ पुड्या कुटजारिष्ठांतून घेणें.

खाणे वर दिल्याप्रमाणें व पाणी गरम करून थंड केलेलें. पोट दररोज १ वेळ शेकावे व वरून कपड्याने बांधून ठेवावें.

जुनाट अतिसार असल्यास

पंचामृतपर्पटी ४ गुं.

कपर्दिकभस्म ६ ,,

अग्निकुमार ४ „

४ पुड्या. कुटजारिष्टातून ४ वेळ घेणें. पोट शेकून बांधावे. खाण्यापिण्याकरितां वरीलप्रमाणेंच.

मध्येंच एक वेळेस–

कर्पूरादिवटी १ गुंज गरम पाण्यांत देणें.

रोगी अशक्त असल्यास दररोज १ वेळ सुवर्णमालिनी वसंत वरील औषधिशिवाय देत जावा. तसेंच सुवर्णपर्पटीहि अर्धागुंज मधातून देत जावी.

# संग्रहणी चिकित्सा प्रकरण

## अध्याय १२ वा

### संग्रहणीचे संक्षिप्त वर्णन

संग्रहणी हा रोग आमाशयाचे पुढील भागापासून तो मोठ्या आंतडीच्या सुरुवातीपर्यंतचा लहान आंतडीचा सबंध भाग ज्याला पच्यमानाशयहि म्हणतात, त्या स्थानांत होणारा रोग होय. कारण 'अन्नं पचति विवेचयति च मुंचति' म्हणजे अन्न आमाशयांतून खाली आल्यानंतर ग्रहणीच्या कार्याला सुरुवात होते. अन्नावें पचन होईपर्यंत अन्नाला धरुन ठेवणें, पचन करणें पचन झालेला अन्नाचा सार भाग शरीरांत शोषण करणें व राहिलेला मळभाग मोठ्या आंतडींत सोडून देणें येवढें कार्य सबंध लहान आंतडीशिवाय होणेंच शक्य नाही. सबंध लहान आतडी म्हणजेच ग्रहणी होय. या ग्रहणी रोगांत अग्नि मंद झालेलाच असतो आणि दुषित झालेल्या त्या अग्निमुळे ग्रहणीचे स्थानहि दुषितच झालेले असते, म्हणून ग्रहणीचे कार्यांत बिघाड झालेला असतो. 'अन्न पचति विवेच यातिच मुंचति' ही ग्रहणीची तीनहि कार्ये व्यवस्थित होत नाहीत तर ग्रहणीस्थानांतील जो जो भाग ज्या ज्या मानानें दुषित झाला असेल त्या त्या मानानें अन्नाचें पचन व शोषण होईल, बाकीचा अपक्व भाग बाहेर निघून जाईल व पचन होईपर्यंत अन्न धरून ठेवण्याचें जे ग्रहणीचे मुख्य कार्य आहे तें बरोबर होत नाहीं. उलट पचन होण्याचें अगोदरच अर्धवट पचलेलें अन्न सुटून बाहेर जाते ;हा रोग ओळखण्याला फारच कठीण असतो.

संग्रहणी हा रोग होऊन बरेच दिवस झाले तर लहान आंतडींतील त्वचा, अन्न-नलिका व तोंडांतील जीभ, घसा वगैरे भागांत वारंवार छाले येत राहतात. पुष्कळ उपचार करूनहि तें कायमचे बरे होत नाही. ग्रहणीचा विकार जसजसा कमी होईल त्या मानाने हे छालेहि कमी कमी होत जातात. केव्हां केव्हां तोंड, हात व पाय या भागावर सूजहि येते.

संग्रहणी हा विकार लवकर कळून येत नाही. हा सावकाश वाढणारा आहे. संग्रहणींत होणारीं लक्षणें फार बारकाईनें पाहून निदान ठरवावें लागते.

ग्रहणी रोगांत मुख्यत: दोन विकृति झालेल्या दिसून येतात, एक तर अग्नींत बिघाड झालेला असतो, व दुसरी म्हणजे पचन होईपर्यंत अन्नाला आंतडींतच धरून ठेवणें व धिरे धिरे सोडणें ह्या ग्रहणीचे कार्यांतहि बिघाड झाल्यामुळे अर्धवटच पच-

लेलें अन्न ती बाहेर सोडून देते. वास्तविक पाहिलें असतां अग्नीच्या विकृतीमुळेच ग्रहणी या स्थानांत विकृति झालेली असते. अग्नीची विकृति निघून जाऊन अग्नीचें कार्य सुरळीत होऊं लागले म्हणजे आपोआपच ग्रहणीचें कार्यांत सुधारणा होते व ग्रहणीरोग हा नाहीसा होऊं शकतो. परंतु या पद्धतीमुळे ग्रहणीरोग दुरुस्त होण्याला उशीर लागतो. दोषवृद्धि होत होत जेव्हां दोषाचा प्रसार होऊन दोष स्थानसंश्रय फारच करतो तेव्हां किंवा त्याचे पुढील अवस्थेंतहि दोषाबरोबर स्थानदुष्टीचीहि चिकित्सा केल्यास लवकर गुण येण्यास बरीच मदत होईल. तसेंच कोणत्याहि रोगांत दोष व रोग या दोघाला धरूनच औषधि योजना करणें जरूर असते या दृष्टीनें विचार केल्यावर अग्नीवर चिकित्सा करतांना अपक्वच अन्न सोडून देण्याच्या ग्रहणीच्या दुष्टीवरहि औषध देणें बरेच फायदेशीर होईल. त्यामुळे रोग लवकरच दुरुस्त होण्याला बरीच मदत होते.

एकूण संग्रहणीवरील चिकित्सा ही पाचक, अग्निदीपक व फार थोड्या प्रमाणांत स्तंभक अशी असावी.

संग्रहणी ह्या रोगांत प्रथम तूप २॥ तोळे दररोज चार दिवस पाजावें. त्यामुळे सर्व स्रोतसे व त्यांत चिकटून बसलेले दोष हे मृदु होतात. नंतर सर्व अंग विशेषतः पोटाचा सर्व भाग कडक शेकून टाकावा. त्यामुळे अगोदरच मृदु झालेले दोष शेकण्यानें पातळ होऊन रक्ताभिसरणांत मिसळून कोठ्यांत येतील नंतर वांतीचें औषध देऊन आमाशयांत आलेले दोष वांतीवाटें बाहेर निघून जातील. त्यानंतर एक जुलाबाचें औषध देऊन आंतडींत साचलेले दोष जुलाबावाटे बाहेर निघून जातील. नंतर पाचक, अग्निदीपक औषधें व आंतडीला बल प्राप्त करून देणारीं औषधें पंचामृतपर्पटी, सुवर्णपर्पटी, कुटजारिष्ट हीं व पुढें सांगण्यांत आलेलीं ग्रहणीवरील औषधें रोग्याची शक्ति पाहून सुरूं करावीं. पुढें सांगण्यांत आलेलीं कोणतींहि ३ औषधें एकत्र करून ताकांतून कुटजारिष्टांतून द्यावे. त्यांत एक वेळ तरी प्रतिबंधक औषध असावें. रोगी अशक्त असल्यास दररोज एक वेळ सुवर्णमालिनीवसंत १ गुंज दुधांतून देत जावा.

संग्रहणी रोगांत ताक, मोसंबी, डाळिंब, चहा, आंबे, यावरच राहून औषधोपचार सुरूं ठेवावा. १०-१२ दिवस अन्न खाऊ नये. नंतर भात, मुगाचें वरण ताक, पदिना. आले हे एक वेळ सुरूं करून इतर वेळीं वरील प्रमाणें मोसंबी, ताक, डाळींब यावर राहावें.

संग्रहणी रोगांत महत्त्वाचीं औषधें म्हणजे जातिफलादि चूर्ण लसूणादि व सुवर्णपर्पटी, पंचामृतपर्पटी, संग्रहणीकपाटरस, ग्रहणीगजकेसरी, शंखवटी, अग्नितुंडी, हिंगाष्टक. शंखभस्म, कपर्दिकभस्म, भल्लातकक्षार, चित्रकादि गुटिका, कुटजारिष्ट व पंचलवणगुटिका, बेलाचा मुरंबा हीं औषधें फारच गुणकारी आहेत. शिवाय कपर्दिकभस्महि या रोगांत फार उपयोगी आहेत.

त्याशिवाय बिबा लोण्यांत त्याचें ५-६ थेंब टाकून घेतल्यास फायदा होईल. पण ते उन्हाळ्यांत घेऊ नये.

## ग्रहणी रोगांत पंचकर्म चिकित्सा

(१) गेळफळाचें चूर्ण व काढा द्यावा. (२) एरंडेल व पाचक औषधें द्यावींत. (३) स्नेहन, स्वेदन, अभ्यंग, हे विधि करावेत. (४) मळ आम आहे का निराम आहे हे पाहावे. (५) मळ पाण्यांत बुडत असल्यास मळ आमयुक्त आहे असे समजून पाचक, दीपक औषधें द्यावींत.

## २ संग्रहणीची ओळख

१) शौच्च्याला कधी बांधीव कधी पातळ, तर केव्हां एकाच वेळीं थोडी बांधीव व त्याचबरोबर थोडी पातळ अशी होते.

२) शौच्याला तीनचार दिवस नेहमीप्रमाणें बांधीव होऊन मध्येच एखादे दिवशी पातळ होऊन त्या दिवशी पाय फारच गळल्यासारखे वाटतात व सर्व शरीरालाहि थकवा वाटतो.

३) चार पांच दिवस नेहमीचे प्रमाणांत बांधीव शौच्यास होऊन मध्येच एकादे दिवशीं ती जास्त प्रमाणांत कांही बांधीव व कांही पातळ अशी होते किंवा बांधीवहि नाहीं पातळहि नाही असा ढिसर किंवा चौथ्याप्रमाणें आणि पुष्कळ प्रमाणांत शौच्यास होते. कंबरेपासून खालचा भाग त्या दिवशीं फारच गळल्या सारखा वाटतो व सर्व शरीरालाहि थकवा वाटतो. पाय तर विशेष गळल्यासारखे वाटतात.

४) दररोज एकदाच पण पातळ शौच्यास होत राहणें.

५) तोंडांत छाले येणें. वास्तविक ग्रहणीच्या सबंध स्थानापासून तोंडापर्यंत आलेले असतात. ते कांहीं दिवस बसतात पण पुन्हां येतात, ग्रहणी जुनाट झाली म्हणजे हे छाले बहुतेक नेहमीच रहातात.

६) फुटकळ परसाकडे ३–४ वेळ होणें

७) कातरल्याप्रमाणें पीडा होणें.

८) कच्चा मळ दुर्गंधयुक्त मळ पडणें.

९) आतडी झिजणें

१०) पाण्यानें भरलेला घडा उबडल्याप्रमाणें आवाज होणें.

११) मध्येच कांही दिवस पूर्ण दुरुस्त झाल्यासारखे वाटून पुन्हा पूर्वींची सर्व लक्षणें होतात.

## ३ जठराग्नीमुळे ग्रहणी दुषित

अतिसारे निवृत्तेऽपि मंदाग्ने रहिता शिनः।
भूयः संदूषितो वन्हिर्ग्रहणीमभिदूषयेत्।

ग्रहण्याबलमग्निर्हि स चापि ग्रहणीं श्रितः ।
तस्मात्संदूषिते वन्हौ ग्रहणी सम्प्रदुष्यति ॥ मा. नि.

अतिसार बरा झाल्यावर देखील मंदाग्नि मनुष्याने अपथ्य भोजन केलें असतां दूषित झालेला जठराग्नि ग्रहणीलादेखील दुषित करतो. ग्रहणीचें सामर्थ्य म्हणजे जठराग्नि आहे, आणि तो ग्रहणीच्याच आश्रयानें असतो. ह्यामुळें अग्नि दुषित झाला असतां तो ग्रहणीलाहि दूषित करतो.

४ दुषित ग्रहणीचें लक्षण

नाभेरुपर्यग्नि बलेनोपस्तब्धोपबृंहिता ।
षष्ठी कला पित्तधरा या पूर्वं समुदाहृता ॥
पक्वामाशयमध्यस्था ग्रहणी सा प्रकीर्तिता ।
अपक्वं धारयत्यन्नं पक्वं सृजति पार्श्वतः ॥ मा. नि.
एकैकशः सर्वशश्च दोषैरत्यर्थमूर्च्छितैः ।
सा दुष्टा बहुशो भुक्त मामेव विमुंचति ॥
पक्वं वा सरुजं पूतिः मुहुर्बद्धं मुहुर्द्रवम् ।
ग्रहणीरोगमाहुस्तमायुर्वेदविदोजनाः ॥ मा. ग्रि. रो. न

बेंबीचे वरचे भागीं जठराग्नीचें सामर्थ्यामुळे राहिलेली जी सहावी पित्तधारा नांवाची कला पक्वाशय व आमाशय यांचे मध्यें असते म्हणून सांगितलें आहे. तिला ग्रहणी असे म्हणतात. ती अपक्व अन्न धारण करते आणि पक्व झाल्यावर सोडते. ती प्रकुपित झालेल्या एक एक किंवा सर्व दोषांनी दूषित झाली असतां खाल्लेलें बहुतेक अन्न पचन होण्याचे पूर्वीच सोडते किंवा पक्व झाल्यावर सोडलें तरी शूळयक्त, दुर्गंधीयुक्त, केव्हां बांधीव केव्हां पातळ असा मळ सोडते. त्याला आयुर्वेदवेत्ते लोक ग्रहणी रोग (संग्रहणी) असे म्हणतात.

५ आमसग्रहणीलक्षण

अंत्रकूजनमालस्यं दौर्बल्यं सदनं भवेत् ।
द्रवं घनं शीतं स्निग्धं सकटीवेदनंशकृत् ॥
आमं बहुसपैच्छिल्यं सशब्दं मंदकूजनम् ।
पक्षान् मासाद्दशाहाद्वानित्यं वाऽपि प्रमुंचति ॥
दिवाप्रकोपं आयाति रात्रौशांति व्रजेच्चसा ।
दुर्विज्ञेया दुर्निवारा चिरकालानु बंधिनीं ॥
सा भवेदाम वातेन ग्रहणात ग्रहणी मता ।

पोटांत गुडगुडणें, आळस, अशक्तपणा, व ग्लानी हीं लक्षणें होतात. पातळ, दाट, थंड, स्निग्ध, कटिवेदनांनी युक्त, आम व बुळबुळीतपणा पुष्कळ प्रमाणांत

शब्दयुक्त व किंचित शूळयुक्त असें दहा दिवसांनी, पंधरा दिवसांनी, महिन्यांनी किंवा नित्य शौचास होते. दिवसा अधिक होते व रात्रीं कमी असते. ही ओळखण्यास फार कठीण असून बरी होण्यासहि फार कठीण असते. ही फार दिवस राहते. ही आम व वात दोष ह्यापासून होते. तिला आमसंग्रहणी असे म्हणतात.

६ घटीयंत्र संग्रहणी

स्वपतः पार्श्वयोर्यस्यगलज्जलघटीध्वनिः ।
तं वदंति घटीयंत्रमसाध्यं ग्रहणीगदम् ॥ मा. नि. ग्र. रो.

निजले असतां ज्याचे कुशीमध्यें घागर ओतल्याप्रमाणे आवाज होतो, त्या संग्रहणीला घटीयंत्रसंग्रहणी असें म्हणतात. ती असाध्य आहे.

७ ग्रहणीचे सामान्य लक्षण

दुर्बलोविदहत्यन्नं तद्यात्यूर्ध्वमधोऽपि वा ।
अधस्तु पक्वमाम वा प्रवृत्तं ग्रहणीगदः ।
उच्यते सर्वमेवान्नं प्रायो ह्यस्य विदह्यते ॥ चरक अंक ४३३

दुर्बल अग्नि अन्नाचा विदाह करितो. हें विदग्ध झालेलें अन्न ऊर्ध्व या मार्गानें जाते. खालचे भागाकडे गेलेला पक्व वा अपक्व (आम) मल याला ग्रहणीरोग असें म्हणतात. त्यानें खाल्लेलें सर्व अन्न प्रायः विदग्ध झालेलें असते.

८ ग्रहणी रोगांतील मळाचें लक्षण

अतिसृष्टि विबद्धं वा द्रवं तदुपवेश्यते ।
तृष्णारोचक वैरस्य प्रसेकतमकान्वितः ॥ चरक अंक ४३३

ग्रहणी ना रोगांत होणारा मळ बहुतेक केव्हां बांधीव, केव्हां पातळ असा होतो. त्यांत तहान, अरुचि, तोंड बेचव, लाळ गळणें व तमक, श्वास हीं लक्षणें होतात.

९ आमपक्व मल परीक्षा

मज्जत्वामा गुरुत्वात् विट् पक्वा तुप्लवते जले ।
विनाऽतिद्रवसंघात शैत्य श्लेष्मा प्रदूषणात् ॥
परीक्षैव पुरा सामं निरामं चामदोषिणाम् ।
विधिनोपचरेत् सम्यक् पाचतेनेतरेण वा ॥ चरक. ४३६

आममल जड असतो म्हणून तो पाण्यांत बुडतो. अति द्रव, अति घन, अति थंड, व कफानें दुषित अशा मळाला सोडून पक्वमळ पाण्यावर सरतो. ग्रहणी रोगांत होणारा मळ हा साम आहे कां निराम आहे याची पहिल्यानें परीक्षा करावी. आणि नंतर पाचक किंवा अन्य उपायानें त्यावर उपचार करावें.

## १० ग्रहणीत पित्तांतील द्रवगुणाची वाढ

संग्रहणी हा रोग पित्तांतील द्रवगुण जास्त प्रमाणांत वाढल्यामुळे त्या मानाने पचनाला आवश्यक असे पित्तांतील तीक्ष्ण व उष्ण गुणांत कमीपणा आलेला असतो. आणि यालाच अग्नि बिघडला अग्नि मंद झाला असें म्हणण्याचा प्रघात आहे.

कट्वजीर्ण विदाह्यम्ल क्षाराद्यैः पित्तमुल्बणम् ।
अग्निमाप्लावयत् हंतं जलं तप्त इवानलम् ॥ चरक

तिखट, विदाहि, आंबट, क्षारयुक्त पदार्थ, अजीर्ण वगैरे कारणांनी पित्त वाढून तें ज्याप्रमाणें तापलेलें पाणी अग्नीस नष्ट करितें, त्याप्रमाणें तें वाढलेलें पित्त पाचक अग्नीस नष्ट करतें.

उकळीनें युक्त (उकळत असलेल्या) पाण्यांत जसा भात व बटाटे वगैरे शिजतात परंतु त्याच प्रमाणांत थोडें थंड पाणी घातलें तर तें बटाटे किंवा भात शिजूं शकत नाही. त्याचप्रमाणें पित्त हें सस्नेह, तीक्ष्ण, उष्ण. सर, द्रव या गुणांनी युक्त ( हे गुण योग्य प्रमाणांत ) असले तर ते सर्व अन्नाचें उत्तम रितीनें पाचन करूं शकते. परंतु ह्या गुणांपैकी फक्त द्रव गुणाची वाढ झाली व तीक्ष्ण, उष्ण हे गुण त्या द्रवगुणाचे प्रमाणाइतके वाढले नाही तर पित्तांत द्रवपणाच वाढल्यामुळे अन्नाचें चांगलें पचन होणार नाही.

त्याचप्रमाणें वर सांगितलेल्या संग्रहणी रोगांतील श्लोकांत नमुद केल्याप्रमाणें संग्रहणीत पित्ताची वाढ होते व तापलेलें पाणी जसें विस्तवाला विझविते त्याचप्रमाणे वर नमुद केलेल्या पित्तवृद्धीमुळे अग्नि बंद होतो.

अन्न शिजविण्याकरितां लागणाऱ्या उकळी आलेल्या पाण्याची उष्णता (टेंपरेचर) जसें ठरविक असावे लागते तसेंच खाल्लेल्या अन्नाचें पचन होण्याकरितां आवश्यक अशा पित्तांतील तीक्ष्ण, उष्ण गुण हेहि पित्तांतील द्रवगुणाच्या मानानें ठराविक प्रमाणांतच असावयास पाहिजे. त्यांत द्रवाचें प्रमाणांत वाढ झाली व त्याचबरोबर तीक्ष्ण, उष्ण गुणांची वाढ झाली नाही तर अशा विकृतीपित्ताने अन्नाचें पचन होणार नाही.

( प्युअर हायड्रोक्लोरिक ॲसिड ) मध्यें लोखंडाची शलाका बुडविली तर ती जळूं लागते, परंतु शुद्ध लमाणाम्ला ( हायड्रोक्लोरिक ॲसिड ) मध्य थोडें पाणी घालून डायलूट ( सौम्य ) केलें आणि तीच पूर्वीची शलाका त्यांत बुडविली तर त्या शलाकेवर त्या ( हायड्रोक्लोरिक ॲसिड ) लवणाम्लाचा कांहीच परिणाम होणार नाही.

संग्रहणी रोगांत पित्तांतील द्रवगुणाचीच वाढ होते म्हणून अन्नपचनाचें कार्य नीट होत नाही. आणि त्याकरितां संग्रहणी झालेल्या रोग्यानें पित्तांतील तीक्ष्ण, उष्ण गुण वाढण्याकरितां खालील श्लोकांत नमुद केलेले पदार्थ सेवन करावेत म्हणजे अग्नि प्रदीप्त होऊन रोगनिवृत्ति होण्याला मदत होईल.

११ ग्रहणीत अग्निवर्धक योग

पटूनि पंचद्वौक्षारौ मरिचं पंचकोलकम् ।
दीप्यकं हिंगुगुटिका बीजपूर रसे कृता ।।
कोल दाडीम तोये वा परं पाचन दीपनी ।। वा. भ.

पंचलवणें, जवखार, सजिखार, मिरे, पंचकोल, ओवा, हिंग याचें चूर्ण करून महाळुंगाच्या, बोराच्या किंवा आंबट डाळींबाच्या रसांत घोटून गोळ्या करून खाव्यात. ह्या अतिशय पाचक व अग्निदीपक आहेत.

त्याचप्रमाणें अग्नि प्रदीप्त करणारे पुष्कळ योग मागे सांगितलेच आहेत. त्यापैकी एक दोन रस एकत्र करून ग्रहणीवर देत गेल्यास व पथ्येनें राहिल्यास संग्रहणीचा नाश होतो.

१२ ग्रहणी पंचकर्म चिकित्सा

अग्नेर्निवापक पित्तं रेकेण वमनेन वा ।
हत्वा तिक्त लघु ग्राहि दीपनैरविदाहिभिः ।। वा. भ. सं. श्लो. ३३
अन्नैः संधुक्षयेदग्नि चूर्णे स्नेहैश्च तिक्तकैः ।

अग्नीस मंद करणारें पित्त विरेचनानें किंवा वमनाने कमी करून कडु, हलकी, स्तंभक, दीपक, अविदाहि अशीं अन्नें आणि कडु औषधांचीं चूर्णें व कडु औषधांनीं सिद्ध केलेलें स्नेह यांनी अग्नि प्रदीप्त करावा.

ग्रहणीमाश्रितं दोषमजीर्णवदुपाचरेत् ।
अतिसारोक्त विधिना तस्यामंच विपाचयेत् ।- वा. भ. ग्रहणीं

ग्रहणी रोगाची चिकित्सा अजिर्णाप्रमाणें करावी. आणि अतिसारांत सांगितलेल्या पद्धतीनें आमाचें पचन करावे.

ग्रहण्यां श्लेष्मदुष्टायां तीक्ष्णैः प्रच्छर्दने कृते ।
कट्वम्ललवणक्षारैः क्रमादग्नि विवर्धयेत् ।। वा. भ. संग्रहणी

ग्रहणी कफानें दुषित झाली असतां तीव्र वमन देऊन, मग तिखट, आंबट, खारट व क्षार यांनीं क्रमाक्रमानें अग्नि प्रदीप्त करावा.

१३ संग्रहणीवर दीपक औषधें

पेयादि पंचलवणं पंचकोलादिभिर्युतम् ।
दीपनानि च तक्रं च ग्रहण्यां संप्रयोजयेत् ।। यो. र.

पंचलवणें ( सैंधव, संचळ, बिडलोण, सांबरलोण व मीठ ) आणि पंचलोण ( सुंठ, मिरे, पिंपळी, चवक, चित्रक ) यांनी युक्त पेज वगैरे दीपक औषधें व ताक यांची योजना संग्रहणीवर करावी.

शरीरानुगते सामे रसे लंघनपाचनम् ।
विशुद्धामाशयायास्मै पंचकोलादिभिर्युतम् ॥
दद्यात्पेयाऽऽदिलघ्वन्नं पुनर्योगांश्च दीपनान् भै. र. १६७

जर आमरस सर्व शरीरावर पसरला तर लंघन आणि पाचन करावयास पाहिजे व लंघनानें कोठा शुद्ध झाल्यावर पंचकोल–पिंपळी, पिंपळीमूळ, चवक, चित्रक, सुंठी यांचा काढा व त्यांत सिद्ध केलेली पेया इत्यादि हलके अन्न तसेंच पाचक, अग्निदीपक योगांचा उपयोग करावा.

## १४ ग्रहणींत आमदोष चिकित्सा

ग्रहणीमाश्रितं दोषं विदग्धाहारमूर्च्छितम् ।
सविष्टम्भ प्रसेकार्ति विदाहारुचि गौरवैः ॥
आमलिंगान्वितं ज्ञात्वा सुखोष्णेनाम्बुनोद्धरेत् ।
फलानां वा कषायेण पिप्पली सर्षपैस्तथा ॥
लीनं पक्वाशयस्थं वाऽप्यभि स्राव्यं स दीपनैः ।
शरीरानुगते सामे रसे लंघन पाचनम् ॥
विशुद्धामाशयांमास्मै पंचकोलादिभियुतम् ।
दद्यात् पेवादि लध्मन्नं पुनर्योगांश्च दीवनात् । चरक अंक ४३६

विदग्ध आहारानें हतबल झालेले दोष ग्रहणीचे आश्रयानें असून त्यांत अवष्टंभ, लाळ गळणें, पिडा, विदाह, अरुचि, जडपणा हीं आमाचीं लक्षणें होत असतील तर कोमट पाणी, गेळफळाचा काढा किंवा पिंपळी व सरसू यांचा काढा देऊन ते दोष काढून टाकावे. आमदोष पातळ होऊन पक्वाशयांत गेल्यास दीपक औषधें मिश्रित एरंडेल किंवा आरग्वधादि काढा वगैरे सारक औषधें देऊन ते काढून टाकावेत.

आमरस सर्व शरीरांत पसरला असतां लंघन पाचन द्यावे. त्याने आमाशय शुद्ध झाला म्हणजे पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ किंवा यासारखीं दुसरीं दीपक औषधें घालून तयार केलेली पेज वगैरे हलकें अन्न तसेंच दुसरे हलकीं व दीपक औषधें द्यावीत.

## १५ सामान्य संग्रहणीची चिकित्सा

शुण्ठीं समुस्तातिविषां गुडूचींपिबेज्जलेन क्वथितां समांशाम् ।
मन्दानलत्वे मतमामवाते सामानुबन्धे ग्रहणीगदे च ॥ यो. र.

सुंठ, अतिविष, नागरमोथें गुळवेल हीं द्रव्यें समभाग घेऊन त्यांचा काढा करून तो अग्निमांद्य, आमवात, आमयुक्त संग्रहणी या विकारांवर द्यावा.

१६ वातग्रहणीवर चिकित्साक्रम

अथैनं परिपक्वाममारुत ग्रहणीगदम् ।
दीपनीययुतं सर्पिः पाययेदल्पशो भिषक् ।।
किंचित्संधुक्षिते त्वग्नौसक्तविण्मूत्रमारुतम् ।।
द्व्यहं त्र्यहं वा संस्नेह्य स्विन्नाभ्यक्तं निरूहयेत् ।।
तत एरंडतैलेन सर्पिषा तैल्वकेन् वा ।
सक्षारेणाऽनिले शाते स्रस्तदोषं विरेचयेत् ।। वा. भ. ग्रहणी अ.

आमाचें पचन झाल्यावर वातग्रहणीच्या रोग्यास वैद्यानें दीपक औषधें घालून थोडे थोडें तूप प्यावयास द्यावे. यापासून अग्नि कांहीसा प्रदीप्त झाला म्हणजे मळ, मूत्र व वायू याचा अवरोध असल्यास, दोन किंवा तीन दिवस स्नेहन, स्वेदन व अभ्यंग करून निरुह बस्ति द्यावा. यानें वायू कमी होऊन दोष शिथील झाले म्हणजे एरंडेल किंवा तिल्वक घृत, जवखार घालून जुलाब होण्याकरिता द्यावे.

१७ वातसंग्रहणीची चिकित्सा

धान्यबिल्वबलाशुण्ठीशालीपर्णीशतं जलम् ।
स्याद्वातग्रहणीदोषे सानाहे मलपरिग्रहे ।। यो. र.

वातसंग्रहणी, पोट फुगणें व मलावरोध याजवर धनें, बेलफळ, सुंठ, चिकणामूळ व सालवण या द्रव्यांनी शिजवून तयार केलेलें पाणी द्यावे.

१८ पित्तसंग्रहणीची चिकित्सा

नागरातिविषामुस्तं धातकी सरसांजनम् ।
वत्सकत्वक्फलं बिल्वं पाठा तिक्तकरोहिणी ।।
पिबेत्समांशं तच्चूर्णं सक्षौद्रं तण्डुलाम्बुना ।
पित्तजे ग्रहणीदोषे रक्तं यश्चोपवेश्यते ।।
अर्शांसि हृग्दुदे शूलं जयेच्चैव प्रवाहिकाम् ।
नागराद्यमिदं चूर्णं कृष्णात्रेयेण पूजितम् ।।

सुंठ, अतिविष, नागरमोथे, धायटीचीं फुलें, रसांजन, कुडयाची साल, इंद्रजव, बेलफळ, पहाडमूळ, काडेचिराईत व कुटकी यांचें समभाग चूर्ण करून तांदुळाचें धुवण, मध याशीं घ्यावे. म्हणजे पित्त संग्रहणी, रक्त पडणें, मूळव्याध, हृदरोग, शूल व प्रवाहिका यांचा नाश होतो. हे नागरादीचूर्ण कृष्णात्रेय मुनीला मान्य आहे.

१९ कफसंग्रहणीची चिकित्सा

शठी व्योषाभयं क्षारौ ग्रन्थिकं बीजपूरकम् ।

**लवणाम्लाम्बुना पेयं श्लैष्मिके ग्रहणीगदे ।। यो. र.**

कचोरा, सुंठ, मिरी, पिंपळी, हिरडेदळ, सज्जीखार, जवखार, पिंपळमूळ व महाळुंग यांचें चूर्ण कफ संग्रहणीवर मीठ व पाणी ह्याशीं घ्यावे.

## २० ग्रहणीत द्यावयाचे तंडुलोदक

**शीतकषायमानेन तण्डुलोदक कल्पना ।**
**केऽप्यष्ट गुणतोयेन प्राहुस्तण्डुल भावनाम् ।। भै. र. १६९**

शीत कषायाप्रमाणें पदार्थाच्या सहापट गरम पाणी घालून तंडुलोदक तयार करावे. कांही आचार्यांचें मतानुसार १ भाग तांदुळ ८ भाग पाण्यात एक रात्र भिजत ठेवून सकाळीं ते तांदूळ त्याच पाण्यांत हाताने घासून गाळून घ्यावे. व ते ग्रहणी रोग्यांना द्यावे.

## २१ कपित्थादि पेया

**कपित्थ बिल्व चांगेरी तक्रदाडिम साधिता ।**
**पाचनी ग्राहिणी पेया सवाते पांच मूलिकी ।। भै. र. १६७**

कवठांतील गर, आम, बिल्वफळांतील शुष्क भाग, आंबटचुका, डाळींबाचे फळाची साल किंवा डाळींबाचे दाणे हे सर्व समभाग घेऊन त्यापासून तयार केलेली पेया ही पाचक व ग्राही आहे. ही पेया आमदोषाचें पाचन करते. मळ घट्ट करून धारणाशक्ति उत्पन्न करते. कफवातजन्य ग्रहणी विकारांचा नाश करिते. वातजन्य ग्रहणी रोगांत लघुपंचमूळ पेया हितकर होते.

## २२ तंडुलोदक

**षड्भिः पलैश्चतुर्भिर्वा सलिलाच्छीत फाष्टयीः ।।**

**इति शिवदास च. द. ग्रह चि.**

(१) कांही लोकांचें असें मत आहे की एक भाग तांदूळ व दोन भाग पाणी हे दोन्ही २ प्रहरपर्यंत भिजत ठेऊन तंडुलोदक तयार करावे.

(२) कांही लोकांचे मतानुसार अनियमित पाणी आणि तांदुळ दोन्ही परस्पर मिळवून घासून तंडुलोदक तयार करावे.

(३) वृंदाचे मताप्रमाणें एक भाग तांदूळ बारीक कुटून, आठ भाग पाण्यांत मिळवून गाळून, तंडुलोदक तयार करावे, तें ग्रहणीरोग्यांना हितकर आहे.

**कण्डितं तण्डुलपलं जले त्वष्टगुणे क्षिपेत् ।**
**धौतं कृत्वा जलं तच्च तण्डुलोदकमुच्यते ।।**

## २३ ताकाचे महत्व

**सप्ताहं वा दशाहं वा मासं मासार्धमेव वा ।**

बलकालविभागज्ञो भिषक् तक्रं प्रयोजयेत् ॥
न तक्रदानात्प्रभवन्ति रोगा न तक्रसेवी व्यथते कदाचित् ।
यथा सुराणाममृतं प्रधानं तथा नराणां भुवि तक्रमाहुः ॥
तक्रं नोरःक्षते दद्यान्नोष्णकाले न दुर्बले ।
न मूर्छाभ्रमदाहे च न रोगे वातपैत्तिके ॥ यो. र. ४७०

वैद्यानें रोग्याचें बल व काल यांचा विचार करून सात, दहा, पंधरा दिवस, एक महिनापर्यंत ताकाची योजना करावी. ताक दिलें असतां रोग होत नाहीत. ताक सेवन करणारा मनुष्य कधीहि आजारी होत नाही. जसें देवांना अमृत प्रधान आहे, तसे मनुष्याला या पृथ्वीवर ताक हें मुख्य आहे. उन्हाळ्यामध्यें ताक सेवन करूं नये. उराक्षती रोग्याला ताक देऊं नये. अशक्त मनुष्याला ताक देऊं नये. भ्रम, मूर्च्छा, दाह, व रक्तपित्त या रोगांत ताक देऊं नये.

२४ ताक हें ग्रहणीरोगांत प्रशस्त कां

ग्रहणीदोषिणां तक्रं दीपनं ग्राहि लाघवात् ।
पथ्यं मधुरपाकित्वान्न च पित्तप्रदूषणम् ॥
कषायोष्णविकाशित्वाद्रूक्षत्वाच्च कफे हितम् ।
वाते स्वाद्वाम्लसांद्रत्वात्सद्यःकामविदाहि तत् ।
अरुचौ मातुलुंगस्य केसरं साज्यसैन्धवम् ।
दद्याद्भोजनकाले तु प्रातस्तक्रं च रोगिणाम् ॥ यो. र. ४७१

ताक हें दीपक, ग्राहक व हलकें असल्यामुळे संग्रहणीच्या रोगाला पथ्यकारक आहे. तें मधुर व विपाकी असल्यामुळे पित्ताचा प्रकोप होऊं देत नाही. तुरट, उष्ण, विकाशी व रुक्ष असल्यामुळे कफदोषाला पथ्यकारक आहे. आंबट, गोड, दाट असल्यामुळे ते वाताला हितकारक आहे. आणि लवकर केलेलें ताक विदाही नसते. संग्रहणीच्या रोग्याला अरूचि दूर होण्याकरितां जेवणाचेवेळीं महाळुंगाचें केशर, तूप, सैंधव खाण्यास द्यावे व ताक सकाळचे प्रहरीं पिण्यास द्यावें.

२५ संग्रहणीवर चूर्ण नं. १

दहनाजमोदसैन्धवनागरमरिचं पिबाम्ल तक्रेण ।
सप्ताहादग्निबलं ग्रहण्यतीसार शूलघ्नम् ॥ यो. र.

चित्रकमूळ, ओवा, सैंधव, सूंठ, मिरी यांचें चूर्ण आंबट ताकाशीं घ्यावे. म्हणजे सात दिवसांत अग्नि प्रदीप्त होऊन संग्रहणी, अतिसार व शूळ यांचा नाश होतो.

संग्रणीवर चूर्ण. नं–२

चूर्णं चव्यकचित्रश्रीविश्वभेषजनिर्मितम् ।

तक्रेण सहितं हन्ति ग्रहणीं दुःखकारिणीम् ॥ यो. र.

चवक, चित्रक, कोवळें बेलफळ व सुंठ यांचें चूर्ण ताकाशीं घेतलें असतां तें दुःखकारक संग्रहणीचा नाश करिते.

संग्रहणीवर चूर्ण. नं.–३

श्रीफलशलाटुकल्को नागरचूर्णेन मिश्रितः सगुडः ।
ग्रहणीगदमत्युग्रं तक्रभुजा शीलितो जयति ॥ यो. र. ४६८

बेलफळ व टेटूमूळ यांचा कल्क, सुंठीची पूड व गूळ ह्याशीं घेऊन जेवण करावें. म्हणजे अति उग्र अशा संग्रहणीचा नाश होतो.

२६ जातिफलादि चुर्ण

जातीफललवंगैलापत्रत्वंनागकेसरैः ।
कर्पूरचन्दनतिलैस्त्वक्क्षीरीतगरामलैः ॥
तालीसपिप्पलीपथ्यास्थूलजीरक चित्रकैः ।
शुण्ठीविडंगमरिचैः समभागं विचूर्णितैः ॥
यावन्त्येतानि सर्वाणि दद्याद्भृंगां च तावतीम् ।
सर्वचूर्णसमा देया शर्करा सुभिषग्वरैः ॥
कर्षमात्रं ततः खादेन्मधुना प्लावितं सुधीः ।
अस्य प्रभावाद् ग्रहणीकासश्वासारुचिक्षयाः ।
वातश्लेष्म प्रतिश्यायाः प्रशमं यान्ति वेगतः ॥ यो. र. ४७५

जायफळ, लवंग, वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर, कापूर, चंदन, लोध्र, वंशलोचन, तगर, आवळकाठी, तालीसपत्र, पिंपळी, हिरडेदळ, मोठे जिरे, चित्रकमूळ, सुंठ, वावडींग, मिरी या सर्वांचें समभाग चूर्ण करावे. व सर्व चूर्णाच्या बरोबरीनें भांगेचें चूर्ण मिसळावें व सर्व चूर्णाच्या बरोबरीनें साखर मिसळावी. हें चूर्ण एक तोळापर्यंत मधाशीं घ्यावें. याला जातिफलादि चूर्ण म्हणतात. याच्या प्रभावानें संग्रहणी, श्वास, खोकला, अरुचि, क्षय व वातकफात्मक पडसें हें विकार बरे होतात.

२७ लशुनाद्यं चूर्णम्

लसुनजीरक सैन्धवसंचलं त्रिकटुरामठचूर्णमिदं समम् ।
सपदि निम्बुरसेन विसुचिकां हरति भो रतिभोग विचक्षणे ॥
भा. भै. र. भा. ४।४७५

लसूण, जिरे, सैंधव, काळें मीठ, मिरे, पिंपळी, हिंग ही समभाग घेऊन त्याचें चूर्ण करावें. लिंबाचे रसाबरोबर सेवन केल्याने विशुचिका तावडतोब नाश पावते.

२८ त्रिकट्वादि चूर्ण

व्योषं दीप्याजमोदा कृमि रिपुदहनं रामठं चाश्वगन्धं ।
सौवर्चलं जीरके द्वे रुचकपलयुतं धान्यकं तुल्यभागम् ।
भृंगीचूर्णं लवंगं घृतमधुसहितं शाणमात्रं च दद्या-
द्दीप्तिं पुष्टिं च कान्तिं बलमपि कुरुते नाशयेत्संग्रहण्याम् ॥ यो. र. ४७३

सुंठ, मिरी, पिंपळी, ओवा, अजमोदा, वावडींग, चित्रकमूळ, हिंग, अश्वगंध, सैंधेलोण, जिरे, शहाजिरे, महाळुंगातील केशर व धनें हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून तें भांगेचें चूर्ण, लवंगाचें चूर्ण, तूप व मध यांशीं तीन मासेपर्यंत द्यावे. हें अग्नि प्रदीप्त करते. शरीर पुष्ट करते. कांति व बल वाढविते आणि संग्रहणीचा नाश करिते.

२९ हिमांश्वादि चूर्ण

हिमांशु रास्ना लवणानि पथ्याक्षारद्वयं सर्जियवोत्थितं यत् ।
कटुत्रिकं चापि समं समानं तद्बीज पूरोत्थरसेन भाव्यम् ॥
ततो विचूर्णीकृतमुष्णवारिणा पिबेच्च वन्हेर्बहुधाऽभिवृद्धये ।
बलस्य वर्णस्य समृद्धिसिद्धये मरुत्ककोत्थ ग्रहणी विनाशकृत् ॥
भै. र. १६९

शुद्ध कापूर, रास्ना, पंचलवण, हिरडा, सज्जीखार, यवक्षार, सुंठ, मिरी, पिंपळी हे सर्व समभाग घेऊन कुटून वस्त्रगाळ करावे, त्यास लिंबाचे रसाची भावना द्यावी व सुकवावें. हें चूर्ण अर्धा ते १ तोळापर्यंत उष्ण पाण्याबरोबर द्यावें. त्यामुळे बल, वर्ण, पाचक अग्नि यांची वृद्धि होते. तसेंच ते कफजन्य व वातजन्य ग्रहणी विकारांचा नाश करिते.

३० श्रीफलशलाटु कल्क

श्रीफलशलाटुकल्को नागरचूर्णेन मिश्रितः सगुडः ।
ग्रहणीगदमत्युग्रं तक्रभुजा शीलितो जयति ॥ भै. र. १६६

बिल्वाचें फळांतील मगज ३ मासे, घेऊन पाण्याबरोबर घोटावी व कल्क तयार करावा. त्याच्या चवथाई सुंठ व १ तोळा जुना गूळ याबरोबर मिळवून सेवन केल्यानें भयंकर असा ग्रहणीरोग नाहीसा होतो. या औषधावर ताकाबरोबर हलकें अन्न खावे.

३१ नागरादिक्वाथ

नागरातिविषामुस्ताक्वाथः स्यादामपाचनः ।
चूर्णं हिंग्वष्टकं वाऽपि वातिकेऽष्टपलं घृतम् ॥ भै. र. १६८

सुंठ, अतिविष व नागरमोथा यांचा योग्य विधीनें तयार केलेला काढा आम

दोषांचें पाचन करतो. वातिक ग्रहणी विकारांत हिंगाष्टक चूर्ण किंवा अष्टपळ घृत अधिक हितकर आहे.

३२ चातुर्भद्र क्वाथ

गुडूच्यति विषाशुण्ठी मुस्ताः क्वाथः कृतो जयेत् ।
आमानुषक्तां ग्रहणीं ग्राही दीपन पाचनः ॥ भै. र. १६८

गुळवेल, अतिवीष, सुंठ व नागरमोथा यांचा योग्य तऱ्हेने केलेला काढा आमदोषयुक्त ग्रहणी विकाराचा नाश करतो. तसेंच तो ग्राही, अग्निदीपक आणि आमदोषाचें पचन करणारा आहे.

३३ भल्लातक क्षार

भल्लातकं त्रिकटुकं त्रिफला लवणत्रयम् ।
अन्तर्धूमं द्विपलिकं गोपुरीषाग्निना दहेत् ॥
स क्षारः सर्पिषा पीतो भोज्ये वाऽप्यनचर्णितः ।
हृद्रोग पाण्डुग्रहणी गुल्मोदावर्तशूलनुत् ॥ यो. र. ४७०

बिब्बे, सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहाडा, आवळकंठी, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण हे जिन्नस आठ आठ तोळे घेऊन, शरावसंपुटांत घालून गाईच्या शेणींत अंतर्धूमानें राख करावी. नंतर चूर्ण करून हा क्षार जेवणाचें वेळीं तूपाबरोबर घ्यावा. म्हणजे हृदरोग, पांडुरोग, संग्रहणी, गुल्म उदावर्त व शूल यांचा तो नाश करतो.

३४ पंचलवण गूटिका

पटूनि पंचद्वौक्षारौ मरिचं पंचकोलकम् ।
दीप्यकं हिंगु गुलिका बीजपूररसे कृता ॥
कोलदाडिम तोये वा परं पाचन दीपनी ॥ वा. भ.

पंचलवणें, जवखार, सज्जिखार, मिरे, पंचफोल, ओवा व हिंग यांचें चूर्ण करून महाळुंगाच्या, बोरांच्या किंवा आंबट डाळिंबाच्या रसांत गोळ्या करून खाव्यांत. ह्या अतिशय पाचक व अग्निदीपक आहेत.

३५ चित्रकादि गुटिका

चित्रकं पिप्पलीमूलं द्वौ क्षारौ लवणानि च ।
व्योषं हिंग्वजमोदा च चव्यमेकत्र चूर्णयेत् ॥
गुटिका मातुलुंगस्य दाडिमस्य रसेन वा ।
कृता विपाचयत्यामं दीपयत्याशु चानलम् ॥ यो. र. ४७०

चित्रक, पिंपळमूळ, सज्जीखार, जवखार, सैंधव, संचल, बीडलोण, सांबरलोण, मीठ, सुंठ, मिरे, पिंपळी, हिंग, ओवा व चवक यांचें समभाग चूर्ण एकत्र करून महालुंगाच्या अथवा डाळींबाच्या रसांत गोळ्या कराव्यांत. ह्या आमाचें पाचन करितात व जठराग्नीस प्रदीप्त करितात.

३६ शंखवटी

चिंचाक्षारपलं पटुव्रजपलं निम्बुरसे कल्कितं ।
तस्मिंशंखपलं प्रतप्तमसकृन्निर्वाप्यशीर्णावधि ।।
हिंगुव्योषपलं रसामृतबली निक्षिप्य निष्कांशकान् ।
बध्द्वा शंखवटी क्षयग्रहणिकारुक्पक्तिशूलादिषु ।। यो. र. ४८१

चिंचेच्या टरफलाचा क्षार ४ तोळे व पंचलवणें ४ तोळे. यांचा लिंबाच्या रसांत खल करून शंखाचें तुकडे ४ तोळे घेऊन, तापवून त्यांत बुडवावेत. याप्रमाणें शंखाचें चूर्ण होईपर्यंत करावे. नंतर हिंग, सुंठ, मिरी, पिंपळी हीं चार चार तोळे, पारा, बचनाग व गंधक हीं तीन तीन मासे या सर्वांचा खल करून गोळ्या कराव्यात. याला शंखवटी असें म्हणतात. ही संग्रहणी, क्षय, शूळ व परिणामशूळ इत्यादिकांचा नाश करिते.



३७ लशुनादि वटिका

लसूण, जिरे, हिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, शुद्ध गंधक व सेंधेलोण, हीं आठ औषधें समभाग घेऊन लिंबाच्या रसांत ३ दिवस खल करावा व त्याच्या २ गुंजेच्या प्रमाणाने गोळ्या कराव्यात, प्रमाण २ ते ४ गोळ्या अनुपान ताक.

३८ दुग्धवटी

गृहीत्वा दरदात्कर्षं तदर्धं देवपुष्पकम् ।
फणिफेनं विषं जातीफलं धत्तुरबीजकम् ।।
मर्द्दयेत्विजयाद्रावैर्मुगदमात्रां वटीं चरेत् ।
अनुपानं प्रदातव्य शोथे क्षीरं भिषग्वरः ।।
ग्रहण्यां विजयाक्वाथः पथ्यं दुग्धान्नमेव हि ।
जलं च लवणं चापि वर्जनीयं विशेषतः ।।
प्रबलायामुदन्यायां सलिलं नारिकेलजम् ।
पातव्यं गुटिका चैषा शोथं हन्ति न संशयः ।
ग्रहणीमतिसारं च ज्वरं जीर्णं निहन्ति च ।। भै. र. २०२

एक तोळा हिंगुळ व लवंग, अफू, बचनाग, जायफळ, धोतऱ्याचें बी, हे प्रत्येकी अर्धा अर्धा तोळा घेऊन वस्त्रगाळ करून भांगेच्या रसांत घोटावें. त्याच्या मुगाएवढ्या

गोळ्या कराव्यात. रोग्याच्या अवस्थेप्रमाणें १–२ गोळ्या दुधाबरोबर शोथरोगांवर व संग्रहणींत भांगेच्या काढ्याबरोबर घ्याव्यात. पथ्य दुधाबरोबर अन्न द्यावें. पाणी व मीठ देऊं नये. जर पाण्यावाचून रोगी राहूं शकत नसेल तर नारळांतील पाणी द्यावें. या गोळ्या सेवन केल्याने भीषण शोथ, ग्रहणी, अतिसार, जीर्णज्वर हे नाहीसे होतात.

३९. जातीफलादी वटी नं. २ (गुटिका)

जातीफलं टंकणमभ्रकंच धत्तूरबीजं समभागचूर्णम् ।
भागद्वयाढ्यं त्वहिफेनयुक्तं गंधालिकापत्ररसेन मर्द्यम् ॥
चणप्रमाणा वटिका विधेया मधुप्रयुक्ता ग्रहणीगदेषु ।
रोगेषु दद्यादनुपानभेदैर्युक्त्या विदध्यादतिसारवत्सु ॥
सामेषु रक्तेषु सशूलकेषु पक्वेष्वपक्वेषु गूदामयेषु ।
पथ्यं सदध्योदनमत्रदेयं जातीफलाद्या ग्रहणीहरेयम् ॥ भै. र. १९३

जायफळचूर्ण, टांकणखार, अभ्रकभस्म, धोतऱ्याचें बीज या द्रव्यांचें समभाग चूर्ण घेऊन, त्यांत दुप्पट अफू घालून कापुरकाचरीच्या पानांच्या रसाची एक प्रहरपर्यंत भावना द्यावी. व त्याच्या चण्याएवढ्या गोळ्या कराव्यात. याची एक गोळी मधाबरोबर सेवन करावी. अनुपान भेदाने ग्रहणी, अतिसार, पक्वातिसार, आमातिसार रक्तातिसार, शुलयुक्तअतिसारपक्वापक्वातिसार तसेंच गुदाचें ठिकाणींहोणारे निरनिराळें रोग, अर्श, भगंदर इत्यादीमध्यें ही ग्रहणीनाशक जातीफलादिवटी सेवन करावी. पथ्य दहि आणि भात द्यावा.

४० विजयपर्पटी

रसं वज्रं हेम तारं मौक्तिकं ताम्रमभ्रकम् ।
सर्व तुल्येन गन्धेन कुर्याद्विजय पर्पटीम् ॥
दुर्वारां ग्रहणीं हन्ति दुःसाध्यां बहुवार्षिकीम् ।
आमशूलमतीसारं चिरोत्थमतिदारुणम् ॥
प्रवाहिकां षडर्शांसि यक्ष्माणं सपरिग्रहम् ।
शोथं च कामलां पाण्डु प्लीहगुल्मजलोदरम् ॥
पक्तिशूलमम्लपित्तं वातरक्तं वमिं भ्रमिम् ।
अष्टादशविधान् कुष्ठान् प्रमेहान् विषमज्वरान् ॥
चतुर्विधमजीर्णंच मन्दाग्नित्वमरोचकम् ।
जीर्णोऽपि पर्पटीं कुर्वन् वपुषा निर्मलः सुधीः ॥
जीवेद्वर्षशतं श्रीमान् वलीपलितवर्जितः ।

प्रातःकरोति सततं नियतं द्विगुंजा
यस्तां स विंदति तुलां कुसुमायुधस्य ।
आयुश्च दीर्घमनधं वपुषः स्थिरत्वं ॥
हानिं वलीपलितयोरतुलं बलंच ॥
जराव्याधिसमाकीर्णं विश्वं दृष्ट्वा पुरा हरः ।
चकारपर्पटीमेतां यथा नारायणः सुधाम् ॥ भै. र. २००

पारा, हिऱ्याचें भस्म, सुवर्णभस्म, चांदीभस्म, मोतीभस्म, ताम्रभस्म, अभ्रकभस्म एक एक तोळा या सर्वांचे बरोबरीनें गंधक घेऊन, पारा व गंधक यांची कज्जली करावी. त्यांत राहिलेलीं द्रव्यें मिळवुन एक प्रहर खल करावा, तूप लावलेल्या कढईंत भरून त्यांस बोरीच्या कोळशाची आंच द्यावी व पातळ झाल्यावर शेणावर केळीचें पान ठेवून त्यावर आंतून दुसरें केळीचें पान वर ठेवून, त्यावर शेण ठेवून दाबावें. थंड झाल्यावर बारीक करावें. ही पर्पटी व्याधीहर अनुपानाबरोबर सेवन केल्यानें फार दिवसांपासून असलेली संग्रहणी, आमशूळ, भयंकर अतिसार, प्रवाहिका, सहा प्रकारचे अर्श, उपद्रवयुक्त राजयक्ष्मा, शोथ, कामला, पांडुरोग, प्लीहावृद्धि, गुल्म, जलोदर, परिणामशूळ, आम्लपित्त, वातरक्त, वमन, भ्रम. अठरा प्रकारचीं कुष्ठें, वीस प्रकारचे प्रमेह, विषमज्वर, चार प्रकारचीं अजीर्णें, मंदाग्नि, अरुचि इत्यादि रोगांना नाहीसे करते. वृद्ध माणसानें ही पर्पटी नित्य सेवन केल्यास त्याचें शरीर निर्मळ, बुद्धि तीक्ष्ण होते व वलीपलीत रोग नष्ट होतात. तो शंभर वर्षे जगतो. जो मनुष्य ही पर्पटी नियमितपणें सकाळीं २ गुंजा प्रमाणानें सेवन करतो तो कामदेवाप्रमाणें सुंदर शरीर, दीर्घ आयुष्य व देहास स्थिरता प्राप्त होते. तसेंच वलीपर्यंत रोगांचा नाश होऊन बळ प्राप्त होते.

## ४१ रसपर्पटी

शुद्धपारदगन्धाभ्यां कृता पर्पटिका नृणाम् ।
निहन्ति ग्रहणीं क्षौद्रयुक्ता पथ्यभुजां भृशम् ॥ यो. र. ४८०

शुद्ध पारा व गंधक यांची ( सुवर्णपर्पटीच्या कृतिप्रमाणें ) पर्पटी करावी. ही मधाशीं घेऊन पथ्य केलें असतां संग्रहणीचा नाश करिते. हिला रसपर्पटी असें म्हणतात.

## ४२ पंचामृत पर्पटी

लोहाभ्रार्करसं समं द्विगुणितं गन्धं पचेत्कोलिका ।
काष्ठाग्नौ मृदुले निधाय सकलं लोहस्य पात्रे भिषक् ।
सर्वं गोमयमण्डले विनिहिते रम्भादले विन्यसेत् ॥

तस्योर्ध्वं कदलीदलं द्रुततरं वैद्येश्वरो विन्यसेत् ।
स्यात्पंचामृतपर्पटी ग्रहणिकायक्ष्मातिसारज्वर ।
स्त्रीरुक्पाण्डुगराम्लपित्तगुदज क्षुन्मान्द्य विध्वंसिनी ।।
ग्रहण्यामनुपानं हि हिंगुसैंधव जीरकम् ।
जीरकं पाण्डुरोगरयोरितरेषु स्वयुक्तित: ।। यो. र. ४८०

लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्रभस्म व पारदभस्म हीं समभाग व गंधक दोन भाग घेऊन, लोखंडाच्या भांड्यांत गंधक घालून बोरींच्या लाकडाचा अग्नि देऊन, गंधक पातळ झाल्यावर त्यांत बाकीचीं औषधें टाकून पक्व झाल्यावर गाईच्या शेणाचे एक आळें करून त्यावर केळीचें पान ठेवून त्याजवर ओतून लागलिच दुसऱ्या केळीच्या पानानें झाकावे व दाबावे. हिला पंचामृतपर्पटी म्हणतात. ही संग्रहणी, क्षय, अतिसार, ज्वर स्त्रीरोग (रक्तगुल्म, प्रदर, बाळंतरोग वगैरे) पांण्डुरोग, विषबाधा, आम्लपित्त, मूळव्याध व अग्निमांद्य याचा नाश करिते. ही संग्रहणीवर हिंग, सैंधव, जिरे याजबरोबर द्यावी. पांडुरोग व विष यांवर जिऱ्याबरोबर द्यावी व इतर रोगावर अनुपान योजून द्यावी.

## ४३ सुवर्णरसपर्पटी

शुद्धसूतं पलमितं तुर्यांशस्वर्णसंयुतम् ।
मर्दयेन्निम्बुनीरेण यावदेकत्वमाप्नुयात् ।।
प्रक्षाल्योष्णाम्बुना पश्चात्पलमात्रे तु गन्धके ।
द्रुते लोहमयेपात्रे बादरानल योगत: ।।
प्रक्षिप्य चालयेल्लोह्यां मन्दं लोहशलाकया ।
तत: पाकं विदित्वा तु रम्भापत्रे शनै: क्षिपेत् ।।
शीतं तच्चूर्णितं गुंजाक्रमवृद्धं निषेवयेत् ।।
माषमात्रं भवेद्यावत्तत्तो मात्रां न वर्धयेत् ।
सक्षौद्रेणोषणेनैव लेहयेद्भिषगुत्तम: ।।
ग्रहणीं हन्ति शोषं च सुवर्णरसपर्पटी ।
सद्योबलकरी शुक्रवर्धिनी वन्हिदीपनी ।
क्षयकासश्वासमेहशूलातिसारपाण्डुनुत् ।। यो. र. ४७८

चार तोळे शुद्ध पारा, एक तोळा सुवर्णाचा कीस या दोघांचा लिंबाच्या रसांत एकजीव होईपर्यंत खलकरावा. व ऊन पाण्यानें धुवून टाकावा. नंतर चार तोळे शुद्ध गंधक एका लोखंडाच्या पात्रांत घालून चुलीवर ठेऊन, खाली बोरीच्या लाकडांचा अग्नि लावावा. गंधक पातळ झाल्यावर त्यांत वरील पारा व सोनें यांचें मिश्रण

टाकून लोखंडाच्या सळईनें हळू हळू ढवळावें. पक्व होऊन सारखे मिश्रण झाल्यावर गाईच्या ताज्या शेणावर केळीचें पान ठेवून त्यावर तें ओतून लागलीच वर दुसरें पान झाकून थंड झाल्यावर काढून खलून चूर्ण करून ठेवावें. आणि एक गुंजेपासून क्रमवृद्धीनें सेवन करावे. ते एक मासापर्यंत वाढवावें. त्यापुढे वाढवूं नये. याला सुवर्णपर्पटी म्हणतात. ही मिऱ्याची पूड व मध याशीं द्यावी. ही संग्रहणी व क्षय यांचा नाश करिते. तात्काळ शक्ति वाढविते. ही शुक्रवर्धक व अग्निदीपक असून क्षय खोकला, श्वास प्रमेह, शूळ, अतिसार, पांण्डुरोग यांचा नाश करितें.

## ४४ वज्रकपाट रस

पारदं गन्धकं चैव अहिफेनं समोचकम् ।
त्रिकटुत्रिफलांचैव समभेकत्र कारयेत् ।।
खल्लयेन्तु शिलाखण्डे क्रमशो वक्ष्यमाणकैः ।।
भंगाभृगद्रवैश्चैतद् भावयेच्च पुनःपुनः ।
रक्तित्रयं ततश्चास्य मधुना सह भक्षयेत् ।
असाध्यां ग्रहणीं हन्ति रसो वज्रकपाटकः ।। यो. र. ४८७

पारा, गंधक, अफू, मोचरस, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आवळकंठी हे सर्व एक एक तोळा घेवून प्रथम पारा व गंधक यांची कज्जली तयार करावी व त्यांत राहिलेलीं द्रव्यें घालून बारीक घोटावें. त्यांस भांगेच्या रसांत सात दिवस घोटावें तसेंच माक्याच्या रसांत सात दिवस घोटून, तीन तीन गुंजेच्या गोळ्या करून सुकवाव्यात. त्यापैकी १-१ गोळी मधाबरोबर सेवन करावी. हा वज्रकपाटरस संग्रहणीचा नाश करतो.

## ४५ ग्रहणीकपाट रस नं. १

श्वेतसर्जस्य शुद्धस्य गन्धकस्य रसस्यच ।
शुभेऽन्हि पृथगादाय चूर्ण माषचतुष्टयम् ।।
एकीकृत्य शिलाखल्वे दद्यात्तेषां तदा रसम् ।
सूर्यावर्तस्य बिल्वस्य श्रृंगाटस्य च पत्रजम् ।
प्रत्येकं पलमेकैकं दापयेद् ग्रहणीगदे ।
दापयित्वा ततो यत्नाद् दधिभक्तं समाचरेत् ।।
असंवृतगुदद्वारं कपाटमिव ढक्कयेत् ।
अतश्च ग्रहणीरोगे कपाटोऽयं रसः स्मृतः ।। भै. र. १८४

पांढऱ्या राळीचें चूर्ण ४ मासे, गंधक ४ मासे, शुद्ध पारा ४ मासे घेवून, शुभवार पाहून गंधक व पारा यांची कज्जली तयार करावी. त्यांत राळ मिळवून सर्वाचें बारीक चूर्ण करावे. व सूर्यावर्ताच्या एक पळ स्वरसांत तीव्र उन्हांत खल करावा. त्याच्या १ ते ४ गुंजेच्या गोळ्या बेलाच्या पानाचा स्वरस व मध यांचेंबरोबर सेवन करावा. भूक लागल्यास दहि व भात खावयास द्यावा. हा रस रोगामुळे बाहेर येत असलेले गुदद्वार बाहेर येणें बंद करतो.म्हणून ग्रहणींत या रसाचा उपयोग करतात, याला ग्रहणी कपाटरस असें म्हणतात.

४६ ग्रहणीकपाट रस नं. २

दरदं गन्धपाषाणं तुगाक्षीर्यहिफेनकम् ।
तथा वराटिकाभस्म सर्वं क्षीरेण मर्दयेत् ॥
रक्तिकायुग्ममानेन छायाशुष्कां वटीं चरेत् ।
ग्रहणीं विविधां हन्ति रक्तातीसारमुल्बणम् ॥ भै. र. १८४

शुद्ध हिंगुळ १ तोळा, गंधक १ तोळा, वंशलोचनचूर्ण १ तोळा, अफू १ तोळा व कवडीभस्म १ तोळा घेऊन प्रथम पारा व गंधक यांची कज्जली तयार करावी. त्यांत अफू ४ तोळे टाकून पाण्यांत घोटावें व राहिलेलीं द्रव्यें पाण्यांत घोटावींत व १ प्रहरपर्यंत घोटावें. पुन्हा बकरीच्या दुधाची भावना द्यावी. २ गुंजेच्या गोळ्या कराव्यात व सावलींत सुकवाव्या. याची १ गोळी थंड पाण्याबरोबर सेवन केल्यानें निरनिराळ्या प्रकारचे ग्रहणीविकार व रक्तातिसार नाहीसे होतात.

४७ अग्निसूनुरस

भागो दग्धकपर्दकस्य च तथा शंखस्य भागद्वयं ।
भागो गन्धकसूतयोर्मिलितयोः पिष्ट्वा मरीचादपि ।
भागस्य त्रितयं नियोज्य सकलं निम्बुरसे चूर्णितं ।
नाम्ना वन्हिसुतो रसोऽयमचिरान्माद्यं जयेद्दारुणम् ॥
घृतेन खण्डात्सह भक्षितेन क्षीणान्तरान्ह स्तिसमान्करोति ।
समागधीचूर्णघृतेन लीढ्वा नरः प्रमुंचेद्ग्रहणी विकारान् ॥
शोषज्वरारोचकशूलगुल्मान्पाडूदरार्शो ग्रहणी विकारान् ।
तक्रानुपानो जयति प्रमेहान्युक्त्या प्रयुक्तोऽग्निसुतो रसेंद्रः ॥
यो. र. ४८२

कवडीभस्म एक भाग, शंखभस्म दोन भाग, पारा व गंधक या दोहोंचा मिळून एक भाग आणि मिरी तीन भाग यांचा लिंबाच्या रसांत खल करावा. ह्याला वन्हिसूत ( अग्निसूत ) असे म्हणतात. हा भयंकर अग्निमांद्याचा त्वरित नाश करतो. हा

तूप व खडीसाखरेबरोबर घेतला असतां क्षीण मनुष्याला हत्तीप्रमाणें बलवान करतो. पिंपळीचें चूर्ण व तुपाशीं घेतला असतां संग्रहणीचा नाश करते. सूज, ज्वर, अरुचि, शूळ, गुल्म, पांडुरोग, उदर, मूळव्याध व संग्रहणी ह्या विकारावर ताकाशीं दिला असतां त्याचा नाश करतो. आणि अनुपान योजून दिला असतां प्रमेहाचा नाश करतो.

## ४८ अगस्तिसूतराज रस

रसबलिसमभागं तुल्य हिंगूलयुक्तं ।
द्विगुणकनकबीजं नागफेनेन तुल्यम् ।
सकलविहितचूर्णं भावयेद्भृंगनीरै ।
ग्रहणिजलधिशोषे सूतराजो ह्यगस्तिः ।।
त्रिकटुकमधुयुक्तः सर्ववान्ति च शूलं
कफपवन विकारं वन्हिमाद्यंच निद्राम् ।
घृतमरिचयुतोऽयं गुंजमात्रा प्रवाहीं ।।
हरति षडतिसारांञ्जीरजातीफलैन् ।। यो. र. ४८२

पारा, गंधक व हिंगूळ समभाग, धोतऱ्याचें बी दोन भाग व अफू एक भाग या सर्वाचें चूर्ण करून माक्याच्या रसाची भावना द्यावी. संग्रहणीरूप समुद्राला शोषण करणारा हा अगस्ति आहे. म्हणून याला अगस्तीसूतराज म्हणतात. हा सुंठ, मिरे व पिंपळी यांचें चूर्णाशीं मध घालून घेतला असतां सर्व प्रकारची वांति, शूळ, कफवातात्मक विकार, अग्निमांद्य व झोप यांचा नाश करतो. हा तूप व मिऱ्याची पूड ह्याशी घेतला असतां प्रवाहिका आणि जायफळ व जिऱ्याची पूड यांचेशीं घेतला असतां सहा प्रकारचें अतिसारं यांचा नाश करतो.

## ४९ क्षारताम्ररस

शंखक्षारार्कभूति च वराटं लोहभस्मकम् ।
अयोमलं यवक्षारं टंकणक्षारमेव च ।।
त्रिकटु सैंधव तुल्यं भृंगतोयेन मर्दयेत् ।
आटरुषरसैर्मद्यंमार्द्रकस्वरसेनच ।।
चणमात्रां वटीं कृत्वा रसोऽयं क्षारताम्रकः ।
श्वासे कासे प्रतिश्याये पुराणज्वरपीडिते ।।
मन्दाग्नौ ग्रहणीदोषे त्वनुपानं यथोचितम् ।
सेवयेत्सप्तरात्रेण नाशयेन्नात्र संशयः ।।
चिरकालानुबन्धे च सेवयेन्मण्डलावधि ।
तत्तत् व्याधिहरं पथ्यं नियमेन समाचरेत् ।।

शंखभस्म, ताम्रभस्म, लोहभस्म व कवडीभस्म, मन्डूर, जवखार, टांकणखाराची लाही, सुंठ, मिरे, पिंपळी, सेंधेलोण हीं सर्व औषधें समभाग घेऊन सर्वांचा माक्याच्या रसांत खल करावा. नंतर अडुळशाच्या पानाच्या रसांत व आल्याच्या रसांत एक एक दिवस खल करून हरबऱ्या एवढचा गोळचा कराव्यात याला क्षार ताम्र रस असें म्हणतात. हा श्वास, खोकला, पडसें, जीर्णज्वर, अग्निमांद्य व संग्रहणी या विकारावर योग्य अनपान योजून द्यावा. हा सात दिवस सेवन केला असतांना त्या त्या विकारांना दूर करतो. यांत संशय नाही. फार दिवसांचा विकार असल्यास एक मंडल ( ४२ दिवस ) दिवसपर्यंत सेवन करावा. ह्याजवर त्या त्या विकारावर सांगितलेलें पथ्य करावें.

## ५० पथ्यापथ्य

मुद्गषष्टिक शाली च आढकी माक्षिकं तथा ।
छाग्या पयो दधि घृतं नवनीतं कपित्थकम् ॥
नि:सार दधि गोर्बिल्वं रम्भायाः कुसुमं फलम् ।
दाडिमं लाजकृन्मण्डः शृंगारं क्षुद्रमत्स्यकः ॥
एणतित्तिरलावानां शशानां क्रव्यमेव च ।
ग्रहण्यामातुरे पथ्यं कथितं मुनिभिर्हितम् ॥

मूग, साठेसाळीं, तुरी हीं धान्यें, शेळीचें दूध, तूप, दही व लोणी, कवठ, गाईचें लोणी काढून घेतलेलें दही, बेलफळ, केळफूल व केळीचें फळ, डाळिंब, लाह्याचा मंड, शिंगाडे, क्षुद्र मासे, काळवीट तित्तिरपक्षी, लावा पक्षी, ससा यांचें मांस हें संग्रहणीच्या रोग्याला हितकर असें पथ्य सांगितलें आहे.

पिच्छिलानि कठोराणि गुरुण्यन्नानि यानि च ।
आमकृन्ति न सेव्यानि ग्रहणी रोगिभिः क्वचित् ॥ यो. र.

अपथ्य—बुळबुळीत, कठीण, जड अशीं अन्नपानें तसेंच आमकारक पदार्थ यांचें केव्हांहि संग्रहणीचे रोग्यानें सेवन करू नये.

## ५१ संग्रणीवर प्रत्यक्ष अनुभविक योग

संग्रहणीचे रोग्याला प्रथम एरंडेल २॥ तोळे द्यावें. त्यानें २–३ जुलाब होतील. नंतर दुसरें दिवशीं सकाळीं—

सकाळीं— २॥ तोळे तूप
१॥ मासा सैंधव

१ ,, मध
१ ,, पादेलोण

एक कप गरम पाण्यांत हीं ४ द्रव्यें घालून प्यावें.

| | | |
|---|---|---|
| दुपारीं व रात्रीं—पंचामृतपर्पटी | २ गुं. | |
| ग्रहणीकपाटरस | २ ,, | |
| कपर्दिकभस्म | २॥ ,, | |
| शंखवटीरस | २ ,, | |

ह्या ४ औषधींच्या २ पुड्या करून दुपारीं २ वाजतां १ पुडी व रात्रीं ९ वा. दुसरी पुडी कुटजारिष्ठांतून किंवा बेलाच्या मुरब्ब्यांतून देणें. याप्रमाणें सकाळचें तूप-सैंधवादि मिश्रण व दुपारचें आणि रात्रीचें ह्या दोन वेळेचीं पर्पटी आदि औषधें चार दिवस सुरू ठेवावी. नंतर तूपसैंधवादि मिश्रण बंद करावें. पांचवे दिवशीं सकाळीं पळसपापडी ८ गुं., कृमिकुठार २ गुं. व गूळ १६ गुंजा यांची गोळी करून खाण्यास द्यावी. व सायंकाळीं सर्व अंग शेकून काढावें किंवा वाफारा घ्यावा. दुसरें दिवशीं सकाळीं—गेळफळाचें चूर्ण ३ मासे

सैंधव १ ,,
पादेलोण १ ,,



हें मिश्रण कपभर गरम पाण्यांत घालून प्यावें. यानें १–२ वांत्या होतील. दुसरें दिवशीं सकाळीं—एरंडेल २॥ तोळे द्यावे. त्यानें १–२ जुलाब होतील.

त्याचें दुसरें दिवसापासून खालील औषधें सुरू करावींत.

| | |
|---|---|
| पंचामृतपर्पटी | ४ गुं. |
| ग्रहणीगजकेसरी | ४ ,, |
| कपर्दिकभस्म | ६ ,, |
| अग्निकुमार | ४ ,, |

या ४ औषधींच्या ४ पुड्या करून सकाळीं ७ वा., दुपारीं १वा., सायंकाळी ५ वाजतां व रात्रीं १० वाजतां. अशा रितीनें ४ वेळ कुटजारिष्टांतून देणें.

याशिवाय मागे सांगितलेलें एकादें चूर्ण गरम पाण्याबरोबर एकादें वेळीं दररोज घ्यावें. रोगी फार अशक्त असल्यास सुवर्णपर्पटी ॥ गूंज मधांतून सकाळीं ८ वाजतां द्यावी.

खाण्याकरितां शक्य झाल्यास ताकावर राहावे. नाही तर ताक, भात, तूप हें खाण्यास द्यावे. पोट एकवेळ दररोज शेकावें.

संग्रहणीवर योग नं. २

( स्नेहन स्वेदन करून पंचकर्म वमनादिक केल्यावर )

(१) सुवर्णपर्पटी १ गुं. = २ पुड्या पैकी १ पुडी बेलाचे मुरब्यांतून व दुसरी पुडीहि त्याचप्रमाणें घेणें. वेळ सकाळी व ४ वाजतां

ग्रहणीगजकेसरी २ गुं.
शंखभस्म २ गुं.
कपर्दिक भस्म ३ गुं.

२ पुड्या करून १ पुडी दुपारी २ वाजता, दुसरी पुडी रात्री ९ वाजता कुटजारिष्टांतून घेणें

(२) कुटजारिष्ट ४ तोळे
पंचामृत पर्पटी ४ गुं.
अभ्रकभस्म ४ गुं.
शंखवटी ४ गुं.
ग्रहणीकपाट ४ गुं.

४ पुड्या करून एक एक तोळा कुटजारिष्टांतून घेणें. सकाळी, दुपारी ४ वाजता, रात्री ९ वाजतां.



(३) सुवर्णमालिनीवसंत १ गुंज दुधांतून एक वेळ द्यावा.

खाण्याकरितां--पहिले आठ दिवस ताकच फक्त द्यावे. ते शक्य झाले नाही तर तूप, मीठ, भात, व ताक हे द्यावे व आले, पदीना, आमसोल, मुगाचे वरण हे पदार्थहि संग्रहणींत फायदेशीरच आहेत. पहिले आठ दहा दिवस नुसत्या ताकावर राहून औषधी घेतगेल्यास लवकर फायदा होईल ताकांत सुंठ, सैंधव, जिरे साखर हिंग हे पदार्थ घालून घेत जावे.

ग्रहणीरोगांत जे कांही इतर त्रासदायक विकार दिसतील त्यावर वेगळे औषध देत जावे.

गरीब रुग्णास दिलेलीं औषधें व पथ्य मुगाच्या दाळीचें पाणी, ताक व लाह्या.

पाण्यासारखे जुलाब असल्यास--

संजीवनी ३ गुंज
लशुनादिवटी ३ गुं.
मंडूर १ गुं.
स्वर्णमाक्षिक १ गुं

१ पुडीचें प्रमाण ४ किंवा ६ वेळा रोगाचे तीव्रतेप्रमाणें. १ ते १॥ महिन्यांत रोगी बरा होतो.

(२) संग्रहणी चिकित्सेचा दुसरा प्रकार—

स्वर्णयुक्तसूत शेखर
शंखभस्म १ गुं.
शौक्तिक भस्म १ गुं.
मृगशृंग भस्म १ गुं.
लोहभस्म १ गुं.
रसपर्पटी १ गुं.
त्रिकटु ३ गुं.

१ पुडीचें प्रमाण ४ वेळा देणें मधासह साधारणतः २ शेर दुधाचें ताक पचूं लागल्यावर भात वगैरेला सुरुवात. (पथ्य–पाणी वर्ज्य)

(३) तिसरा प्रकार

लक्ष्मीविलास किंवा चतुर्मुख रस १/२ गुं.
प्रवाळपंचामृत २ गुं.
सुंठी चूर्ण ३ गुं.
सुवर्णमाक्षिक १

१ पुडीचें प्रमाण, ४ पुडया देणें मधासह किंवा ताकासह.



———

# शूळ चिकित्सा प्रकरण

## अध्याय १३ वा

### १ शूळाचें संक्षिप्त वर्णन

शूळ हा शरीरांत वाढलेल्या वातामुळे होणारा रोग होय. यांत टोचल्याप्रमाणें, खुपल्याप्रमाणें दुःख होतें. हा विकार विशेषतः पोटांत होतो. कांही वेळां तो दोन्ही बरगडींतहि होतो; पण विशेषेकरून पोटांत पुष्कळ वेळा होत राहतो. यांत वातवृद्धीमुळे धमन्यामध्यें विकृति झालेली असते. एकतर सूज आलेली असते किंवा पोट दुखते त्या ठिकाणीं व्रण झालेले असावेत. उपाशापोटीं पोटांत वाताचाच संचार जास्त प्रमाणांत राहतो. तेव्हां शूळ जास्त प्रमाणांत होतो. तर केव्हां केव्हा अन्न खाल्ल्यानंतर ताबडतोबच पोट दुखायला सुरुवात होते तर केव्हां अन्न खाल्ल्यानंतर ३–४ तासांनी पोट दुखायला सुरुवात होते. केव्हां केव्हा तर हा शूळ इतक्या तीव्र प्रमाणांत होतो की मनुष्य अगदी बेचैन होतो. गडबडा लोळतो.

सुरुवातीस हा विकार होतो तेव्हां थोडा वेळ केव्हां तरी पोटांत दुखते व कांही वेळानें ते दुखणें बंद होते. असेंच मधून मधून दुखणें व थोडा उपचार केला तर तें थांबणें असें कांही दिवस चालू राहते. परंतु नंतर जें दुखतें तें मात्र लवकर थांबत नाही. कांही शूळांत थोडें खाल्ले तर पोटांत दुखणें कमी होतें. कांही शूळांत वांति झाल्यावरच पोट दुखणें थांबते. किंवा कित्येक वेळां पोट इतकें जोरानें दुखतें तेव्हां वांति करवून घ्यावी लागते.

यावर मुख्य उपचार आयुर्वेदिक रुग्णालयांत जो करण्यांत येतो तो पुढें सांगितला आहे. पहिल्यानें जुलाब नंतर २॥ तोळे तूप व सैंधव गरम पाण्यांतून पाजणें याप्रमाणें ४ दिवस हें स्नेहन दिल्यानंतर स्वेदन म्हणजे सबंध अंग शेकून काढणें किंवा वाफारा देणें. नंतर एक कृमिनाशक औषध देणें. त्यानंतर वांतीचें औषध व त्यानंतर पुन्हां एक जुलाब याप्रमाणें हीं थोडया थोडया प्रमाणांतलीं पंचकर्मे होत. पंचकर्मांचे विधि बहूतेक सकाळींच केले जातात नंतर दोन वेळ शूळावरील औषधें देण्यांत येतात. पंचकर्मांचे विधि संपल्यानंतर शूळावरील औषध दिवसांतून ४ वेळ देण्यांत येते. त्यांतलीं मुख्य औषधी म्हणजे ताम्रभस्म, वंगभस्म, नागभस्म प्रत्येकी चार चार गुंजा घेऊन त्याच्या चार पुडया एका दिवसांत देण्यांत येतात. एकादे वेळेस शूळामुळे झोप येत नाही. त्यावेळी समीरगजकेसरी एक गुंज पाण्याबरोबर रात्रीं द्यावी

म्हणजे वेदना कमी होऊन झोप लागते. तसेंच दिवसादेखील शूळ जास्त प्रमाणांत होतो. तेव्हांहि एक गुंज समीरगजकेसरी पाण्याबरोबर द्यावी. खाण्याकरितां पहिले सात–आठ दिवस दुधावरच राहण्यास सांगावें, दिवसांतून फक्त एक शेर दूध चांगलें तापवून साखर घालून कोमट कोमट एक वेळीं एक कप पिणें. याप्रमाणें दिवसांतून ४ वेळ चहाप्रमाणें गरम गरम पीत जाणें. दिवसांतून २ वेळ चहा व २–३ वेळेस दूध असें दिल्यास चालेल. मोसंबी व डाळींबेंहि देण्यास हरकत नाही. मात्र पोटांत दूध किंवा इतर मोसंबी वगैरे पदार्थ जास्त जाऊं नये ही खबरदारी घ्यावी. वरील औषधांशिवाय एक वेळ एक चमचा नारायण तेल थोडया गरम दूधांत घालून दिवसांतून एक वेळ पाजावे. पिण्याकरिता पाणी चांगलें तापवून थंड केलेलें द्यावें. तीन आठवडयांत रोगी पूर्ण बरे झालेले आहेत. आठ दहा दिवस दुधावर राहिल्यावर नंतर दुध भात तूप हे एक वेळ द्यावे त्या मानानें दुध कमी वेळ द्यावें. किंवा ताक भात तूपहि द्यावे मात्र त्यांत भाताबरोबर तूप अवश्य असावे. नंतर इतर खाण्याचे पदार्थ थोडे थोडे सुरू करावे. थोडे नारायण तेल वाटींत काढून त्यांत कापूर व सैंधव मिसळून गरम करून पोटावर चोळावे. नंतर पोट कडक शेकून कपडयानें बांधून ठेवावे. हे तेल चोळून शेकण्याचे काम ८ दिवसपर्यंत करावे.



## २ शूळाची व्याख्या

शंखस्फोट नवत्तस्य यस्मात्तीव्राच वेदना ।
शूलासक्तस्य भवति तस्मात् शूलमिहोच्यते ॥ यो. र.

ज्याच्या योगानें शरीरांत खिळा टोचल्याप्रमाणें म्हणजे शरीरांत खिळा (शूळ) टोचला म्हणजे जशा तीव्र वेदना होतात तशाच वेदना शूळ झालेल्या मनुष्यास होतात. म्हणून त्याला शूळ असें म्हणतात.

विनागुल्मेन यत्शूलं गुल्मस्थानेषु जायते ।
निदानं तस्य वक्ष्यामि रूपंच सचिकित्सितम् ॥ सुश्रुत, गुल्म चिकित्सा श्लोक ७६

गुल्मविकार नसतांना गुल्म स्थानांतच जी वेदना होते त्याला शूळ असें म्हणतात, त्यांचें निदान, रूप व चिकित्सा मी सांगतो.

## ३ कोणत्या विकृतीमुळे शूळ होतो?

स्त्रोतोनिरोधोदावर्तो व्रणशोथस्तथाक्षतम् ।
आघातः कार्य वैषम्यं दौर्बल्यं शूलभूमय : ॥ सि. भि.

स्रोतसांचा अवरोध झाला असतां उदावर्त रोगांत तसेंच व्रण, शोथ किंवा क्षत व शरीराला बाहेरून आघात, झाला असतां पंचकर्मांच्या कार्याचा बिघाड झाल्यास दुर्बलता आल्याने शूळ उत्पन्न होतो.

संज्ञावहानां नाडीनां प्रतानोद्वेजनोद्भवः ।
सर्वेऽपि शूलास्तेनाहुः शूलानामनिलः प्रभुः ॥

समस्त शरीरांत संज्ञावह नाड्यांचा क्षोभ उत्पन्न होऊन शूळ उत्पन्न होतो. शूळाचा कोणताहि प्रकार असो त्या सर्वांत वाताची प्रबलता असते.

## ४ शूळाची संप्राप्ति

वायुःप्रकुपितः कोष्ठे शूलं संजनयेद्भृशम् ।
निरुच्छ्वासो भवेत्तेन वेदना पीडितो नरः ॥ सु.

अपथ्यकारक पदार्थ खाण्यानें वायूचा प्रकोप होऊन कोठ्यांत फार मोठा शूळ उत्पन्न होतो. त्यामुळे श्वासाचा अवरोध होऊन मनुष्य वेदनेनें पीडित होतो.

## ५ शूळाचा चिकित्साक्रम

वमनं लंघनं स्वेदः पाचनं फलवर्तयः ।
क्षारा श्चूर्णानि गुटिकाः शस्यंते शूलनाशनाः ॥ सु. गुल्म चिकित्सा

शूळाची चिकित्सा करतांना वमन, लंघन, स्वेद, पाचक औषधें, फलवर्तींचा उपयोग करणें. क्षारयुक्त चूर्ण व गुटिका हे सर्व शूळांचा नाश करण्याला प्रशस्त (लाभदायक) आहे.

लंघनं प्रथमं कुर्याद्वमनं च विरेचनम् ।
बस्तिकर्मपरं चात्र पक्ति शूलोपशांतये ॥
वातजं स्नेहयोगेन पित्तजं रेचनादि
कफजं वमनाद्यैश्च पक्तिशूलमुपाचरेत् ॥
द्वद्वजं स्नेहयोगेन तत्क्रियागणसर्वजम् ॥ यो. र. भा. २ पा. ५९

परिणामशूळाच्या रोग्याला प्रथम उपास करावयास सांगून नंतर क्रमानें वमन, विरेचन, बस्ति हीं कर्मे करावीत. परिणामशूळाचें शमन करण्याकरितां बस्तिकर्म फार उपयोगी आहे. वातजपरिणामशूळ तेलाचें उपचार करून शमवावा. पित्तज परिणामशूळावर रेचक द्यावे. कफजपरिणामशूळावर औषधें तेलें द्यावीं. आणि त्रिदोष जन्य शूळावर तीनहि दोषांचे उपचार करावें.

## ६ शूळांत स्वेद उत्तम

पुंसःशूलाभिपन्नस्य स्वेद एव सुखावहः ।
पायसैः कृशरैः पिंडै स्निग्धैर्वा पिशितोत्करैः ॥ भै. र. व. पा. ४४८

शूळ असलेल्या मनुष्याच्या वेदनास्थळीं स्वेदन करणेंच हितकारक आहे.

७ शूळात पंचकर्म चिकित्सा उत्तम

स्वेदनं वमनं चैव निरूहाः स्नेहबस्तयः ।
क्षिप्रं दोषहरं कार्यं भिषजा साधु जानता ॥ सुश्रुत उ. गुल्म अ. पा. ३२०

स्वेदन, वमन, निरुह व स्नेहनबस्ती ही शूळावर तात्काळ गुण देणारी चिकित्सा आहे.

८ वातशूल चिकित्सा

ज्ञात्वा तु वातजं शूलं स्नेहस्वेदैरुपाचरेत् ।
पायसैः कृशरापिण्डैः स्निग्धैर्वा पिशितोत्कटैः ॥
आशुकारी हि पवनस्तस्मात्तं त्वरया जयेत् ।
तस्य शूलाभिपन्नस्य स्वेद एव सुखावहः ॥　　यो. र. ४६

वातजन्य शूळ आहे. असें समजल्यावर त्याजवर, स्नेहन, स्वेदन अशा प्रकारचे उपचार करावे. दूध, खिचडी, मांसयुक्त स्निग्ध आहार करावा. वायू हा त्वरित रोग उत्पन्न करणारा आहे. म्हणून त्याला त्वरित जिंकावा. यासाठी वातशूलाने पिडीत मनुष्याला स्वेदन हेंच सुखावह आहे.

९ पित्तजशूल चिकित्सा

वामयेत्पित्तशूलार्तं पटोलेक्षुरसादिभिः ।
पश्चाद्विरेचयेत्सम्यक्पित्तगुल्मविरेचनैः ॥　　यो. र. ४६

कडु पडवळ व ऊंसाचा रस इत्यादिकांच्या योगात प्रथम पित्तजशूलानें पिडीत रोग्यास ओकवावें. नंतर पित्तगुल्म रोगावरील रेचकें देऊन कोठा शुद्ध करावा.

१० अन्नद्रवशूल

जीर्णेजीर्यत्यजीर्णे च यच्छूलमुपजायते ।
तदप्यसाध्यं नित्यत्वादुक्तं वैद्यविशारदैः ॥
पथ्यापथ्यप्रयोगेण भोजना भोजनेन वा ।
न शमं याति नियमात्सोऽन्नद्रव उदाहृतः ॥
अयायं प्रायेण त्रिदोषविकृतत्वादसाध्यः　　यो. र. ५८

अन्न जिरल्यावर जिरत असतां किंवा जिरण्यापूर्वी जो शूळ होतो, म्हणजे जो सतत केव्हांहि असतो तोदेखील नित्यत्वामुळे असाध्यच आहे. तसेंच पथ्याने अगर अपथ्यानें जेवल्यानें अगर उपवास केल्यानें जो शूळ नियमानें रहात नाही त्याला अन्न द्रवशूळ असें म्हणतात. हा शूळ प्रायः त्रिदोषांच्या बिघाडामुळे झालेला असतो. म्हणून असाध्य आहे.

११ आमशूल चिकित्सा

आमशूले क्रिया कार्या कफशूलविनाशिनी ।
शेषमामहरं सर्वं यच्चाग्नि विवर्धनम् ॥ यो. र. ४८

आमशूलावर सर्व उपचार कफशूलाप्रमाणें करावेत. आणि बाकी सर्व आहार-विहारादिक आमनाशक व जें जें अग्नीवर्धक उपचार आहेत तेहि करावेंत.

१२ एरंडतैलादि योग

एरंडतैलं षड्भागं लशुनस्य तथाऽष्टकम् ।
एकं हिंगु त्रिसिंधूत्थं सर्वमेकत्र मर्दयेत् ॥
त्रिनिष्कं भक्षयेच्चानु ह्यामशूलप्रशान्तये । यो. र. ४९

एरंडेल सहा भाग, लसूण आठ भाग, हिंग १ भाग, सेंधव ३ भाग या सर्वांचा एकत्र खल करून तें मिश्रण आमशूळ शांत होण्याकरितां नऊ मासे प्रमाणानें भक्षण करावे.

१३ शूळावर त्रिफलादि विरेचन

त्रिफलाक्वाथगोमुत्रक्षौद्रक्षीररसैः पृथक् ।
एरण्डतैलद्विगुणंहितं शूले विरेचनम् ॥ यो. र. ५०

त्रिफळचाचा काढा करून त्यांत गोमूत्र, मध, दूध किंवा मांसरस घालून पुन्हां त्यांत काढचाच्या दुप्पट एरंडेल घालून शूळ रोगांत रेच होण्याकरितां द्यावा. तो हितकारक आहे.

१४ शूळावर हिंग्वादि चूर्ण

हिंग्वम्लत्रिपटूग्रषट्कटुशठी वृक्षाम्लदीप्यालकं ।
पाठाजाज्यजगन्धमूलहपुषाद्विक्षारसाराभयम् ।
हिध्माध्मानविबंधवर्ध्मक सनश्वासाग्निसादारुचि
प्लीहार्शोखिल शूल गुल्म गल हृद्रोगाश्म पांडु प्रणुत् ॥ यो. र. ५२

हिंग, आम्लवेतस, सेंधेलोण, वेखंड, सुंठ, मिरे, पिंपळी, चवक, चित्रक, पिंपळ-मूळ, कचोरा, आमसूलें, ओवा, धने, पहाडमूळ, जिरे, रानतुळशींचें मूळ, शेरणी, आंबट डाळिंब व हिरडे यांचें समभाग चूर्ण करावें. तें उचकी, पोट फुगणें, मळाचा खडा होणें, अंत्रवृद्धि, खोकला, श्वास, अग्निमांद्य, अरूचि, पानथरी, मूळव्याध, सर्व शूळ, गुल्म, गळा व हृदय यांचें ठिकाणचा शूळ व पांडुरोग यांचा नाश करिते.

१५ शुळावर त्रिलवणादि चूर्ण

लवणत्रयसंयुक्तं पंचकोलं सरामठम् ।
सुखोष्णेनाम्भसा पीतं कफशूलहरं परम् ।

सैंधेलोण, पादेलोण, बिडलोण पिंपळी, पिंपळमूळ, चवक चित्रकमूळ, सुंठ व हिंग यांचे चूर्ण कोमट पाण्याशी द्यावें. ते कफशूलाचा नाश करण्याविषयी उत्तम आहे.

१६ शूळावर लेप नं. २

तिलैश्च गुटिकां कृत्वा लेपयेज्जठरोपरि ।
गुटिकाशमयेत्येषा शूलं चैवाति दुस्तरम् ।। भै. र. व. पा. ४५०

काळे तीळ कांजीबरोबर वाटून गरम करून पोटावर लेप करावा. ही तिल गुटिका असाध्य शुळाला देखील नष्ट करते.

मोहरी व शेवगा ताकांत वाटून लेप करावा.

शूळावर लेप नं ३

नाभिलेपाज्जयेच्छूलं मदनं कांजिकान्वितम् ।
बिल्वैरण्डतिलैर्वाऽपि पिष्टैरम्लेन पोटली ।। यो. र. ४४

गेळफळ कांजींत वाटून बेंबीवर लेप करावा तो शूळ जिंकतो. त्याच प्रमाणें बेलाचें मूळ, एरंडमूळ, व तीळ कांजींत वाटून त्याची पुरचुंडी करून त्या पुरचुंडीनें शेकावे.



१७ शूळावर हिंग्वादि लेप

हिंगुतैलं सलवणं गोमुत्रेण विपाचितम् ।
नाभिस्थाने प्रदातव्यं यस्य शूलं स वेदनम् ।। यो. र. ४५

हिंग तेल व मीठ हे जिन्नस गोमूत्रांत शिजवून त्यांचा ज्यांचा शूल वेदनायुक्त आहे त्यांच्या बेंबीवर लेप करावा.

१८ त्रिदोष शूल चिकित्सा

शंखचूर्णं सलवणं सहिंगु व्योषसंयुतम् ।
उष्णोदकेन सत्पीतं हन्ति शूलं त्रिदोषजम् ।। यो. र. ४८

शंखभस्म, सेंधेलोण, हिंग, सुंठ, मिरे, व पिंपळी, यांचे चूर्ण ऊन पाण्याशीं घ्यावें तें त्रिदोषजन्य शूळाचा नाश करितें.

१९ गुडगुडयुक्त शूलावर योग

तैलमेरण्डजं वाऽपि दशमूलस्य वारिणा ।
पीतं निहन्ति साटोपं हिंगुसौवर्चलान्वितम् ।। यो. र. ४५

दशमूळाच्या काढचाशी एरंडतेल, हिंग, सैंधेलोण घालून घ्यावे, तें पोटांत गुडगुड वाजून होणाऱ्या शूळाचा नाश करिते.

## २० शुळावर नागरादि काढा

नागरैरण्डयोः क्वाथः क्वाथ इंद्रयवस्य वा ।
हिंगुसौवर्चलोपेतो वातशूल निवारणः ।। यो. र. ४५

सुंठ व एरंडमूळ यांचा काढा किंवा इंद्रजवाचा काढा हिंग पादेलोण घालून घ्यावा तो वातशूलाचे निवारण करतो.

## २१ शूळावर मातुलुंगादि काढा

मातुलुंगरसो वाऽपि शिग्रुक्वाथस्तथा परः ।
सक्षारो मधुना पीतः पार्श्वहृद्बस्तिशूलहा ।। यो. र. ५१

महाळुंगाचा रस अथवा शेवग्याच्या सालीचा काढा जवखार व मध घालून घ्यावा, तो बरगडया हृदय बस्ती ह्यांतील शूलाचा नाश करतो.

## २२ शूळावर लोहत्रिफला योग

तीक्ष्णायश्चूर्णसंयुक्तं त्रिफलाचूर्णमुत्तमम् ।
प्रयोज्यं मधुसर्पिभ्यां सर्वशूलनिवारणम् ।। यो. र. ५१

तिख्याचें भस्म व त्रिफळाचें चूर्ण तुप व मध याशी खावे ते शूलाचें निवारण करते.

## २३ शूळावर मंडूरावलेह

गोमूत्रसिद्धमंडूरं त्रिफलाचूर्णसंयुतम् ।
विलिहन्मधु सर्पिभ्यां शूलं हन्ति त्रिदोषजम् ।। यो. र. ४८

गोमूत्रामध्यें तयार केलेला मंडूर त्रिफळाचें चूर्ण तूप व मध ह्याशी घ्यावा. ते त्रिदोषजन्य शूळाचा नाश करितो.

## २४ शूळावर क्षीरमंडूर

लोहकिट्टं पलान्यष्टौ गोमूत्रार्धाढके पचेत् ।
परिणामभवं शूलं सद्यो हन्ति न संशयः ।। यो. र. ६०

मंडूर ३२ तोळे घेवून तो एकशे अठ्ठावीस तोळे गोमूत्रांत पचन करावा तो परिणाम शूलाचा त्वरित नाश करतो यांत संशय नाही.

## २५ शूळावर लोहगुग्गुळ

त्रिफला मुस्तकं व्योषं विडंगं पौष्करं वचा ।
चित्रकं मधुकं चैव पलांशं श्लक्ष्णचूर्णितम् ।।
अयोभस्म पलान्यष्टौ गुग्गुलुस्तावदेव तु ।

सर्पिषा मेलयित्वाऽथ कर्षमात्रवटीकृतम् ॥
अद्यादनु पिबेत्कोष्णं वारि शूलाद्विमुच्यते ।
जीर्णान्नसंभवात्पाण्डोः कामलाया हलीमकात् ॥

हिरडा, बेहडा, आवळकंठी, नागरमोथे, सुंठ, मिरे, पिंपळी, वावडिंग, पोखरमूळ, वेखंड, चित्रकमूळ, ज्येष्ठमध, हीं औषधें प्रत्येकी ४, ४ तोळे लोहभस्म ३२ तोळे, गुग्गुळ ३२ तोळे, यांचा तुपांत खल करून एक एक तोळ्याच्या गोळ्या कराव्यात व गोळी घेऊन त्यावर कोमट पाणी प्यावे म्हणजे परिणाम शूल पांडूरोग कावीळ व हलीमक या रोगापासून रोगी मुक्त होतो.

२६ शंखवटी

चिंचाक्षारं पचपलं लवणानि पलं पलम् ।
संचूर्ण्य निक्षिपेत्प्रस्थद्वयंजंम्बीरवारिभिः ॥
शंखं दशपलं तप्त्वा निक्षिपेत्सप्तवारतः ।
तत्समस्तं विशोष्याथ हिंगुव्योषं चतुष्पलम् ॥
बलिसूतविषाद्भागान्पलार्धं च पृथक्पृथक् ।
एतत्समस्तं संमर्द्य जम्बीराम्लै दिनत्रयम् ।
बदरास्थिप्रमाणेन वटिकां कारयेद् बुधः ।
एकैकां भक्षयेत्प्रातः कोष्णतोयं पिबेदनु ॥
सर्वशूलं हरेत्गुल्ममजीर्णं परिणामजम् ।
अतिसारगदं हन्यादग्रहणीं च विशेषतः ॥ यो. र. ५३

चिंचेच्या टरफलाचा क्षार, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, मीठ सांबरलोण, बांगडक्षार हीं औषघे ४-४ तोळे यांचें चूर्ण करून त्यांत १२८ तोळे लिंबाचा रस घालावा. व ४० तोळे शंखाचे तुकडे घेऊन ते त्या रसांत तापवून सात वेळ विझवावेत. नंतर तें सर्व औषध वाळवून त्यांत हिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, यांचें चूर्ण ४, ४ तोळे व गंधक, पारा, बचनाग, हीं औषधें दोन दोन तोळे घालून सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करावा. व बोरातील बीच्या आकाराच्या गोळ्या बांधाव्यात. त्यांतील एक एक गोळी प्रात:काली भक्षण करून त्यावर उन पाणी प्यावे. हिला शंखवटी म्हणतात. ही शूल, गुल्म, अजीर्ण परिणामशूल, अतिसार व विशेषतः संग्रहणी यांचा नाश करिते.

२७ परिणामशूळावर वर्ज्य पदार्थ

माषादि शिम्बिधान्यानि मद्यानि वनिता हिमम् ।
आतपं जागरं क्रोधं शुचं संधानमम्लकम् ॥
वर्जयेत्पक्तशूलार्तस्तथाऽजीर्णं तिलानपि यो. र. ६८

उडीद वगैरे शेंगांतील धान्य, मद्य, स्त्रीसंग, थंड पदार्थ, ऊन, जागरण, राग, शोक, कांजी वगैरे कुजवून आंबट बनलेले पदार्थ, अजीर्ण व तीळ यांचे शूळाचे रोग्याने सेवन करूं नये.

२८ शूलांतक रस

भस्म सूतस्य रवस्यापि पलमेकं पृथक् पृथक् ।
ताम्रभस्म पले द्वे तु गंधकस्य पलत्रयम् ॥
हरितालस्य कर्षांशं विमलं हेममाक्षिकम् ।
पलार्धं हलिनिकंदं नागवंगौ पलार्धकौ ॥
चतुष्पलं तु त्रिवृतमेतत्सर्वं विचूर्णयेत् ।
भूधात्रीस्वरसेनैव भावयेत्सप्तधा भिषक् ।
तथा दंती द्रवैर्वल्लं दद्यादार्द्रक वारिणा ।
तेन कोष्ठे विशुद्धे तु दधिभक्तंच भोजयेत् ।
सर्वाणि शूलानि हरेद्रसः शूलांतको मतः ॥ र. चं.

रससिंदुर चार तोळे, अभ्रकभस्म चार तोळे, ताम्रभस्म आठ तोळे, गंधक बारा तोळे, हरताळ एक तोळा, सुवर्णमाक्षिक भस्म एक तोळा कळवीचा कांदा, शिश्याचें भस्म व वंगभस्म हीं दोनदोन तोळे, नळीचें तेल सोळा तोळे (निशोत्तर) या सर्वांचा एकत्र खल करावा, त्याला भुईआवळीच्या रसाच्या, दतिमुळाच्या काढयाच्या सात सात भावना द्याव्या. ह्याला शूलांतक रस असें म्हणतात हा एक वालप्रमाणाने आल्याच्या रसांतून द्यावा. ह्याच्या योगानें मळ साफ होऊन कोठा साफ होतो मग त्यावर दहीभात खावा, हा सर्व शूळांचा नाश करितो.

२९ शूलगजकेसरी नं १

रसविषगन्धकपर्दक्षारेण सिन्धुपिप्पली विश्वैः ।
अहिवल्ल्यम्बुविघृष्टः शूलेभहरिर्द्विगुंजोऽयम् ॥ यो. र. ५५

पारा, बचनाग, गंधक, कवडीभस्म, जवखार सेंधेलोण, पिंपळी व सुंठ या सर्वांचा नागवेलीच्या पानाच्या रसांत खल करावा याला शूलगजकेसरी असें म्हणतात. हा दोन गुंजा प्रमाणानें द्यावा.

३० शूलगजकेसरी रस नं. २

नृपताम्रं पलैकं तु चिंचाक्षारं पलाष्टकम् ।
हिंगु हरीतकी व्योषं करंजबीज जीरकम् ॥
प्रत्येकं पलमात्रं तु चूर्णं कोष्णोदके पिबेत् ।
कर्षैकं शूलशांत्यर्थं सर्वोपद्रवसंयुतम् ॥ र. चं.

ताम्रभस्म ४ तोळे, चिंचेचा क्षार ३२ तोळे आणि हिंग, हिरडेदळ, सुंठ, मिरे, पिंपळी, करंजबीज, जिरे हीं प्रत्येकी ४-४ तोळे घेऊन सर्वांचें एकत्र चूर्ण करून तें एक तोळा ऊन पाण्याशीं घ्यावे. ते सर्व उपद्रवयुक्त शूळाचा नाश करिते.

### ३१ क्षारताम्र

पलमितमृतशुल्बं तन्मितं गंधचूर्णम् ।
वसुमितपलमानं तिंतिडीक्षारचूर्णम् ॥
त्रयमिदमभिदिष्टं क्षारताम्राख्यमेतत् ।
हरति सकलशूलं पीतमुष्णोदकेन ॥　　र. चं.

ताम्रभस्म ४ तोळे, गंधक ४ तोळे, चिंचेचा क्षार ३२ तोळे या सर्वांचा एकत्र खल करून चूर्ण करून ठेवावें. ह्याला क्षारताम्र असें म्हणतात. हा ऊन पाण्याबरोबर योग्य प्रमाणांत घेतला असतां सर्व शूळांचा नाश होतो.

### ३२ सर्वांगसुंदररस

शुद्ध सूतं तथा ताम्र शिलामाक्षिक तालकम् ।
रजतं स्वर्णवंगंच लोहमभ्रं सनागरम् ॥
चूर्णयेत्पंचलवणं देयं सर्वं तु तुल्यकम् ।
गंधकं मिश्रयेत् सर्वं रसै रेषां विभावयेत् ।
शुंठी जयंती विजया महाराष्ट्रिक धूर्तजैः ॥
सर्वांग सुंदरो नाम्ना रसोऽयं विष्णुनिर्मितः ॥
खादेदेरंड शुंठीभ्यां माषमात्रं दिने दिने ।
कफवातामयं हन्ति चानुपानं वदाम्यहम् ॥
व्योषं सौवर्चलं हिंगु करंजबीजसंयुतम् ।
पिबेदुष्णांबुना चानु सर्व शूल निकृंतनम् ॥　　र. चं.

शुद्ध पारा, ताम्रभस्म, मनशीळ, सुवर्ण माक्षिकभस्म, शुद्ध हरताळ, रौप्यभस्म, सुवर्णभस्म, वंगभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म व सुंठ हीं औषधें समभाग आणि सर्वांच्या बरोबरोनें पंचलवणें ( सैंधव, पादेलोण, बिडलोण, बागडखार व मींठ ) घ्यावें. आणि एक भाग शुद्ध गंधक त्यांत मिळवून. सुंठीचा काढा, आल्याचा रस, टाकळीचा रस, भांगेचा काढा, मराठीचा रस, धोत्र्याचा रस, ह्यामध्ये १-१ दिवस त्याचा खल करावा. याला सर्वांगसुंदर रस असें म्हणतात. हा विष्णूनें निर्माण केला आहे. हा रोज एक मासाभर एरंडेल तेल व सुंठ यामधून घ्यावा. हा कफवातजन्य रोगांचा नाश करितो. ह्याला अनुपान सुंठ, मिरे, पिंपळी, पादेलोण, हिंग व करंजाचें बी ह्याचें चूर्ण ऊन पाण्याशीं प्यावें. म्हणजे सर्व शूळांचा नाश होतो.

३३ समीरगजकेसरी

नवाहिफेनं कुचिलं नवानि मरिचानिच ।
समभागानि सर्वाणि रक्तिका प्रमितानिच ।।
देयात्समीरे चैतानि पुनस्तांबुल चर्वणम् ।
कुब्जेच खंजवाते च सर्वजे गृध्रसी ग्रहे ।
अवबाहौ प्रयोक्तव्यः शोफे कंपे प्रतानके ।
विषूच्यामरुचौदेयमपस्मारे विशेषतः ।। र. चं.

नवी अफू, कुचला, नवी मिरी समभाग घेऊन, एकत्र खलांत घालून घोटावी. पहिल्यानें आल्याचा रस काढून त्यांत अफू घासून एकजीव करावी. नंतर त्यांत शुद्ध कुचलाचूर्ण व मिऱ्याचें चूर्ण टाकून घोटावें. एक एक गुंजेच्या गोळ्या कराव्या. प्रत्येक वेळीं एक गुंजेची ती गोळी पाण्याबरोबर गिळून घ्यावी व वरून विडा खावा. कुबडेपणा, लंगडेपणा, त्रिदोषजन्य गृध्रसीवात, अवबाहूकवात, सूज, कंपवात, दंडापतानक वात, विषूचिका, अरुचि व विशेषतः अपस्मार ह्यावर समीरगजकेसरी द्यावा. हा रस तीव्र शूळाचा तात्काळ नाश करितो. शुळामुळें झोप येत नसल्यास ह्यानें शूळ थांबतो व झोपहि लागते.



३४ ताम्रपर्पटी रस

मृतं ताम्रं त्रिभागं च रसं गंधं च तत्समम् ।
भागमेकं वत्सनाभं कज्जलीखल्वमध्यगम् ।।
गोघृतेन कृतं कल्कं लोहपात्रे विपाचयेत् ।
ढालयेदर्कपत्रस्थां पर्पटीं रससिद्धये ।।
गुंजाद्वयं त्रयं चैव पिप्पलीमधुसंयुतम् ।
त्रिसप्तरात्र योगेन रोगराजं च नाशयेत् ।।
आर्द्रकस्य रसेनैव संनिपातं नियच्छति ।
त्रिफला रससंयुक्ता सर्वपाण्डू विनाशयेत् ।।
वातारितैलसंयुक्ता सर्वशूलनिवारिणी ।
कुमारीरसयोगेन वातपित्तोपशान्तिकृत् ।।
बाकुचीरससंयुक्ता सर्वदद्रुविनाशिनी ।
त्रिफलामधुसंयुक्ता सर्वमेहनिवारिणी ।।
खदिरक्वाथपानेन कुष्ठाष्टादशनाशिनी ।
मन्थानभैरवेणोक्ता लोकांना हितकाम्यया ।। बो. र. ६६१

ताम्रभस्म तीन भाग, पारा, गंधक तितकाच म्हणजे तीन भाग, बचनाग एक भाग यांची कज्जली करून गाईच्या तुपांत कल्क करून लोखंडी कढईंत मंदाग्निवर

पचन करून रुईच्या पानावर ओतून पर्पटी करावी. ही दोन किंवा तीन गुंजा मध व पिंपळीशीं घ्यावी. म्हणजे क्षयाचा नाश करते. आल्याच्या रसाशीं दिली असतां सन्निपाताचा नाश करिते. त्रिफळ्याच्या काढ्याशीं दिली असतां पांडुरोगाचा नाश करिते. एरंडेल तेलांतून सर्व शूळांचा नाश करिते. कोरफडीच्या रसाशीं दिली असतां वात, पित्त शमन करिते. बावचीच्या रसाशीं दिली असतां सर्व दद्रुरोगांचा ( गजकर्ण वगैरे ) नाश करिते. त्रिफळा व मध यांचेशीं सर्व प्रमेहांचा नाश करिते. खैराच्या काढ्याशीं दिला असता अठराहि कुष्ठांचा नाश करिते. हा ताम्र पर्पटीरस मंथान भैरवाने सांगितला आहे.

## ३५ वांतिहृदरस

अयः शंखो बलिः सूतः खल्वे तुल्यं विमर्दयेत् ।
कन्या कनक चांगेरी रसैर्गोलं विधायच ॥
सप्तमृत्कर्पटैर्लिप्त्वा पुटितो वांतिहृद्रसः ।
द्विवल्लः कृमि रोगेऽपि साजमोदः सवेल्लकः ॥
वांति हारेण मुनिना प्रोक्तोऽयं मधुना युतः ।
पिप्पलक्षारपानीयं पाययेद्वान्ति हृद् भिषक् ॥ र. चं.

लोहभस्म, शंखभस्म, गंधक, पारा, हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा खल करावा. आणि त्यास कोरफड, धोतरा व चुका यांच्या रसाच्या तीन भावना देऊन त्याचा गोळा करावा. त्या गोळ्यावर सात मातकापडे करून त्यांत एक लहानसे पुट द्यावे म्हणजे हा वांतिहृदरस तयार होतो. हा दोन वाल प्रमाणें वावडींग व ओवा यांच्या चूर्णाशीं दिला असतां कृमि रोगांतील वांतीचा नाश होतो. हा वांतीहार नांवाच्या मुनीने सांगितला आहे. हा मधाशीं द्यावा. ह्यावर पिंपळाच्या सालीचें निखारे विझवून तयार केलेलें पाणी प्यावयास द्यावे.

## ३६ मंडूरभस्मयोग (परिणामशूळावर)

लोहकिट्टं पलान्यष्टौ गोमूत्रस्याढके पचेत् ।
परिणामभवं शूलं सद्यो हंति न संशयः ॥

३२ तोळे मंडुरभस्म, २५६ तोळे गोमूत्रांत पचन करून तें घेतलें असतां परिणामशूळाचा तात्काळ नाश होतो.

## ३७ शंबुकभस्मयोग (परिणामशूळावर)

शंबूकजं भस्म पीतं जलेनोष्णेन तत्क्षणात् ।
पक्तिजं विनिहंत्याशु शूलं विष्णुरिवासुरान् ॥ र. चं.

शंखभस्म हें ६ ते ९ गुंजापर्यंत ऊन पाण्याशीं घेतलें असतां विष्णू जसा असुरांचा नाश करितो. त्याप्रमाणें तें परिणामशूळाचा क्षणांत नाश करिते.

३८ विषाणभस्म योग

रससिंदुर २ गुं. सांबरशिंग भस्म २ गुंजा दोन्ही एकत्र घोटून तूपमधांतून द्यावे.

३९ शुळावर योग !

लोहचूर्णं वरायुक्तं विलीढं मधु सर्पिषा ।
परिणाम शूलं हंति तन्मलं वा प्रयोजितम् ॥ भै. र. व. पा. ४५४

लोहभस्म १ गुंज व त्रिफळाचूर्ण १ मासा दोन्ही एकत्र करून, त्यांत तूप व मध यांतून घेतलें असतां किंवा मंडुरभस्म १ गुंजा व त्रिफळाचूर्ण १ मासा तूप व मध यांतून घेतलें असतां सर्व शूळांचा नाश होतो.

(२) गोमूत्रांत शिजविलेले मंडुरभस्म तूप व मध यांतून द्यावे.

(३) वमन, विरेचन दिल्यानंतर बस्ती द्यावा.

(४) शंखभस्म गरम पाण्याबरोबर द्यावें.

(५) रससिंदुर २ गुंजा, सांबरशिंग २ गुंजा दोन्ही एकत्र करून तूप व मधांतून घ्यावें.

(६) गोड आंबा हा परिणामशूळावर फार उत्तम आहे.

(७) हरबरे, दही, वातुळ पदार्थ, उसळी, तेलांत तळलेले पदार्थ खाऊ नये.

शंखशूळ

(८) रससिंदूर १ गुंज. अभ्रक १ गुंज. सुवर्णभस्म १ गुंज, वैक्रांत ३ गुंज, शंखभस्म १२ गुंज हे सर्व एकत्र घोटावें, त्याच्या तीन पुड्या कराव्या. ही १ पुडी मधांतून २ वेळ द्यावी.

वेदनाशूळावर

(९) ताम्रभस्म, वंगभस्म, वज्रक्षार, अभ्रकभस्म, आरोग्य वर्धिनी.

(१०) अभ्रकभस्म २ गुंजा. वज्रक्षार ६ गुंजा, ताम्रभस्म ३ गुंजा यांच्या २ पुड्या व शंखवटी ४ गुंजेच्या दोन पुड्या या १ दिवसाच्या आलटून पालटून घ्याव्या

(११) कापूर, ओव्याचें फूल, पुदिनाफूल, सर्व समप्रमाणांत घेऊन खलामध्यें घोटावें. तें पातळ झाल्यावर त्याचा लेप करावा. शिवाय या मिश्रणाचे ५।६ थेंब साखरेबरोबर सेवन केल्यानें वेदना तात्काळ कमी होतात.

(१२) शंखभस्म २ वाल, स्वर्जिका २ वाल (खाण्याचा सोडा). कापूरकाच २ वाल याच्या तीन पुड्या पाण्याबरोबर घ्याव्या.

(१३) समीरगजकेसरी १ गुंज पाण्याबरोबर घेतल्यानें तात्काळ आराम वाटतो.

(१४) सुधामंड (चुन्याची निवळी) २ तोळे थोड्या दुधांतून घ्यावीं.

(१५) ताम्रभस्म अर्धा गुंज, शंखवटी १ गुंज, संजीवनी १ गुंज, वज्रक्षार २ गुंजा यांची १ पुडी मधांतून घ्यावी व एरंडेल तेल २॥ तोळे घ्यावें. व दुरुस्त झाल्यावर आरोग्यवर्धिनी सुरू करावी.

४० शूळावर पथ्यापथ्य नं. १

पटोलं कारवेल्लं च वास्तुकं शिग्रुजं तथा ।
सामुद्रं लशनं वाऽथ शालिः संवत्सरोषितः ॥
एरण्डतैलं सुरभीजलंच तप्ताम्बु जम्बीररसोऽपि कुष्ठम् ।
लघुनिच क्षाररजांसि चेति वर्गो हितः शूलगदार्दितेभ्यः ॥ यो. र. ५६

पडवळ, कारले, चंदनबटवा, शेवगा, मीठ, लसूण, एक वर्षाच्या जुन्या साळीं, एरंडेल, स्वच्छ पाणी, तापविलेलें पाणी, लिंबाचा रस, कोष्ठ, हलके पदार्थ व क्षारांची चूर्णे हा शूळ रोगानें पिडीत मनुष्याला हितकारक वर्ग आहे.

विरुद्धान्यन्नपानानि जागरं विषमाशनम् ।
रुक्षतिक्तकषायाणि शीतलानि गुरुणि च ॥
व्यायामं मैथुनं मद्यं वैदलं कटुकानि च ।
वेगरोधं शुचं क्रोधं वर्जयेच्छूलवान्नरः ॥ यो. र. ५६

विरुद्ध अशीं अन्नें व पिण्याचीं द्रव्यें, जागरण, वेळीं अवेळीं जेवण, रुक्ष, कडू, तुरट, थंड व जड पदार्थ, व्यायाम, मैथुन, मद्य पिणें, द्विदल धान्यें, तिखट पदार्थ, मलमूत्रादिकांचा वेग आवरून धरणें, शोक व राग ह्यांचा शूलरोगानें पीडित अशा मनुष्यानें त्याग करावा.

शळावर पथ्यापथ्य नं. २

माषादि शिबिधान्यानि मद्यानि वनिता हिमम् ।
आतपं जागरं क्रोधं शुचं संधानमम्लकम् ॥
वर्जयेत्पक्तिशूलार्तस्तथाऽजीर्णं तिलानपि । यो. र. भा. २ पा. ६८

उडीद, वगैरे शिंबीतील धान्यें मद्य, स्त्री संग, थंड पदार्थ, ऊन, जागरण, राग, शोक, कांजी वगैरे व जरून आंबट बनलेलें पदार्थ अजीर्ण व तीळ ह्यांचे परिणामशूळाच्या रोग्यानें सेवन करूं नये.

## ४१ क्षाराम्बुयोग

क्षारोदकं पिबेदुष्णं पिप्पलीलवणान्वितम् ।
वातश्लेष्मोद्भवं शूलं कुक्षिशूलं च नाशयेत् ॥

पिंपळीचें चूर्ण व सेंधेलोणाचें चूर्ण टाकून ऊन केलेलें पाणी प्यावें. तें वातकफजन्य व कुशींत होणारा शूळ यांचा नाश करितें.

## ४२ प्रत्यक्ष अनुभवजन्य चिकित्सा

पहिल्यानें रोग्यांना इच्छाभेदी दोन गुंज दूधसाखरेंत मिळवून द्यावा. किंवा, २॥ तोळे एरंडेल पाजावें. ३–४ जुलाब होतील. नंतर तूप २॥ तोळे, सैंधव १ मासा मध १ मासा हे सर्व कपभर गरम पाण्यांत मिळवून प्यावें. हें सकाळीं घ्यावें. नंतर दुपारीं ३ वाजतां व रात्रीं ८ वाजतां खालील औषध घ्यावें.

ताम्रभस्म ४ गुंज, वंगभस्म ४ गुंज, नागभस्म ४ गुं. अभ्रकभस्म २ गुं हीं सर्व एकत्र करून तूप साखरेंतून घ्यावी. शूळांत वाताधिक्य असल्यास वज्रक्षार किंवा शंख-वटी २ गुंजा त्यांत घालावी. पित्ताधिक्य दिसल्यास कामदुघा ४ गूंज म्हणजे प्रत्येक पुडींत १–१ गूंज त्यांतच मिळवून द्यावी किंवा कफाधिक्य असल्यास आरोग्यवर्धिनी प्रत्येक मात्रेंत १ गूंज मिळवून द्यावी. याप्रमाणें ५ दिवस हें औषध सकाळीं व दुपारीं ३ वाजतां व रात्रीं ८ वाजतां देत जावें व रात्रीं १० वाजतां नारायणतेल एक चमचा थोडचा गरम दुधांतून पाजावें. जर शूळाची असह्य वेदना असेल तर दिवसांतून १ वेळ रात्रीं निजतांना समीरगजकेसरी १ गूंज पाण्याबरोबर द्यावी. जास्त वेदना झाल्यास हें औषध देत जावें. याप्रमाणें ५ दिवस औषध घेतल्यानंतर दुसरें दिवशीं सकाळीं पळसपापडी ८ गूंजा, कृमिकुठार २ गूंजा व गूळ १६ गूंजा गोळी करून घ्यावें. नंतर दुपारीं पाच वाजतां रोग्याचें सर्व अंग शेकून काढावें किंवा वाफारा द्यावा. त्याचे दुसरें दिवशीं गेळफळ ४ मासे, सैंधव १ मासा मध, एक मासा हे सर्व मिश्रण एक कपभर गरम पाण्यांत मिसळून प्यावे. त्यानें १–२ वांत्या होतील. त्याचे दुसरें पिवशीं पुन्हां इच्छाभेदी २ गुंजा किंवा एरंडेल २॥ तोळे पाजावें. त्यामुळे ३–४ जुलाब होतील. नंतर दुसरें दिवशी बस्ती द्यावा. नंतर वरील औषध ४ वेळा सुरू ठेवावें. ४ गूंजा अभ्रक-भस्म, ताम्रभस्म ४ गूंजा, नागभस्म ४ गूंजा याशिवाय वात, पित्त व कफ यापैकी जो दोष जास्त प्रमाणांत दिसेल त्याप्रमाणें अनुक्रमें वज्रक्षार किंवा शंखवटी, कामदुघा किंवा प्रवाळपंचामृत, कफाचीं लक्षणें असल्यास आरोग्यवर्धिनी यांपैकीं जरूर तें औषध

मिळवून तूपसाखरेंतून घ्यावे. याप्रमाणें सकाळीं १२ वाजतां, ४ वाजतां व रात्रीं ९ वा. याप्रमाणें १४ दिवस.

## प्रत्यक्ष केलेले उपचार २

किंवा २१ दिवस औषध सुरू ठेवावे. मधून मधून एक दोन वेळ जुलाब द्यावा. नारायणतेल पोटावर चोळुन बँगनें किंवा बाटलींत गरम पाणी भरून शेकीत जावें. तीव्र वेदना असल्यास १ गुंज समीरगजकेसरी पाण्याबरोबर द्यावी. ताबडतोब आराम वाटेल. रात्रीं झोपेकरितां १ गुंज समीरगजकेसरी द्यावी. वारंवार देऊं नये. खाण्याकरितां पहिले ८ दिवस फक्त दुधच द्यावे. पाणी उकळी येईपर्यंत तापवून फक्त थंड केलेलेंच देत जावे. आठवड्यांतून एकादे वेळेस वाफारा व एक वेळ बस्ती देत जावा. शिवाय शूळाचें जागीं काळा बोळ, तीळ, सागरगोटी हे उगाळून त्याचा लेप करावा. १० दिवसानंनर जुनें तादूळ शिजवून तूप-भात किंवा दूधभात द्यावा. आले, पदिना, आमसोल, डाळिंब याची चटणी करून द्यावी. या योजनेनें सर्व प्रकारचे शूळ नाहीसे होतात.

शूळांत वांति होत असेल, तर वांतिहृद्रस प्रत्येक पुडींत १ गुंज याप्रमाणें ४ पुडींत ४ गुंज दररोज टाकीत जावे. आठवड्यांतून एकदा तरी बस्ती, सारक व वातनाशक औषधी देत जाव्यात.

बस्तीच्या औषधीचीं द्रव्यें— त्रिफळा, माका, एरंडमूळ, निर्गुंडी, दशमुळें यापैकी मिळतील तीं द्रव्यें घेऊन, त्यांत ८ पट पाणी घालून चवथाई उरवावे. व गाळून घ्यावे. त्या कोमट काढ्याचा बस्ती द्यावा. मागें लिहिलेल्या द्रव्याचा लेप करावा. किंवा जवसाचें पोटीस बांधावे. दहा दिवस दूध व चहावर ठेऊन मोसंबी, डाळींब यावरच ठेवावें. एकादे दिवशीं लाह्या दूधांत मुरू घालून साखर घालून द्यावे.

## शूळ असलेल्या रोग्याने पाळावयाचे नियम

१. पाणी तापवून थंड केलेलें आणि तेंहि थोडेच प्यावें.

२. मलावरोध आणि आमांश हा दररोज दूर करीत जावा. त्याकरितां हिरड्याचें चूर्ण गरम पाण्याबरोबर देणें.

रेचक औषध मधून मधून देणें व बस्ती हीं आठवड्यांतून दोन वेळ द्यावेत.

४. उपास अधून मधून करावा.

५. पोट शेकावें.

६. नारायणतेलांत सैंधव व कापूर घालून गरम करून पोटावर चोळणें.

७. पाचक औषध एखादेतरी सूरू ठेवावे.

८. नारायण तेल एक चमचा गरम दूधांतून पोटांत घेणें. चिवडा, भजी, थंड पेयें, आईस्क्रीम हे पदार्थ खाणें बंद करावें.

९. एकदा जेवावे, रात्रीं दुधावरच राहावें.

१०. फवर्ती गुदद्वारांत घालून वाताचें अनुलोमन करावें. त्या शौचाला घेऊन पोट साफ होईल.

११. दिवसांतून १-२ वेळा पाचक औषध घेणें.

— —

# गुल्मचिकित्सा प्रकरण

## अध्याय १४ वा.

### १ गुल्म रोगाचे संक्षिप्त वर्णन

कफाशय, पक्वाशय, पित्ताशय उदराच्या दोन्ही बाजूला बस्तिचें ठिकाणीं व स्त्रियांना त्यांच्या गर्भाशयांत चल किंवा स्थिर असा हातास लागणारी व गोळ्यासारख्या आकाराची एक गांठ निर्माण होते. जमीनींत चारहि बाजूस पसरलेल्या झाडांच्या मुळचाप्रमाणें शिरा, धमन्या, रक्तवाहिन्या दोषवाहिन्या यांचा समुच्चय होऊन जी गांठ बनते तिला गुल्म असें म्हणतात. त्यावर मांस, मेद, धमन्या, रक्तवाहिन्या ह्या वारंवार गुंडाळल्या जाऊन दिवसानुदिवस त्याचीं वाढ होत जाते.

गुल्म रोग हा वाताच्या प्रकोपामुळें होतो त्या प्रकुपित वायुमुळे त्या स्थानांतील रक्तवाहिन्या, मेद, मांस यांना फुगीरपणा येतो. त्यामुळें दोष व धातुवाहिन्यांना लागणारा सरळ मार्ग नाहीसा होतो त्यामुळें वाताच्या स्वैर संचाराला अडथळा उत्पन्न होतो म्हणून तो वायू तेथें अटकून पडतो नंतर त्यावर मांस, मेद, रक्त वाहिन्याचें जाळे पसरून तोच वाढत जातो. त्यावर हात ठेवून लक्षपूर्वक पाहिल्यास रक्तवाहिन्याचे धक्कें बोटास लागतात, वाताधिक्य गुल्मांत वेदना जास्त असते. रिकाम्या पोटी तो जास्त दुखतो. पित्तगुल्मांत दाह जास्त होतो. गुल्माची जागा कढत लागते, गुल्माचे जागी स्पर्श सहन होत नाहीं. कफगुल्माची गांठ आकारानें मोठी, कठीण व कमी दुखणारी असते.

### गुल्मावर सर्वसाधारण उपचार—

गुल्म रोगांत प्रामुख्यानें वाताची दुष्टी असल्यामुळें वातनाशक स्नेहन, स्निग्ध स्वेदन, लंघन व पाचक औषधें द्यावीत. यांत वारंवार स्नेहन व बस्ती हितकर आहे. बस्ती, स्निग्ध रेचक, वाताचे अनुलोमन करणारी औषधें, अग्निदीपक औषधें द्यावीत. तसेच गुल्मावर लेप लावणें, पोटीस बांधणें, जळवा लाउन रक्त काढणें, डाग देणे हे बाह्य उपचार करीत रहावे, व मूत्रल औषधें द्यावीत.

### गुल्मात आहार—

हरबरें, वाटाणे, बाजरी इ० वातकारक पदार्थ व दही, वर्ज करावें. दुध, फळे, पदिना, लसुन, आलें, आंबा, पपई, मोसंबी, संत्री, सफरचंद, द्राक्षें व डाळिंब ही फळें खावीत.

**गुल्मावर आहार—**

ताकपिणें चांगले, तूप उत्तम, पाणी गरम करून थंड केलेले पण बरेचसे कमीच प्यावें. वातनाशक औषधीचा वारंवार बस्ती द्यावा. गरम दुधांत ॥ ते १ तोळा तूप घालून प्यावे. पहिले ८–१० दिवस दुध, साबुदाणा फळे यावरच राहिल्यास लवकर आराम होतो. पुढें सांगण्यांत आलेली औषधें देतांना एकच औषध न देता तीन औषधें ( एक दोन रस व गुटिका, एकादे चूर्ण) योग्य प्रमाणांत मिळवून योग्य अनुपानांतून दिवसांतून तीन तीन वेळा द्यावीत. आठवड्यांतून २ वेळ जुलाब स्निग्ध अनुपातून द्यावा. तसेच दोन वेळ मूत्ररेचक औषधे देत जावी व लेप व पोटीस हे उपचार दररोज करीत जावे. शेवटी जे योग दिले आहेत त्यापैकीं कोणतेहि तीन औषधें योग्य प्रमाणांत एकत्र करून योग्य अनुपानांतून देणे शिवाय एखादे पुष्कळसे क्षार असलेले चूर्ण योग्य प्रमाणांत एक वेळ गरम पाण्यांतून द्यावे.

**२ गुल्माचे सामान्य लक्षण—**

अरुचिःकृच्छ्र विण्मुत्रं वातांत्रात् प्रतिकूजनम् ।
अनाहंचोर्ध्ववातत्वं सर्वगुल्मेषु लक्षयेत् ॥
थो. र. भा. २ पा. ८२

अरुचि, मळ व मूत्र, कष्टानें होणें, वातामुळे आतड्यांत वाजणे- पोट स्तब्ध होणे व ऊर्ध्ववात ( दम लागणें ) ही लक्षणें सर्व गुल्मामध्यें असतात.

**३ गुल्माची लक्षणें—**

बस्ती च नाभ्यां हृदि पार्श्व योर्वा ।
स्थानानि गुल्मस्य भवन्ति पंच ।
पंचात्मकस्य प्रभुवन्ति तस्य ।
वक्ष्यामि लिगानि चिकित्सितंच ॥ १ ॥ च. चि. २४२

बस्ति नाभी प्रदेश, हृदय व दोन्ही पार्श्व ही गुल्माची पांच स्थाने होत. पांच प्रकारच्या ( वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक व रक्तज ) गुल्माचे निदान, लक्षण व चिकित्सा सांगतो.

**४ रक्तगुल्म**

यः स्पन्दते पिंडित एव नांगे । ( [illegible]ङ्गे
श्चिरात् सशूलः समगर्भ लिंगः
सरौधिरः स्त्रीभव एव गुल्मो ।
मासे व्यतीते दशमे चिकित्स्यः ॥ २ ॥ च. चि. [illegible]४६

जो कोणत्याहि अंगविशेषास सोडून ( संपूर्ण भागांत ) पिंडरूप, वेळाने स्पंदन करणारा, शूलयुक्त, गर्भलक्षणासमान लक्षणांचा असतो. तो स्त्रियांनाच होतो त्यास रक्तगुल्म असें म्हणतात. दहा महिन्यानंतर त्याची चिकित्सा करावी.

५. गुल्माची संप्राप्ति–

कफं च पित्तं च स दुष्टवायु–
संहृद्धय मार्गान् विनिबद्धय ताभ्याम् ।
हृन्नाभि पार्श्वोदर बस्तिशूलं
करोत्यधो याति न बद्ध मार्ग : ॥ च. स्पेशल अंक पा. २४१

आमाशांतील व पक्वाशयातील वायु प्रकुपित होऊन तो कफ व पित्त यांना दुषित करितो. ते दुषित झालेले कफपित्त हे वायूचा खालचा व वरचा असे दोन्ही मार्ग बंद करून टाकतात. त्यामुळे वायुची गती बंद होऊन तो पक्वाशयांत किंवा आमाशयात अटकल्या जातो. त्यामुळे त्याचा मार्ग रुखल्याजाऊन हृदय नाभी, उदराच्या दोन्ही बाजूस व बस्तीचें ठाई शूळयुक्त गुल्म उत्पन्न करतो. व मार्ग बंद झाल्यामुळे खाली जाऊ शकत नाही.



६. गुल्माचे स्वरूप–

पक्वाशये पित्तकफाशये वा
स्थित: स्वतंत्र: परसंश्रयो वा ।
स्पर्शोपलभ्य: परिपिंडितत्वा
द्गुल्मो यथादोषमुपैति नाम ॥ च. स्पे. अं. पा. २४२

पक्वाशयात, पित्ताशयात अथवा कफाशयांत असलेला स्वतंत्र (चल हाताने हालविला असता सरकतो.) अथवा परतंत्र (स्थिर हाताने हालविला असता इकडे तिकडे सरकत नाही.) स्पर्श केला असता हातास लागतो. व गोळ्यासारखा आकार असल्याने त्याला गुल्म असे म्हणतात. दोषानुसार जशी लक्षणें असतील त्याप्रमाणें वातिक, पैत्तिक, श्लेष्मिक अशी नावें देण्यांत येतात.

हृन्नाभ्योरन्तरे ग्रंथि: संचारीयदि वाचऽलः
वृत्तश्चयापचयवान् स गुल्म इतिकीर्तितः खु. उ. ४२

हृदय व नाभी यांचे मध्ये चल किंवा स्थिर असा एक वाटोळा गोळा उत्पन्न होतो तो गुल्मच्या नांवाने प्रसिद्ध आहे.

७. गुल्मचिकित्साक्रम–

स्त्रोतसां मार्दवं कृत्वा जित्वा मारुतमुल्बणम् ।
भित्वा विबंधं स्निग्धस्यस्वेदो गुल्ममपोहति ॥१॥ भै.र.व ४७३

स्त्रोतसांना मृदु करुन प्रकुपित झालेल्या वाताला जिंकून, विबंधाला दूर करुन व स्निग्धस्वेदन करुन गुल्माचा नाश करावा.

स्नेहपाने हितं गुल्मे विशेषेणोर्ध्वनाभिजे ।
पक्वाशयगते बस्तिरुभयं जठराश्रये ॥ च. चि. २४७

नाभीचे वरचे भागीं गुल्म असल्यास विशेषतः स्नेहपान हितकर असते. पक्वाशय क्षेत्रांत गुल्म झाल्यास बस्ति देणें विशेष हितकारक असतो. उदर (आमशय व नाभीचे क्षेत्रांत) भागी गुल्म असल्यास स्नेहपान आणि बस्ती दोन्ही हितकर असतात.

पुनः पुनः स्नेहपानं निरुहाः सानुवासनाः ।
प्रयोज्या वातगुल्मेषु कफपित्तानुरक्षिणा ॥१॥ च. चि. २४८

कफ व पित्ताचें रक्षण करुन वातिक गुल्मामध्यें वारंवार स्नेहपान तसेंच अनुवासनासहित निरुह बस्तींचा प्रयोग करावा.

८ वातगुल्मचिकित्सा–

रुक्ष व्यायामजं गुल्मं वातिकं तीव्रवेदनम् ।
बद्ध विण्मारुतं स्नेहैरादितः समुपाचरेत् ॥३॥ च. चि. २४०

रुक्ष पदार्थांचें सेवनानें तथा अती व्यायामानें उत्पन्न झालेला, तीव्र वेदनायुक्त, पुरिष व अपानवायुचा विबंध करणाऱ्या वातिक गुल्माची सुरुवातीपासूनच स्नेहाद्वारे ठीक चिकित्सा करावी.

भोजनाभ्यंजनैः पानैर्निरुहैः सानुवासनैः ।
स्निग्धस्य भिषजा स्वेदः कर्तव्यो गुल्मशांतये ॥ च. चि. २४०

स्निग्ध आहार तसेच अभ्यंगाद्वारा, निरुह तसेच अनुवासनानें स्निग्ध झालेल्या रोग्याला वैद्याने स्वेदन कर्म करावें.

वातगुल्मचिकित्साक्रम–

प्रागेव जायते गुल्मे सुस्निग्धं स्वेदितं नरम् ।
रेचितं स्नेहरेकैश्च निरूहैः सानुवासनैः ॥६॥
उपाचरेद्भिषक्प्राज्ञो मात्राकालविशेषतः यो.र.भा. ८७

वातगुल्माच्या रोग्याला प्रथम स्नेहन व स्वेदन करून स्निग्ध रेचक द्यावे. नंतर निरुहबस्ती व अनुवासन बस्ती द्यावे. आणि त्यानंतर बल व काल यांचा विचार करून उपचार करावा.

पंचमूलकषायेण सक्षारेण शिलाजतु ।
पिबेत् तस्य प्रयोगेण वातगुल्मात् विमुच्यते ॥ च. चि. २५५

यवक्षार मिळविलेल्या बृहत् पंचमुळाच्या काढयासह शिलाजित घ्यावा. या प्रयोगानें वातगुल्मापासून रोगी मुक्त होतो.

**९ वातगुल्मरोगावर बृहन्नागरादि चूर्ण-**

नागरार्धपलं पिष्टं द्वे पले लुंचितस्य च ।
तिलस्यैकं गुडपलं क्षीरेणोष्णेन पाययेत् ॥
वातगुल्ममुदावर्तं योनिशूलं च नाशयेत् ॥१॥ यो.र.भा. २,८७

१ सुंठचूर्ण २ तोळें तिळाचे चूर्ण ८ तोळे व गूळ ४ तोळे एकत्र करून दुध ऊन करून त्यांतून प्यावयास द्यावे. हा योग वातगुल्म उदावर्त व योनीशूल यांचा नाश करतो.



**१० पित्तगुल्मचिकित्सा-**

पित्तगुल्मे त्रिवृच्चूर्णं पातव्यं त्रिफलाम्बुना ।
विरेचनाय ससितं कम्पिल्लं च समाक्षिकम् ॥१॥
यो. र. भा. २, ८९

पित्तगुल्मावर तेडाचे चूर्ण त्रिफळाच्या काढयांतून पाजावे आणि रेच होण्याकरितां मध व खडीसाखर मिळवून कपिला द्यावी.

**११ पित्तगुल्मावर पथ्यादिचूर्ण-**

रसेनाऽऽमलकेक्षूणां धृतपादं विपाचयेत ।
पथ्यायाश्च पिबेत्सर्पिस्तत्सिद्धं पित्तगुल्मनुत् ॥१॥
यो. र. भा. २ पा. ८९.

आवळयाचा रस, ऊसाचा रस, हिरडयाचा रस, यामध्ये चवथा भागतूप सिद्ध करावें ते पित्तगुल्माचा नाश करिते.

**१२ कफगुल्मचिकित्साक्रम-**

स्नेहोपनाहनस्वेदै स्तीक्ष्णस्त्रंसनबस्तिभि: ।
योगैश्च वातगुल्मोक्तै: श्लेष्मगुल्ममुपाचरेत ॥१॥
यो. र. भा. २ पा. ९०

तेल पाजणें, पोटीसानें शेकणें, घाम काढणें, तीक्ष्ण व सारक बस्ती या उपायांनी व वातगुल्मावर सांगीतलेल्या उपायांनी कफ गुल्माची चिकित्सा करावी.

**कफगुल्मचिकित्साक्रम–**

लंघनोल्लेखन स्वेदेकृतेऽग्नौ सम्प्रधुक्षिते ।
घृतं सक्षारकटुकं पातव्यं कफगुल्मिना ॥१॥ च. चि. २५१

लंघन, वमन व स्वेदन केल्यावर अग्नि प्रदिप्त झाल्यावर कफ गुल्म रोग्यास क्षारासह कटु घृत पाजावें.

स्थानादपसृतं ज्ञात्वा कफगुल्मं विरेचनैः ।
सस्नेहैर्बस्तिभिर्वाऽपि शोधयेत् दाशमूलिकैः ॥१॥ च. चि. २५१

कफ गुल्म स्थानापासून दूर झालेला जाणून विरेचक द्रव्यांनी अथवा दशमूलिक द्रव्यांनी साधित स्नेहबस्तींनी शोधन करावें.

सानाहं सविबंधंच गुल्मं कठिनमुन्नतम् ।
दृष्ट्वाऽदौ स्वेदयेद्युक्त्या स्विन्नंचविलयेभिषक् ॥१॥ च.चि.२५१

वैद्यानें आनाहसहित, विबन्धयुक्त, कठिण व उन्नत गुल्म पाहून प्रथम युक्तीनें स्वेदन करून मृदु झाल्यावर त्यास विलीन (पातळ) करावें.

**१३ कफगुल्मावर यवान्यादिचूर्ण–**

यवानीं चूर्णितां तक्र बिडेन लवणीकृताम् ॥
श्लेष्म गुल्मे पिबेद्वातमूत्रवर्चोनुलोमनीम् ॥१॥
यो. र. भा. २ पा. ९१

ओव्याचे चूर्ण ताकांत घालून त्याला रुचि येण्याकरितां त्यांत बरेचसे बिडलोण घालून कफगुल्मावर प्यावें. हा योग अधोवायु मल व मूत्र ह्यांचे अनुलोमन करणारा आहे.

**१४ पक्वगुल्मचिकित्सा–**

पक्वे तु व्रणवत् कर्म व्यध शोधन रोपणम् ।
स्वयमूर्ध्वमधो वाऽपि स चेद्दोषः प्रवर्तते ॥
द्वादशाहमुपेक्षेत रक्षन्नन्यानुपद्रवान् ।
परन्तु गोधन सर्पिः शुद्धे समधुतिक्तकम् ॥१॥ भै.र. ४७५

उपनाह आदींनी गुल्म पिकल्यावर त्याला व्रणाप्रमाणें चिरा मारून, पूयादि दूषित स्राव काढून त्यास निम्ब, त्रिफलादि, क्वाथा सारख्या कृमिघ्न द्रव्यांनी धुवावें. ह्या प्रमाणें शोधन झाल्यावर व्रणरोपक पदार्थ लावून पट्टबंधन करावें. जर दोष अधिक प्रबल असल्यानें स्वतः पूयरूपानें उर्ध्व अथवा अधोमार्गानें जाऊं लागतील तर रोग्याची बारा दिवस त्याचें अन्य उपद्रवापासून रक्षण करीत उपेक्षा करावी. बारा दिवस

पर्यंत शस्त्रप्रयोग करूं नये. ह्यानंतर शोधक द्रव्य संयुक्त धृतपान करावें. ह्यानें शरीर विशुद्ध होते. ह्यानंतर व्रण सुकविण्यासाठी रोग्यास मधुर व तिक्त रसयुक्त धृतपान करवावे.

**१५ गुल्मावर सर्वसाधारण चिकित्सा–**

लंघनं दीपनंस्निग्धमुष्णं वातानुलोमनम् ।
बृंहणं यद्भवेत्सर्वं तद्धितं सर्वं गुल्मिनाम् ॥१॥　भै. र. व. ४७३

लंघन अथवा लघु अन्न, हें अग्निला प्रदीप करणारे, स्निग्ध, उष्ण, वातानुलोमन करणारे तसेंच पौष्टिक अशी सर्व प्रकारचीं खाद्यें, पेयें वातगुल्मांत हितकर आहेत.

सिद्धमेकादशविधं श्रृणुमे गुल्मभेषजम् ।
स्नेहनं स्वेदनं चैव निरूहमनुवासनम् ।।१।।
विरेक वमने चोभे लंघनं बृंहणं तथा ।
शमनंचावसेकेच शौणितस्याग्निकर्मच ।
कारयेदिति गुल्मानां यथारंभं चिकित्सितम् ॥२॥

भै. र. वं. ४७३

स्नेहन, स्वेदन, निरुह, अनुवासनबस्ती, विरेचन, वमन, लंघन, बृहण, शमन, रक्तमोक्षण आणि अग्निकर्म ह्या अकरा क्रमामधून दोषकल्पना व रोग्याचें बलाबल जाणून योग्य तो प्रयोग करावा.

पेया वातहरैःसिद्धा कौलत्था धान्वजा रसाः ।
खडाः सपंचमूलाश्च गुल्मिनां भोजने हिताः ॥१॥

भै. र. व. ४७३

वातनाशक दशमूलादि द्रव्यांनी सिद्ध केलेली पेया, कुलिथाचा यूष, जांगल पशु पक्षांचा मांसरस, तसेच बृहत्पंचमूलांनी सिद्ध केलेले यूष हे सर्व गुल्मरोग्यास हितकर आहे.

**तक्रयोग–**

यवानी चूर्णितं तक्र बिडेन लवणीकृतम् ।
पिसंदीपनं वात मूत्रवर्चोऽनु लोभनम् ॥१॥　भै. र. व. ४७६

ताकामध्यें अजवायनानें चूर्ण मिसळून, बिड लवणानें नमकीन करून पिण्यानें अग्नि प्रदीप्त होतो. वायु मूत्र व मलाचें अनुलोमन होते.

**१६ रक्तगुल्मावर उपचार–**

पि[illegible]वत् रक्तगुल्मिन्या नार्याःकार्योयथाविधि ।
[illegible]स्तिस्विन्न कोष्ठाया योज्यं स्नेहविरेचनम् ॥　यो. र. ९२

स्नेहन व स्वेदनानें जिचा कोठा मृदु झाला आहे, अशा स्त्रिला तेलाचे रेचन द्यावें. पित्तगुल्मावर जो विधि सांगितला आहे, तोच रक्त गुल्मावर उपयोगांत आणावा.

**१७ शताव्हादिकल्क–**

शताव्हाचिरिबिल्वत्वग् दारुभार्गीकणोद्भवः ।
कल्कः पीतो जयेद् गुल्मं तिलक्वाथेन रक्तजम् ।। यो. र. ९३

बडिशेप, कांडेचिराईत, दालचिनी, देवदार, भारंगमूळ व पिंपळी ह्यांचा कल्क तिळाच्या काढ्याशीं द्यावा. तो रक्त गुल्माला जिंकतो.

**१८ तिळाचा काढा–** (नष्टार्तवावर काढा)

तिलक्वाथो गुडघृतव्योषभार्गीरजोन्वितः ।
पानं रक्तभवे गुल्मे नष्टे पुष्पे च योषितः ।। यो. र. ९३

तिळाचा काढा, तूप, गुळ, सुंठ, मिरी, पिंपळी व भारंगमूळ यांचे चूर्ण घालून प्यावा. तो रक्त गुल्म व नष्टार्तव यांचा नाश करतो.

**१९ भारंग्यादिचूर्ण–**

भार्गीकृष्णाकरंजत्वग् ग्रंथिकामरदारुजम् ।
चूर्णं तिलानां क्वाथेन रक्तगुल्मरुजापहम् ।। यो. र. ९३

भारंगमूळ, पिंपळी, करंजाचीसाल, वेखंड व देवदार यांचे चूर्ण तिळाच्या काढ्यांतून द्यावे. ते रक्त गुल्माची पीडा दूर करिते.

**२० अर्कपुष्पयोग–**

पक्वं तैलेऽर्कजं पुष्पंरुधिरस्राव कारिच ।। यो. र. ९४

रुईची फुलें, तेलांत तळून खावी. ती स्त्रियांच्या रक्ताचा स्त्राव करितात.

**२१ गुल्मावर योग–**

बांगडखार चूर्ण २ तोळे, आरो० वर्धिनी, सेंधेलोण १ तोळा, अळूची पानें शिरा व देठ काढलेलें व वरील दोन चूर्णे व आळूच्या पानांचे बारीक बारीक तुकडे करून चूर्णाबरोबर वाटावे. किंवा घोटावे चांगला लगदा झाल्यावर हरबऱ्या एवढ्या गोळ्या करून गोळ्या होण्यासाठीं जास्त आळूची पानें लागली तर घ्यावी व गोळ्या सावलींत वाळवाव्यांत. जेवणाचे अगोदर प्रत्येक वेळीं दोन गोळ्या तूपा बरोबर घ्याव्यांत, वांती व मळमळ होते परन्तु सहवासानें २–३ दिवसांनी मळमळ थांबते.

**२२ क्षारद्वयादि चूर्ण–**

क्षारद्वयानल व्योषनीली लवण पंचकम् ।
चूर्णितं सर्पिषा पेयं सर्वं गुल्मोदरापहम् ।। यो. र. भाग २

जवखार, सज्जिखार, चित्रकमूळ, सुंठ, मिरे, पिंपळी, निळीचे बी, सैंधव, पादे लोण, मीठ, बिडलोण, बांगडखार यांचे चूर्ण घेऊन ते तुपाशीं चाटावे, ते सर्व गुल्मांचा नाश करिते व उदराचाहि नाश करिते.

**२३ शिखिवाडवोरस–**

मारित ताम्र सूताभ्रं गंधकं माक्षिकं समम् ।
मर्दयेच्चित्रकद्रावैर्यवक्षारयुतं दिनम् ।
द्विगुंजं भक्षयेन्नित्यं नागवल्ली दलैनच ।
वातगुल्महर: ख्यातो रसोऽयं शिखिवाडव :

ताम्रभस्म, रससिंदुर, अभ्रकभस्म, शुद्ध गंधक, सुवर्णमाक्षिकाभस्म व यवक्षार १।१ तोळा घेऊन चूर्ण करून चित्रकाचें सालीचें काढयानें एक दिवस भावित करुन वाळवावें. हा "शिखिवाडव" रस दोन गुंजा विडयाचें पानाच्या रसासह सेवन केल्यास वात गुल्माचा नाश होतो.

**२४ नागेश्वर रस–**

शुद्ध सूतस्तथा गंधो नागवंगो मन:शिला ।
निशादलंच त्रिक्षारं लोहं शुल्बं तथाऽभ्रकम् ।
वासको चित्रको दन्तीक्वाथेनैकेन मर्दयेत् ।
दिनैकन्तु प्रयत्नेन रसो नागेश्वरो मत: ।
गुल्मं प्लीहपांडु शोथानाध्मानंच विनाशयेत् ।
भक्षयेन्माषमेकन्तु पर्णखंडेन गुल्मवान्　　भै. र ४७९

शुद्ध पारा, शुद्ध गंधक, नागभस्म, वंगभस्म, मनशीळ, नवसागर, यवक्षार, सज्जिखार, टाकणखार, लोहभस्म, ताम्रभस्म, अभ्रकभस्म प्रत्येकी १।१ तोळा घेवून सर्व प्रथम पारद गंधकाची कज्जली करून त्यांत शेष द्रव्यें घालून त्यास निवडुंगाचें चिकाची भावना द्यावी. एक दिवस उत्तम प्रकारें खल केल्यावर पुन्हा एक दिवस चित्रक, अडूळसा व दन्ती ह्यापैकी कोणाचेही काढयासह मर्दन करून वाळवावे. ताम्बूल खंडांतून एक मासा सेवन केल्यास गुल्म, प्लीहा, पांडुरोग, शोथ, आध्मान ह्यांचा नाश होतो.

**२५ महागुल्मकालानलरस–**

गंधकं तालकं ताम्रं तथैव तीक्ष्ण लोहकम् ।
समांशं मर्दयेतगाढं कन्यानीरेण यत्नत:
सम्पुटं कारयेत्पश्चात्संधिलेपंच कारयेत् ।
ततो गजपुटं दत्वा स्वागशीतं समुद्धरेत् ।
द्विगूंजां भक्षयेद्गुल्मी श्रृंगबेरानुपानत :
सर्व गुल्मं निहन्त्याशु भास्करस्तिमिरं यथा ।　　भै. र. ४८०

शुद्ध गंधक, शुद्ध हरताळ, ताम्रभस्म व तीक्ष्णलोह प्रत्येकी १।१ तोळा घेवून पारद गंधकाची कज्जली बनवून घृत कुमारीच्या मगजात कालवुन गोळया बनवून वाळवाव्या. संपुटात घालून मातकापड करून गजपुट द्यावे. स्वांगशीत झाल्यावर बारीक वाटून ठेवावे.

**२६ गुल्मकालानलरस -**

अभ्रं लोहं रसं गधं टंकणं कटुकं वचाम् ।
द्विक्षारं सैंधवं कुष्ठं त्र्यूषणं सारमेवच ।
पत्रमेलां त्वचं नागं खदिरं सुरदारुच ।
गृहीत्वा समभागेन श्लक्ष्णचूर्णं प्रकल्पयेत्
जयन्ती चित्रकोन्मत्त केशराज दलं तथा
निष्पीडच स्वरसं नीत्वा भावयेत्कुशलो भिषक्
चतुर्गुंजा प्रमाणेन वटिकाः कारयेत्ततः ।
उत्थाय भक्षयेत्प्रातरनुपानं जलं पय :
गुल्मं पंचविधं हन्ति यकृत्प्लीहोदराणिच ।
कामलां पाण्डुरोगंच शोथं चैव सुदारुणम्
हलीमकं रक्तपित्तं मंदाग्निमरुचिं तथा
ग्रहणीमार्दवं कार्श्यं जीर्णंच विषमज्वरम् भै. र. ४८०

अभ्रकभस्म, लोहभस्म, पारा, गंधक, टंकण, कुटकी वचा, यवक्षार, सज्जीखार, सैंधव, कोष्ठ, सुंठ, मिरी, पिंपळी, देवदार, तेजपत्र, विलायची, दालचिनी, नागकेशर, व खैराचें सत्व प्रत्येकी १-१ तोळा घेवून पारा, गंधकाची कज्जली करावी व त्यांत सर्व द्रव्यें घालून घोटावें. जयन्तीचे पानाच्या रसांत तसेंच चित्रकाच्या सालीचा काढा, धोतऱ्याचे पानांचा रस, तसेंच माक्याच्या पानांचा रस यांच्या निरनिराळ्या भावना द्याव्यात. चार गुंजेच्या गोळ्या कराव्यांत, सकाळीं १ गोळी घेऊन वर मंदोष्ण पाणी किंवा दूध प्यावें, यामुळे पांच प्रकारचे गुल्म, यकृतवृद्धी, प्लीहावृद्धी, उदर, कामला, पांडुरोग, रक्तपित्त, शोथ, हलीमक, मंदाग्नि अरूचि ग्रहणी, हे विकार तसेंच कृषता, जीर्ण विषमज्वर नाहीसे करतो. हा रस दोन गुंजा, सुंठीचा काढा अथवा आल्याच्या रसासह सेवन केल्यास, सूर्य जसा अंधःकाराचा नाश करतो तसा गुल्माचा नाश करतो.

**२७ गुल्मकुठार रस नं. १-**

नागवंगाभ्रकं कान्त समं ताम्रं समांशकम् ।
जम्बीरस्वरसैर्धृष्टा वटी गुंजाप्रमाणिका ।
मधुनार्द्रक नीरेण क्षारयुग्मेन सेविता ।
अजीर्णमानं गुल्मं च हृत्पार्श्वोदर शूलके ।
नाम्ना गुल्मकुठारोऽयं सर्व गुल्मान्यपोहति ।।१।। भै. र. ४८१

ताम्रभस्म, वंगभस्म, अभ्रकभस्म, कांतलोहभस्म व नागभस्म प्रत्येकी ।।। तोळा घेवून सर्वांस खलामध्यें जंबीर निंबाचे रसांत खल करून २ गुंज प्रमाणाच्या गोळ्या कराव्या. ह्याची एक गोळी सहामासें मध, आल्याचा रस ४ मासे, सज्जिखार व जवखार २।२ गुंजा ह्यासह सेवन केल्यास अजीर्ण, आमदोष, गुल्म, हृदयशूल, पार्श्वशूल, आणि उदरशूल नाहीसें होतात. हा शूल गुलमकुठार रस सर्व प्रकारच्या गुल्मांस नाहीसा करितो.

## २८. प्रवाळ पंचामृत रस-

प्रवाल मुक्ताफल शंखशुक्ति कपर्दिकानां च समांश भागम् ।
प्रवालमत्र द्विगुणं प्रयोज्यं सर्वैः समांश रविदुग्धमेव ॥
एकीकृतं तत् खलू भांडमध्ये क्षिप्त्वा मुखे बंधनमत्रयोज्यम् ।
पुटंच दद्यादतिशीतलेच्च उद्धृत्य तद्भस्म क्षिपेत्करंडे ॥
नित्यं द्विवारं प्रतिपाकयुक्तं वल्लप्रमाणं हि नरेण सेव्यम् ।
आनाहगुल्मोदर प्लीहकासश्वासाग्निमांद्यान्कफ मारुतोत्थान् ।
अजीर्ण मुग्दार हृदामयघ्नं ग्रहण्यतीसार विकार नाशनम् ।
मेहामयंमूत्ररोगं मूत्रकृछं तथाऽश्मरीम् ।
नाशयेन्नात्र संदेहो सत्यं गुरु वचो यथा ॥
पथ्याश्रितं भोजनमादरेण समाचरे न्निर्मलचितवृत्त्या
प्रवालपंचामृत नामधेयो योगोत्तमः सर्वगदापहारो ॥ र. च.

प्रवाळ, मोतीं, शंख, शिंपला व कवड्या हें जिन्नस समभाग घ्यावे. तथापि प्रवाळ दुप्पट घ्यावे. सर्वांच्या समान रुईचा चीक घेऊन त्यांत त्या सर्वांचा खल करावा व शराव संपुटांत घालून संधिलेप करून एक गजपुट द्यावे. स्वांगशीत झाल्यावर काढून तें भस्म करंड्यांत अगर कुपीत भरून ठेवावे. आणि नित्य सकाळ संध्याकाळ एकेक वाल प्रमाणें सेवन करावे. म्हणजें आनाह. गुल्म, उदर, पांथरी, खोकला, श्वास, अग्निमांद्य, कफवातजन्यरोग, अजीर्ण, ढेकर, हृदरोग, संग्रहणी, अतिसार, प्रमेह, मूत्ररोग, मूत्रकृच्छ्र, मूतखडा ह्याचा नाश होतो. हे गुरुचे वचन सत्य आहे. ह्यावर रोगानुरुप पथ्य भोजन करावे आणि मन सदा प्रसन्न ठेवावें. हा प्रवाळ पंचामृत योग सर्व रोगनाशक आहे.

## २९ प्राणवल्लभोरस (रक्त गुल्म)-

लोहं ताम्रं वराटश्च तुत्थंहिंगु फलत्रिकम् ।
स्नुहीमूलं यवक्षारं जेपालं टंकणं त्रिवृत्त् ॥
प्रत्येकं पलिकं ग्राह्यं छागी दुग्धेन पेषयेत् ।

गुंजार्धांतु वटीं खादेद्वारिणा मधुनाऽपिवा ।।
प्राणवल्लभनामाऽयं गहनानंद भाषित: ।
निहंति कामलां पांडुं मेहं हिक्कां विशेषत: ।
असाध्यं सन्निपातंच गुल्मंरुधिरसंभवम: ।
वातरक्तं च कुष्ठंच कंडु विस्फोटकापचीम् ।। भै. र. पा. ४८२

लोहभस्म, ताम्रभस्म, कपर्दिक भस्म, शुद्ध मोरचूत, हिंग, त्रिफळाचुर्ण, निवडुंगाचे मुळाचे चूर्ण, यवक्षार, शुद्ध जेपाळ, शुद्ध टाकणखार व निशोत्तर चूर्ण हे सर्व एक एक पळ घेऊन खलांत घालुन बकरीचे दुधांत घोटावें. एक दोन दिवस घोटल्यावर अर्ध्या अर्ध्या गुंजेच्या गोळ्या कराव्या. सुकल्यावर एक एक गोळी पाण्याबरोबर अथवा सहदांतून सेवन करावी. हा प्राणवल्लभ नांवाचा रस गहनानंदाने सांगितला. हा अनुपान परत्वे घेतला असतां कामला, पांडु, प्रमेह हिक्का, असाध्य सन्निपात, रक्तगुल्म, वातरक्त, कुष्ठ, कंडु, विस्फोटक व अपची हें रोग नष्ट करितो.

**३० शंखद्राव–**

सैंधवं च यवक्षारं नव्यंसारं तथैवच ।
प्रत्येकं द्विपलं ग्राह्यं सुराक्षारं चतुष्पलम् ।।
फटकी पलमेकं च पलार्धं कासीसं तथा ।
सर्वमेकत्र संयोज्य डमरू यंत्र मध्यगे ।।
चुल्यां प्ररोहयेत्तत्तु ज्वालये त्खदिरें धनै: ।
द्रावितं तत्समादाय तेजोरूपं जलप्रभम् ।।
द्रावयेदखिलान् धातून् वराटांश्व न संशय:
शंखद्रावरसो नाम गुल्मोदर हर: पर: यो. र. भा. २

सैंधव, जवखार, नवसागर, हे प्रत्येक आठ आठ तोळें, सोरा सोळातोळे, फटकी चार तोळे, हिराकस दोन तोळे हे सर्व एकत्र करुन डमरू यंत्रानें खैराच्या लाकड अग्नि देऊन अर्क काढावा. हा प्रखर असतो. हा कवडी वगैरे सर्व धातुचे द्रावण करितो. ह्याला शंख द्राव असे म्हणतात.

**३१ वज्रक्षार–**

सौवर्चलं यवक्षारं सामुद्रं काचसैंधवम् ।
टंकणं स्वर्जिकाक्षारं तुल्यमेकत्र चूर्णयेत् ।।
अर्कदुग्धै: स्नुहीदुग्धैर्भावयेदातपे त्र्यहम् ।
ऊर्ध्वाधस्थै: क्रमात्तस्य ततुल्यैरर्कपल्लवैद्ध्वा ।।
भांडे संस्थाप्य मृल्लिप्ते रुद्धा गजपुटे पचेत् ।
स्वागंशीतं तु संचूर्ण्य चूर्णमेषां तु मेलयेत् ।।

त्र्यूषणं च विडंगंच राजिकां त्रिफलामपि ।
चव्यं च हिंगुसंभ्रष्टं तक्रेणाद्याद्यथाऽलम् ।।
वज्रक्षाराभिधं चूर्णं मूदराणि विनाशयेत् ।
शोथं गुल्मं तथाऽष्ठीलां मंदाग्निमरुचिं तथा ।
प्लीहानं यकृद्दाल्याख्यमुदर च विशेषत : ।। यो. र. भा. २१५

पादेलोण, जवखार, मीठ, बांगडखार, सेंधलोण, टाकणखार व सज्जिखार हें समभाग घेऊन त्याला रुईचा चीक व त्रिधारी निवडुंगाचा चीक ह्यांच्या उन्हामध्यें तीन तीन भावना द्याव्या. नंतर एका भांड्यांत तें चूर्ण थोडें पसरुन वर रुईचें पान घालून त्यावर पुन्हा तें चूर्ण पसरावें. ह्याप्रमाणें थरावर थर देऊन त्या गाडग्यास मातीनें संधिलेप करुन गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून त्याचें चूर्ण करावें. नंतर सुंठ, मिरे, पिंपळी, वावडिंग, मोहऱ्या, हिरडा, बेहेडा आवळकाठी, चवक व हिंग ह्यांचें चूर्ण समभाग मिसळून ठेवावें आणि शक्तिमानाप्रमाणें ताकांतून द्यावें. हें वज्रक्षार नांवाचें चूर्ण उदरांचा नाश करितें. तसेंच सूज, गुल्म, अष्ठीला, अग्निमांद्य, अरुचि, पांथरी आणि विशेषतः यकृत ह्यांचा नाश करिते.

३२ गुल्मावर लेंप–

चित्रक, गुगुळ, बोळ, भारशिंग, मनशीळ, रुईचे किंवा उंबरीचें दुध किंवा पानांचारस. अगर सालीचा रस सर्व उगाळून पळीत गरम करून गोळ्यावर दररोज लावावा. लेप सुकल्यावर रुईची पानें गोळ्यावर बांधावी व पोट घट्ट बांधावे.

**३३ प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा :—**

गुल्मरोग्याला पहिल्यानें इच्छाभेदी २ गुं. द्यावी. त्यानें ३–४ दस्त होऊन कोठा साफ होईल नंतर दुसरें दिवशीं सकाळीं.

स्नेहन––

तूप २।। तोळे, सैंधव १ मासा, मध ३ मासे सर्व एकत्र करून एक कप पाण्या बरोबर मिसळून पाजावें.

दुपारीं व सायंकाळीं––

| | |
|---|---|
| गुल्मकालानल रस २ गुं. | अनुपान |
| [illegible]लादरारी २ गुं. | कुमारी आसव |
| ताम्रभस्म २ गुं. | १ तोळा १ वेळेस |

२ पुड्या–

रात्रीं :—मूत्ररेचकचूर्ण-१।। मासा पाण्याबरोबर याप्रमाणे ५ दिवस वरील प्रमाणे सकाळची स्नेहन औषधी २ वेळ व रात्री मूत्ररेचक चूर्ण द्यावें.

सहावे दिवशीं सकाळी--

सर्व अंग शेकून टाकावे किंवा निर्गुंडी, एरंडमूळ यापैंकी एकाचा वाफारा सर्वांगाला द्यावा.

दुपारी व सायंकाळीं--

| | | |
|---|---|---|
| गुल्मकालानलरस | २ गुं. | अनुपान-कुमारी आसव |
| जलोदरारी | २ गुं | |
| ताम्रभस्म | २ गुं. | |

२ पुड्या

दुसरे दिवशी कृमिनाशक योग द्यावा:--पळसपापडी ४ गुं. कृमिकुठार २ गुं. गूळ, ८ गुं सर्वांची गोळी करून गिळून घ्यावी. त्या दिवशी दुसरे कोणतेच औषध नको. नतर दुसरे दिवशी इच्छाभेदी २ गुं. पाण्याबरोबर घ्यावीं. त्याने ३-४ दस्त होतील. त्यानंतर दुसरे दिवसापासून मुख्य रोगावरील औषधी ४ वेळ घेत जावी.

१ वातज गुल्म—गुल्मकालानलर ४ गुं. जलोदरारी ४ गुं. ताम्रभस्म ४ गुं. जवखार ८गुं कुमारी आसव ८ गुं. वातविध्वंस ४ गुं. या सर्वांच्या ४ पुड्या करून दिवसांतून ४ वेळ घ्यावे व मूत्ररेचकचूर्ण १॥ मासा पाण्याबरोबर निजते वेळी घ्यावें.

२ पित्तज गुल्म—गुल्मकालानलरस ४ गुं जलोदरारी ४ गुं. प्रवाळ पंचामृत ४ गुं. ताम्रभस्म ४ गु यांच्या ४ पुड्या कुमारी आसवांतून घ्याव्या व ३ रे दिवशी मूत्ररेचक चूर्ण पाण्याबरोबर घेत जावे.

कफज गुल्मावर--आरोग्य वर्धिनी ४ गुं. जलोदरारी ४ गुं. गुल्म कालानलरस ४ गुं. व ताम्रभस्म ४ गुं. जवखार ८ गुं. यांच्या ४ पुड्या कुमारी आसवाबरोबर घेणे.

गुल्म ज्या दोषापासूनझाला असेल त्या दोषावरील औषध १ ते १॥ महिनाचालू ठेवावे. म्हणजे कष्ट साध्य असा गुल्महि नाहींसा होतो.

मध्येंच ४-५ दिवसानंतर 'जलोदरारी' हे औषध पोटांस झोंब लागत असल्यास कांहीं दिवस काढून टाकावे, व बाकीची २ औषधें चालू ठेवावी व मूत्ररेचक चूर्ण हे ३ रे किंवा ४ थे दिवशी देत जावे, १-१॥ महिन्यांत गुल्मरोग नाहींसा होतो. गुल्म कोणत्याहिदोषांपासून असला तरी तो नाहींसा होतो. खाण्या करितां पहिल्याने ७-८ दिवस दुधच प्यावे, अन्न खाऊ नयें. दिवसांतून ४-५ वेळ प्रत्येक वेळीं पाव पाव भर दूध गरम करून साखर घालून देणे नंतर शाबूदाणा, दूधभात द्यावा.

लेप--चित्रक, गुग्गूळ, बोळ, भारसंग, मनशीळ रुईचे किंवा उंबरीचें दुध (मिळाल्यास) नाहींतर त्याचे पानाचा सालीचा रस सर्व उगाळून गरम करून गोळ्यावर दररोज लावावा. लेप सुकल्यावर रुईची पानें गोळ्यावर बांधावी.

**शेकणे**—दररोज एक वेळ रात्री कडक शेकून करून संबंध पोटावरून कपडा घट्ट गुंडाळावा किंवा जवसाचे पोटीस बांधावे.

**वाफारा**—रूई, एरंडमूळ निर्गुंडी माका यापैकी जे मिळेल त्याचा काढा करून त्याचा वाफारा द्यावा.

**सारक**—शौच्चाला साफ होत नसेल तर आठवड्यांतून दोन वेळ २॥ तोळे एरंडेल द्यावे.

**आहार**—दररोज औषधी शिवाय हिंगाष्टक २ मासे किंवा शंखवटी दोन गुंजा गरम पाण्याबरोबर घ्यावें.

| | |
|---|---|
| ताम्रपर्पटी | ३ गुं. |
| प्रवाळपंचामृत | ३ गुं. |
| बृहतत् शंखवटी | ८ गुं. |
| हिंग्वादिचूर्ण | ३ मासे. |

मिश्रण ४ पुड्या, अनुपान गरम पाणी

| | |
|---|---|
| पंचामृतपर्पटी | ३ गुं. |
| भल्लातक क्षार | ४ गुं. |
| शंख भस्म | ४ गुं. |
| भास्कर लवणचूर्ण | ४ मासे |
| कुबरोक्षादिवटी | १ मासा |

मिश्रण पुड्या ४, गरम पाणी अथवा ताक

रोज रात्री झोपतांना एरंड तेल २॥ तोळे सुंठीच्या काढ्या बरोबर घेणें.

### ३४ गुलमरोगावर आहार—

गुल्म असलेल्या रोग्याला पहिल्याने ७–८ दिवस दुधावरच ठेवावे. चहा घेण्यास हरकत नाही. नंतर जुन्या तांदळाचा भात, मुग किंवा उडीदाचें वरण, ताक व दूध या बरोबर द्यावा. भाताबरोबर तूप जरूर घ्यावे. त्याबरोबर पालेभाजी मुळा तसेच चटणी करिता सांबार, लसूण, पदिना, आले, आमसोल, फळें– आंबा मोसंबी, द्राक्षे, पपई, संत्रे. पाणी– पाणी उकळी येईपर्यंत तापवून थंड केलेले पिण्यास द्यावे.

### ३५. गुल्मावर पथ्यापथ्य पदार्थ—

गुल्माच्या रोग्याने खालील पदार्थ वर्ज्य करावे—

गहू, हरभरें, भुईमुग, वाटाणें, बाजरी, वातकारक, व पचनास जड असे सर्व पदार्थ वर्ज्य करावेत.

**पथ्यापथ्य–**

संवत्सरसमुत्पन्ना: कलमा रक्तशालय: ।
खंडकुलत्थयूषश्च धन्वमासरस: सुरा ॥
गवामजायाश्च पयो मृद्वीका च परुषकम् ।
तण्डमेरक्ततैलं च लशुनं बालमूलकम् ॥
पतूरो वातुकं शिग्रु मातुलुंग हरीतकी ।
वातानुलोमनं चैव पथ्यं गुल्मे नृणां भवेत ॥ • यो. र. ११०

एक वर्षाच्या जून्या साळी, तामसाल, गडीसाखर, हुलग्याचे कढण धन्व (जांगल) देशातील मांसाचा रस, मद्य, गाईचे किंवा शेळीचे दूध, मनुका, फालस्त, ताक, एरंडतेल, लसूण, कोवळामूळा, पत्तूर, (जळ पिंपळी) चंदन बटवा किंवा चाकवत, शेवग्याच्या शेंगा, महाळुंग, हिरडें व बातानुलोमन करणारे पदार्थ हे गुलमावर पथ्य आहे.

माषादय: शिम्बिधान्यं शूकधान्ये शवादय:
वल्लूरं मूलकं मत्सं मधुराणि फलानि च
अधोवायु शकृन्मूत्र श्रमश्वासाश्रुधारणम् ।
वमनं जलपानं च गुल्म रोगी परित्यजेत् यो. र. ११०

उडीद वगैरे शेंगातील धान्यें, सातू वगैरे शूकधान्ये, सुकेमांस, जूना मूळा असे गोडफळें अधोवायु, मल, मूत्र श्रमामुळे लागणा रा श्वासोच्छ्वास व अश्रु यांचे बेग धारण करणें, ओकारी काढणें, पाणी पिणें हें प्रकार गुल्म रोग्यानें अपथ्य म्हणून वर्ज करावेत,

———